मार्च–एप्रिल २०२६
वीरनिर्वाणसंवत् २५५१
वर्ष ७६वे, पुष्प ८वे–९वे
चैत्र–वैशाख शके १९४८
UGC-CARE Listed
Research Journal
(Since-Jun2019)
www.sanmatimasik.com

सन्मति प्रकाशन
स्थापना : १५ ऑगस्ट १९५०

ISSN- 2395-5503
RNI No. MAH/MAR/2006/21290/27-9-07

बाहुबली विद्यापीठ व ब्रह्मचर्याश्रमाचे मुखपत्र

# सन्मति

मूल्य – १८ रु.

आर्यिका पार्श्वमती माताजी





## गुरुकुल शिक्षण क्षेत्रातील अभीक्ष्णज्ञानोपयोगी जैन महिलारत्ने



श्रद्धेय कंकुमावशी

श्रद्धेय गजाभून शहा










ब्र. पं. सुमतीबाई शहा

ब्र. पं. विद्युल्लताभून शहा

पं. मंजुळाताई रुईवाले

# बाहुबली येथील सिद्धचक्र विधान आणि दीक्षा समारंभाची छायाचित्रे....

(विशेष वार्ता पृष्ठ क्र. ४५वर)



## जनताराच्या विद्यार्थ्यांची विधान भवनला भेट





दि.१९ मार्च २०२६ रोजी जनतारा कल्पवृक्ष सैक्षणिक संकुलच्या विद्यार्थ्यांनी मुंबई येथे विधानभवनाला भेट दिली. शाळेतील ६ शिक्षक व १२१ विद्यार्थी असे एकूण १२७ जणांनी विधानभवनामधील अधिवेशनादरम्यान सुरू असलेले कामकाज पाहिले. अधिवेशनामध्ये विरोधी पक्षातील सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांना मुख्यमंत्री महोदय उत्तर देताना दिसून आले. तसेच विद्यार्थ्यांनी विधानसभा व विधान परिषद या दोन्ही सभागृहामधील सभापती महोदयांचे कामकाज सुद्धा बघितले. दरम्यान, मंत्री महोदय व सदस्यांनी विद्यार्थ्यांच्या या भेटीचे कौतुक केले.



## २३व्या स्मृतिदिनानिमित्त भावपूर्ण संस्मरण...!

सन्मति मासिकाचे संस्थापक-संपादक, १९४० ते १९४६ सोलापूर गुरुकुल व १९४६ ते २००३ बाहुबली गुरुकुल अशाप्रकारे सुमारे ६३ वर्षाहून अधिक काळ गुरुकुलांच्या संचालकपदाची समर्थ धुरा संभाळून धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक, साहित्यिक क्षेत्रास निरपेक्ष सेवाव्रतीने अमूल्य योगदान देणारे बा. ब्र. माणिकचंदजी भीसीकर (गुरुजी) यांचा दि. २० एप्रिल २०२६ रोजी २३वा स्मृतिदिन येत आहे. त्यानिमित्त त्यांच्या निःस्पृह जीवनकार्यास विनम्र अभिवादन !!!

सत्प्रेरणा-शुभाशीर्वाद




प.पू. गुरुदेव १०८ श्री समंतभद्र महाराज

उन्नतं मानसं यस्य, भाग्यं तस्य समुन्नतम् ।

# सन्मति

पो. बाहुबली, जि. कोल्हापूर
पिन-४१६ ११० ☎(०२३०) २५८४४२२

संस्थापक-संपादक



स्व. ब्र. माणिकचंद भीसीकर
एम्. ए., न्यायतीर्थ

## मार्च-एप्रिल २०२६

❍ वर्ष: ७६ वे ❍ पुष्प ८-९वे

❑ वार्षिक वर्गणी :२५०/-

❑ द्वादशवर्षीय वर्गणी :२५००/-

❍ संपादक मंडळ ❍

❍ **डॉ. नेमिनाथ शास्त्री,** एम.ए., बी.एड्., पीएच्.डी.

❍ **सुश्री प्रज्ञाताई डोणगांवकर,** कारंजा, बी.एस्सी.

❍ **डॉ. लीना चवरे,** कारंजा, एम.ए., बी.एड्., पीएच्.डी.

**बँक खात्याचे विवरण –**

Bank Name-ICICI Bank, Branch- Bahubali IFSC- ICIC0006388

* Shri Bahubali Vidyapeeth - A/C No- 638801700001 (80G **करपात्र सवलतीकरिता**)

* Shri Bahubali Brahmacharyashram- A/C No- 638801700002 (सन्मतिसाठी वर्गणी, दानराशी Shri Bahubali Brahmacharyashram या खात्यावर पाठवा.) (80G **करपात्र सवलतीकरिता**)

**(सन्मती मासिकातून प्रकाशित होणारे सर्व शोधप्रबंध व लेख हे संशोधक आणि लेखकांचे व्यक्तिगत विचार आहेत. त्याची प्रामाणिकता व योग्यता याविषयी तेच सर्वस्वी जबाबदार आहेत. प्रकाशक किंवा संपादक हे केवळ संवाहक आहेत.)**

## ⊙ अनुक्रमणिका ⊙

✻ संपादकीय..धर्मशिक्षण क्षेत्रातील महिलारत्न.. –डॉ. नेमिनाथ शास्त्री, बाहुबली ०४
✻ आर्यिका १०५ श्री पार्श्वमती अम्मा –डॉ. नेमिनाथ शास्त्री, बाहुबली ०७
✻ पुण्यश्लोक धर्ममाता कंकुमावशी पंडित –श्री. धन्यकुमार भोरे, कारंजा १०
✻ सुश्री बजाआत्या कळमकर – सुश्री मंजुळाताई रुईवाले, कारंजा ११
✻ श्री. माणिकभून शहा (आ.चंद्रमती माताजी) – प्रज्ञा डोणगावकर, कारंजा १३
✻ गुरुकुलमाता गजाबेन शहा – प्रज्ञा डोणगावकर, कारंजा १४
✻ पद्मश्री पंडिता सुमतीबाई शहा –श्री. अनंत बाबुराव बळ्ळे, सोलापूर १७
✻ धर्ममाता मंजुळाताई रुईवाले – प्रांजली रुईवाले, कारंजा लाड १८
✻ बा. ब्र. विमलाताई मुराबट्टे, भोज १९
✻दागिन्याचा नव्हे तर शिक्षणाचा हट्ट धरा : वासाहतिक महाराष्ट्रातील जैन स्त्रियांचे शिक्षण –प्रा. रूपेश मडकर, छ. संभाजीनगर २०
✻ विदुषीरत्न सुश्री. विद्युल्लता हिराचंद शहा – श्री. अनंत बाबुराव बळ्ळे, सोलापूर २५
✻ श्रद्धेय शांताताई कान्हेड – उल्का रुईवाले, कारंजा (लाड) २७
✻ ज्योतीने ज्योत उजळते! प्रकाशाचा वारसा पुढे चालविते....!! – विपुल खेडकर, नागपूर २९
✻ पुस्तकसमीक्षण– रसग्रहणाच्या पलिकडे...शब्दार्घ्य विनयांजली –सौ. वंदना दर्यापूरकर, अमरावती ३८
✻ विशेस वार्ता ४२

संपादकीय....

# धर्मशिक्षण क्षेत्रातील महिलारत्नांचा गौरव

**डॉ. नेमिनाथ शास्त्री, बाहुबली**

प्रत्येक वर्षी **८ मार्च हा जागतिक महिला दिन** म्हणून साजरा केला जात असतो. तसेच चालू वर्षी संयुक्त राष्ट्र संघाने जाहीर केले आहे की **आंतरराष्ट्रीय शेतकरी महिला वर्ष** म्हणून साजरा केला जावा. याचा मूळ उद्देश हाच आहे की अत्याधिक प्रमाणात महिलावर्ग शेती कामामध्ये सहकारी ठरतात. त्यांचा गौरव व्हावा, त्यांच्या कार्याची आंतरराष्ट्रीय स्तरावर दखल घेतली जावी, त्यांच्या परिश्रमाला प्रोत्साहन मिळावे. याच उद्देशाने सन्मती मासिकातर्फे मार्च महिन्याचा अंक महिलांना समर्पित असावा असा विचार डोळ्यासमोर ठेवून कार्यवाही सुरू होती, परंतु काही तांत्रिक अडचणीमुळे हा अंक विलंबाने प्रकाशित होत आहे. त्याबद्दल सर्वप्रथम आम्ही सर्व वाचक वर्गांची मनापासून क्षमा याचना करीत आहोत.

**पुरुष व स्त्री : शब्दार्थ–**

**पुरु अनन्तगुणे शेते इति पुरुषः।** म्हणजे जो अनेक सद्‌गुणांनी युक्त असतो, त्यास पुरुष म्हणतात. **त्रायते नरकात् पापात् वा इति स्त्रीः।** म्हणजे जी नरकात जाण्यापासून किंवा पापकार्यापासून वाचविते ती स्त्री होय. अशाप्रकारे व्याकरणकारांनी शब्दार्थ सांगितला आहे, त्याला सर्वांनी जपले पाहिजे.

**महिला शिक्षणाची गंगोत्री–**

या युगाच्या प्रारंभी आद्य शिक्षणमहर्षी म्हणून विख्यात असणारे महाराजा ऋषभदेव यांनी या युगाच्या प्रारंभी सर्वप्रथम आपल्या दोन्ही कन्यांना शिक्षण दिले. ब्राह्मी या कन्येला अक्षरज्ञान शिकवले म्हणून त्याकाळी जी लिपी आविष्कृत झाली तिला **ब्राह्मी लिपी** असे म्हणतात तर दुसरी सुपुत्री सुंदरी हिला **अंकगणिताचे ज्ञान** दिले. अशाप्रकारे शिक्षणाची सुरुवात ही सर्वप्रथम स्त्री–शिक्षणापासूनच झालेली दिसून येते.

भारताच्या अत्यंत प्राचीन काळात सुद्धा स्त्रियांना शिक्षणाची सुविधा नेहमी उपलब्ध करून दिली जात असे. **वैदिक कालखंड हा स्त्री शिक्षणाचा सुवर्णकाळ मानला जातो.** त्याकाळी मुलींच्यावर उपनयन संस्कार केले जात होते आणि ब्रह्मवादिनी या विद्येत त्या पारंगत होत असत. केवळ धर्म, तत्त्वज्ञान, ललित कला याचेच ज्ञान दिले जात नव्हते तर अश्वारोहण, धनुर्विद्या इत्यादी युद्धकला, नृत्यकाला, गायन, वादनकला यामध्ये सुद्धा स्त्रिया पारंगत होत असेत. तर गार्गी, मैत्रेयी, आत्रेयी यासारख्या प्राचीन काळातील स्त्रियांनी सुद्धा तत्त्वज्ञानावरील अनेक ग्रंथ लिहिले आहेत. जैन धर्मातील २४ तीर्थंकर यांच्या धर्मसभेचा (समवशरण) इतिहास पाहिला असता त्यामध्ये पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांचे प्रमाण अधिक होते हे स्पष्टपणे कळते. म्हणजेच **शिक्षण व संस्कार या क्षेत्रात स्त्रियांचा एकाधिकारशाहीपणा चटकन लक्षात येतो.**

मौर्यकाळात तर शस्त्र आणि शास्त्र या दोन्ही क्षेत्रात अनेक स्त्रिया पारंगत होत्या. गुरुकुल परंपरेतून सुसंस्कार आणि सुशिक्षितपणा सहजतेने मिळत होता. त्यातून महिलांना समाजात आदराचे स्थान दिले जात होते, हे सहजते लक्षात येते.

तसेच मध्ययुगीन कालखंडात देखील अनेक स्त्रियांनी राज्यकारभार केला आणि साहित्य क्षेत्रात ही उल्लेखनीय कार्य केले आहे. याविषयीचे विशेषांक यापूर्वीच प्रकाशित झाले आहेत. दानचिंतामणी अतिमब्बे यांनी हजारो मंदिरे उभी केलीत. त्याचप्रमाणे शास्त्ररचना करणाऱ्यांना प्रोत्साहन ही दिले. पट्टमहादेवी शांतलादेवी यांनीही स्त्री–शिक्षणाला पुरस्कृत केले. अबक्का महादेवी

यांनीही अनेक विद्वानांना अश्रय दिला. अशा प्रकारच्या अनेक स्त्रियांचा आदरपूर्वक उल्लेख केला जाऊ शकतो. हा एक स्वतंत्र संशोधनाचाच विषय आहे.

अशाप्रकारे प्राचीन काळापासून भारतात स्त्री व पुरुष हे समाजाचे दोन घटक समान आहेत. एक हीन व दुसरा श्रेष्ठ असे होऊ शकत नाही ज्याप्रमाणे रथाला दोन चाके असतात व तेही समांतर असावी लागतात. तरच रथ गतिशील होईल, अन्यथा नाही. म्हणून प्रागैहितासिक काळापासून ऋषीमुनींनी स्त्री व पुरुष यांना समान महत्त्व दिले होते. परंतु मध्ययुगीन कालखंडात केवळ उच्चभ्रू समाजातील महिलांनाच शिक्षणाची कवाडे उघडी होती. मध्यमवर्गीय समाजातील स्त्रिया मात्र शिवणकला, विणकाम अशाप्रकारे व्यावसायिक शिक्षण घेत होते. कालांतराने त्या स्त्रिया देखील या शिक्षणापासून वंचित राहू लागल्या आणि केवळ चूल व मूल या संकल्पनेभोवतीच त्यांचे विश्व गुरफटले गेले. त्यातूनच अनेक प्रकारच्या अनिष्ट, रूढी-परंपरा निर्माण झाल्या. या बेड्यांमध्ये अडकल्याने स्त्रियांचे अतोनात नुकसान झाले. हा घसरणीचा काळ आणि त्याचा इतिहास न पाहणे बरे....

**महिलांचा गौरव-**

गेल्या दोन शतकापासून महिलांचा उद्धार विशेष रूपाने घडत आहे आणि सध्याच्या २१व्या शतकात महिला पुरुषांच्या बरोबरीने कार्य करीत आहेत. किंबहुना त्यांना कार्य करण्याची संधीही उपलब्ध करून दिली जात आहे, ही एक विशेष नोंद होय. प्रामुख्याने स्त्री-पुरुष समानता आणि महिलांच्या कर्तृत्वाचा सन्मान करण्यासाठी अनेक विशेष दिवस व उत्सव साजरे केले जातात. त्यांना यातून त्यांच्या हक्काची जाणीव करून देणे, अत्यंत आवश्यक असते. आधुनिक युगात महिला सर्वच क्षेत्रांमध्ये आघाडीवर आहेत. सध्या आर्थिक क्षेत्रात देखील महिलांची कामगिरी चांगल्या प्रकारे आहे. विशेष करून ग्रामीण भागात कृषी क्षेत्रात महिलांचा सहभाग लक्षणीय दिसून येतो. सुमारे ३१ टक्क्याहून अधिक याचे प्रमाण दिसून येते.

महाभारतात महर्षी व्यास मुनींनी असे लिहिले आहे की

**न गृहं गृहमुच्यते गृहिणी गृहमुच्यते ।**
**गृहं हि गृहिणीहिनं अरण्यं सदृशं मतम्।।**

केवळ दगड-मातीच्या भिंतींना घर म्हटले जात नसते तर त्या घरात राहणाऱ्या गृहिणीला घर असे म्हणतात आणि जर त्या घरात गृहिणी नसेल तर ते घर हे जंगलाप्रमाणेच आहे.

तसेच नीतिकार असे म्हणतात की

**यस्य भार्या गृहे नास्ति साध्वी च प्रियवादिनी।**
**अरण्यं तेन गन्तव्यं यथारण्यं तथा गृहम्।।**

ज्याच्या घरी सच्चारित्रसंपन्न आणि गोड बोलणारी पत्नी नाही. त्याने सरळ अरण्यात जावे. कारण ते घर आणि जंगल एकसमानच आहेत.

यावरून असे लक्षात येते की ज्याप्रमाणे घराचं मोठेपण जपण्यासाठी पुरुष महत्त्वाचा आहे त्याचप्रमाणे घराचं घरपण जपण्यासाठी स्त्री देखील तितकीच आवश्यक आहे. दोघांच्या संगनमतानेच घर चांगल्या प्रकारे उभे राहत असते. केवळ दगड-माती म्हणजे घर नव्हे, म्हणून त्या घरात स्त्री व पुरुष यांच्या परस्पर हितसंबंधावरच सौख्य नांदत असते. वास्तुशास्त्रानुसार घर बांधल्याने घरात शांती-समाधान राहत नसते तर त्यापेक्षा त्या घरातील लोकांनी परस्पर हितसंबंध, आपलेपणा, वात्सल्य, आपुलकी, जिव्हाळा, माया- ममता जोपासल्यानेच सुख- समाधान नांदत असते. म्हणूनच नीतीकार असे म्हणतात की

**यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवता:।**
**यत्रैतास्तु न पूज्यन्ते सर्वास्तत्राफला: क्रिया:।।**

जेथे स्त्रियांचा आदर, सन्मान केला जातो, त्यांच्या विचारांना चालना दिली जाते. त्यांचे कौतुक केले जाते. जेथे त्यांच्या मताचा आदर केला जातो. खऱ्या अर्थाने तेथेच नंदनवन असते. तेथेच सुख-समाधान नांदते, पण जेथे स्त्रियांचा तिरस्कार केला जातो, त्यांना तुच्छ मानले जाते, समानतेचा दर्जा

दिला जात नाही. तेथे सर्व क्रिया निष्फळ ठरतात. नियमाने तेथे दुःख व दारिद्र्य येत असते. म्हणून या सृष्टीतील प्रत्येक घटक हा अत्यंत महत्त्वाचा व आदरणीय आहे. कोण्या एका वर्गाला तुच्छ मानणे, हीन समजणे हे स्वतःच्या दुर्बलतेचे लक्षण होय.

**महिला सक्षमीकरण काळाची गरज–**

आज प्रत्येकाने वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगून स्त्री–जन्माचा आदर करावा. तिलाही सन्मान दिले जावे. तिच्याप्रती आपुलकीची आणि जीवदयेची भावना बाळगावी. एखाद्या छोट्याशा मुंगीला मारणे किंवा त्रास देणेही जिथे पाप समजले जाते. अशा सामाजिक वातावरणात जगत असताना एकमेकाविषयी तिरस्काराची भावना बाळगणे हे कदापि योग्य असू शकत नाही. ते सर्वथा अनुचितच आहे.

पुण्य–पापाच्या व शील–सदाचाराच्या संकल्पनेवर आधारित असलेल्या या समाजात दुर्बलतेचा, असाहय्यतेचा गैरफायदा घेऊन एखाद्या घटकावर अन्याय, अत्याचार करणे हे भारतीय समाजास शोभत नाही. जेथे स्त्रीला देवीचा सन्मान दिला जातो तेथे त्या नारीशक्तीचा गौरव केलाच पाहिजे, म्हणून आज सामाजिक, सांस्कृतिक, वैद्यकीय, शैक्षणिक, साहित्यिक, संरक्षण, राजकीय, धार्मिक इत्यादी सर्वच क्षेत्रात स्त्रियांचा सहभाग लक्षणीय दिसत आहे. पण तेथेच दुसरी बाजू अत्यंत दयनीय अवस्था ही दिसते आहे. त्यासाठी सर्वांना परिश्रमपूर्वक योग्य दिशेने कार्य करणे अत्यंत अनिवार्य आहे...

**प्रस्तुत विशेषांकासंबंधी–**

सर्वच क्षेत्रातील महिलांचा सन्मान व गौरव करणे शक्य नाही. म्हणून सन्मती मासिक हे प्रामुख्याने आधुनिक गुरुकुल शिक्षण प्रणालीच्या प्रचार–प्रसाराकरिता समर्पित आहे. गेल्या विसाव्या शतकात या शिक्षणक्षेत्रात ज्यांनी विशेष उल्लेखनीय कार्य केले आहे, अशा महिलांची दखल घ्यावी या हेतूने शिक्षण क्षेत्रामध्ये विशेष कार्य करणाऱ्या जैन महिलारत्नांचा अल्पसा परिचय प्रस्तुत अंकात देण्यात आला आहे. विशेषकरून महाराष्ट्रातील श्राविकाश्रमातून नवसंजीवनी प्राप्त केलेल्या महिलांनी जे योगदान दिले आहे त्यांचे स्मरण येथे केले आहे.

गुरुदेव श्री समंतभद्र महाराज यांनी एक श्राविकाश्रमरुपी वटवृक्ष लावले. आज ते एक विशाल डेरेदार महावृक्ष बनले आहे. इतकेच नव्हे तर या वृक्षाची बीजे ज्या ज्या गावांमध्ये पडली तेथे तेथे एक नवीन विशाल वृक्ष निर्माण झाले आहे. याच्या आज अनेक शाखा तयार झाल्या आहेत आणि पुढेही होत राहतील. येणाऱ्या अनेक पिढ्यांना निश्चितच सत्संस्कार मिळतील. अशा प्रकारे गुरुदेव श्री समंतभद्र महाराज यांच्या कार्याचा हा एक प्रकारे गौरवच आहे. त्यांच्या या विशाल कार्यकर्तृत्वाचा आढावा घेतला असता त्यांच्या चरणी आमचे मस्तक सहजतेनेच विनम्र बनते.

प्रस्तुत अंकाची संकल्पना आदरणीय प्रज्ञाताई यांनी सहजतेने उचलून धरली. केवळ अनुमोदनाच नव्हे तर प्रत्यक्ष कृती देखील केली. त्यांच्याच सत्प्रयासाने हे सर्व लेख एकत्रित झाले आहेत. यामध्ये विशेष करून विपुलताई खेडकर आणि प्राध्यापक रुपेश मडकर यांनी भरसक प्रयत्न केले आहेत. यासाठी ते विशेष धन्यवादास पात्र आहेत. आम्ही या सर्वांचे विशेष ऋणी आहोत आणि भविष्यातही अशाच प्रकारच्या सहकार्याची अपेक्षा व्यक्त करीत आहोत.

महिला दिनाचे औचित्य साधून गेल्या शतकात शिक्षण क्षेत्रात जैन महिलांचे विशेष योगदान येथे प्रस्तुत करण्याचा अल्पसा प्रयोग केला आहे. वाढती महागाई आणि पोस्टाच्या तांत्रिक अडचणीमुळे नेहमीचे सदर या अंकात घेतले नाहीत. वाचक वर्ग निश्चितच याचा स्वागत करतील, अशी आम्ही आशा बाळगत आहोत.

नेमिनाथ

*****

विसाव्या शतकातील प्रथम दीक्षित महिला

# आर्यिका १०५ श्री पार्श्वमती अम्मा

**डॉ. नेमिनाथ शास्त्री, बाहुबली**

**जीवन परिचय**

पूज्य श्री १०५ पार्श्वमती अम्मा यांचे पूर्वाश्रमीचे नाव ताराबाई. जन्मगाव सिदनाळ (ता. निपाणी, जि. बेळगाव). पिताश्री भुजाप्पा मगदूम व मातुश्री लक्ष्मीबाई. सरस्वती ही त्यांची ज्येष्ठ भगिनी तर पायाप्पा व भीमाप्पा हे त्यांचे कनिष्ठ बंधू होते. त्या काळाच्या रितीरिवाजाप्रमाणे बालवयातच ताराबाई यांचा विवाह तळंदगे येथील श्री भोजे यांच्या परिवारात झाला. पण त्यांना वयाच्या तेराव्या वर्षीच वैधव्य आले. शिक्षण बेताचेच होते, पण लहानपणापासून घरातील धर्म संस्कारामुळे त्यांनी या आपत्तीस धैर्याने तोंड दिले. नातेवाईकांनी दुसरा विवाह करावा असा आग्रह धरला असता देखील ते त्या व्यामहापासून बचावले. त्याकाळचे सुप्रसिद्ध श्री जिनाप्पा स्वामी बोरगावकर यांच्याजवळ त्यांनी धर्माभ्यास केला आणि व्रतस्थ जीवन कंटू लागल्या. पुढे वयाच्या तिसाव्या वर्षी चारित्र चक्रवर्ती आचार्य श्री शांतिसागरजी महाराज यांच्याकडून क्षुल्लिका दीक्षा धारण केली. १९२० साली मुकट सप्तमीच्या शुभमुहूर्तावर कोगनोळी या ठिकाणी हा दीक्षा समारंभ संपन्न झाला. दोड्डु अम्मा (मोठ्या माताजी), पार्श्वमती अम्मा या नावाने त्या प्रसिद्ध झाल्या. १९२५ आणि १९२७ साली कुंभोज बाहुबली येथे त्यांनी चातुर्मास केला. तसेच आचार्य श्री शांतिसागर जी महाराज यांच्या सोबत त्यांनी सम्मेद शिखरजीची वंदना केली. १९३९ साली श्रवणबेळगोळ येथील महामस्तक प्रसंगी परमपूज्य पायसागरजी महाराज यांच्या संघ सानिध्यात उपस्थिती दर्शविली.

**आदर्श समाधी महोत्सव**

रविवार, दि. ३० मार्च १९६९ रोजी श्री अतिशय क्षेत्र बाहुबली येथे त्यांनी परमपूज्य गुरुदेव श्री समंतभद्र जी महाराज यांच्या शुभहस्ते आर्यिका दीक्षा घेतली आणि सल्लेखना महोत्सवास सुरुवात केली. दिनांक ७ मे १९६९ रोजी यम सल्लेखना स्वीकारली आणि मंगळवार, दि. १३ मे १९६९ रोजी श्री अतिशय क्षेत्र बाहुबली येथे अत्यंत समता भावपूर्वक देह त्याग केला. त्यांच्या पार्थिव शरीरास ब्रह्मचारी माणिकचंदजी भीसीकर गुरुजी यांच्या शुभहस्ते अग्नी संस्कार करण्यात आले होते. यावेळी गुरुदेव श्री समंतभद्र महाराज यांच्या सोबत मुनी श्री महाबल महाराज, क्षुल्लक श्री यशोभद्र महाराज, क्षुल्लक श्री वीरभद्र महाराज, आर्यिका श्री शुद्धमती माताजी, आर्यिका श्री विमलमती, माताजी क्षुल्लिका श्री अजितमती माताजी आणि बाहुबली गुरुकुल संस्थेतील व्रती गुरुजन यांच्या सानिध्यात हा त्यांनी मृत्यू महोत्सव सानंद पार पाडला. दृढ आत्मश्रध्दा, तत्त्वअभ्यास, संयमावरील निष्ठा याद्वारे त्यांनी आपला आत्मविकास साधला. धर्मसेवा, गुरुकुलातील मुलांची सेवा यासोबत त्यांनी आपली आत्मसेवा देखील साधली. प्रेम, निष्ठा व सेवा यांची त्या जिवंत मूर्ती होत्या.

१९५५ साली कुंथलगिरी येथे आपले दीक्षा गुरु आचार्य श्री शांतिसागर जी महाराज यांच्या समाधी महोत्सव प्रसंगी अत्यंत निष्ठापूर्वक आहारचर्या सांभाळून निर्विघ्न समाधीसाठी भरसक प्रयत्न केला होता. त्याचेच संस्कार त्यांना अंतिम समयी उपयोगी पडले.

**आध्यात्मिक जीवन यात्रा**

१९२० साली दीक्षा घेतल्यानंतर १९६९ साली त्यांनी समाधी साधली. या ४९ वर्षाच्या कालखंडात त्यांनी समाजामध्ये धर्मप्रभावना केली. वेगवेगळ्या ठिकाणी चातुर्मास संपन्न केले. पण सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ज्याप्रमाणे घार उंच आकाशी झेप घेते पण तिचे लक्ष्य मात्र पिलापाशी

असते त्याप्रमाणे अम्मा कोठेही चातुर्मास किंवा विहार करीत असल्या तरी सातत्याने बाहुबली गुरुकुलाशी त्यांचा ऋणानुबंध कायम जोडलेला दिसून येतो. प्रत्येक गावागावातून अनेक चांगल्या मुलांना शोधून गुरुकुलात पाठवणे, योग्य त्या दानशूर व्यक्तींना दान देण्यास प्रवृत्त करणे, गुरुकुल शिक्षण व धर्म शिक्षणाचे महत्त्व आणि आवश्यकता पटवून देणे, पूज्य गुरुदेव श्री समंतभद्र महाराज यांच्या कार्यकर्तृत्वाचा गौरव करणे यासाठीच त्यांनी आपले जीवन वेचले.

केवळ बाहुबलीच नव्हे तर स्तवनिधी, तेरदाळ, बागेवाडी या गुरुकुलांच्या सोबत कारंजा गुरुकुल व कारंजा येथील श्राविकाश्रम यांच्या विकासासाठी, तसेच त्या संस्थेतील लहान मोठ्या बालकांवर संस्कार करण्यासाठी मातेप्रमाणे प्रेमाचा वर्षाव करीत असत. कारंजा येथे तर त्यांनी १९६०, १९६३, १९६४, १९६५, १९६७ आणि १९६८ असे एकूण सहा चातुर्मास संपन्न केले. तसेच १९६६ साली अंजनगाव सुर्जी येथे चातुर्मास केला. अशा प्रकारे पूज्य गुरुदेव श्री समंतभद्र महाराज यांच्या आज्ञेवरून महाराष्ट्र आणि कर्नाटकामध्ये गुरुकुल शिक्षणाच्या प्रचार प्रसारा करिता अतुलनीय असे कार्य केले आहे.

त्यांच्या कार्याचा एकूणच सारांश आम्ही अधिक आपल्या भाषेत न सांगता सुमारे ४० वर्षाहून अधिक काळ त्यांच्या सानिध्यात राहिलेले आणि त्यांना आर्यिका ही दीक्षा देऊन निर्यापकत्वाचे कार्य करणारे परमपूज्य गुरुदेव १०८ श्री समंतभद्र महाराज त्यांच्या श्रद्धांजली सभेत आपले आंतरिक उस्फुर्त भाव अशा प्रकारे प्रकट करतात, ते पाहिल्याने त्यांच्या कार्याची महती सहजच लक्षात येते... ते असे...

ज्या महान आत्म्याचा आपणांपासून नुकताच वियोग झाला आहे त्यांच्या पावन आत्म्यास सर्वांनी भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली ही फार चांगली गोष्ट झाली. पू. अम्मांनी महाराजांवर जितका उपकार केला आहे तितका कोणावर केला नसेल. या संस्थेच्या उभारणीतील खरे कर्तृत्व पू. पार्श्वमती अम्मा व स्व. श्री जिनगौडा पाटील यांचे आहे. हे स्थान पाहून गुरूकुल संस्थेचे विचार आले असता त्यावेळी क्षु. १०५ चंद्रसागर महाराजांच्या आग्रहामुळे ते रहित करून परत जाण्याचे ठरविले; परंतु योग वेगळा होता. **'धर्म राहील तर तो दक्षिणेतच**' हे श्रुतकेवली आदि पूर्व ऋषींचे वचन व त्यावरील विश्वास यामुळे इच्छा तर होत होती, स्व. क्षु. विमलसागर महाराजांची येथे संस्था काढण्याची प्रेरणाही होती. नव्हे, डोंगरा-वरील एका झाडावर त्यांनी नावही कोरून ठेवले, तथापि अडचणीही काही कमी नव्हत्या. डोंगरावरील इमारतीत रात्री ८ वाजता भरलेली सभा सकाळचे चार वाजले तरी संपली नव्हती. 'बरीच भवति न भवति होऊन अखेर संस्थेची स्थापना करण्याचे ठरले ते अम्मा व पाटील यांच्या आश्वासनाने व आग्रहानेच.' येथे त्यावेळी स्व. श्री कल्लाप्पा निटवे यांनी बांधलेली वरील इमारत व खालील मुनिगुंफेशिवाय काही नव्हते. शेवटी अम्मांच्या प्रेरणेने पाच-सहा लोकांनी प्रतिवर्षी १०० रु. देण्याचे मान्य करून संस्थेचा शुभारंभ आषाढ शुद्ध बीज रोजी झाला.

आज संस्थेस ३५ वर्षे होतात. पू. अम्मानी त्या पहिल्या दिवसापासून किंबहुना संस्था गर्भात असल्यापासून आजतागायत अविच्छिन्नपणे तिची मातेप्रमाणे जोपासना केली, भरणपोषण केले, वाढ केली व या रूपाने या भागात जिनधर्माची अपूर्व सेवा केली आणि महा-राजांनाही त्या सेवेचे भाग्य त्यांनी आणून दिले, महाराजांवर प्रेमाचा अखंड वर्षाव केला हा त्यांचे महान उपकारच होय. येथील लहान बालकासाठी, कार्यकर्त्यांसाठी त्यांनी जे अपार कष्ट उपसले ते विसरता येणे शक्य नाही. विरोधी लोकांचे नाना बोल, अपवाद, टीका आदी शांतपणे सहन करून त्यांनी आमरण निर्भयतेने सेवा केली, स्वतः अत्यंत निःस्पृह वृत्तीने राहिल्या, स्वतःसाठी समाजाला एक कपर्दिकही मागितली नाही ही त्यांची फार मोठी तपस्याच होय. आ. अमृतचंद्रांनी पुरुषार्थसिद्ध्युपाय ग्रंथात प्रभावना अंगाचे स्वरूप

सांगताना म्हटले आहे.-

**आत्मा प्रभावनीयो रत्नत्रयतेजसा सततमेव ।**
**दानतपोजिनपूजाविद्यातिशयैश्च जिनधर्मः ।।**

या आर्षवचनानुसार अम्मांनी स्वतः रत्नत्रयाने पवित्र होऊन धर्मसेवेत आपले समग्र जीवन व्यतीत केले. याहून जीवनाची सफलता व सार्थकता ती कोणती असणार ? स्वतः दान देणे वा दुसऱ्याकडून देवविणे दोन्ही सारखेच पुण्यावह. अम्मांनी दोन्ही गोष्टी केल्या. आपले जीवन दिलेच, त्याबरोबर घराघरांतून कणा-कणांने दानही देवविले. तेही फक्त याच संस्थेकरिता नाही, जेथे गेल्या, राहिल्या तेथील संस्थेसाठी व समाजासाठी त्यांनी देह झिजविला, करता येईल ते सारे केले.

समीचीन ज्ञानप्राप्तीसाठीही त्यांची अखंड धडपड असे. तत्त्वार्थसूत्र, गोम्मटसार (जीवकाण्ड व कर्मकाण्ड) सारख्या गहन ग्रंथांचे सूक्ष्म अध्ययन करण्यात त्या रूची घेत, जाण-कारांशी तासनब तास चर्चा करीत. चातुर्मासातील बहुभाग समय स्वाध्यायात घालवीत, तेवढ्यासाठी कारंज्या, अक्कालकोटसारख्या दूरगावी प्रवास करीत, तेथे रात्रंदिवस स्वतः वाचन मनन करून श्रावक-श्राविकांचे स्वाध्यायाची रूची वाढवीत. प्रेरणा देऊन त्यांचा उत्साह वाढवीत. कोणी त्यागी वगैरे आल्या तर त्यांच्या आहारादि व्यवस्थेत जातीने लक्ष घालीत. स्वतःला थोडा त्रास झाला, आबाळ झाली तर चालेल पण दुसऱ्यांची होऊ नये यासाठी फार जपत. त्यांना धर्मसेवेची व स्वाध्यायाची प्रेरणा देत. त्यांच्या इहपर-कल्याणाची काळजी वाहात. सारांश त्यांनी आपले संपूर्ण जीवन सार्थकी लावले व दुसऱ्यांचेही लावण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आणि शेवटी आदर्श समाधी साधून आपला नरभव सफल केला.

**'नरभव अनूपम कनकघरपर मणिमयी कलसा धरे ।'**

असे आपण नेहमी म्हणतो. अम्मानी ते प्रत्यक्षात करून दाखविले. **'वक्तुं सुकरं, दुष्करं पर्यवसितुम्।'** म्हणतात; सल्लेखना-समाधीच्या गोष्टी बोलणे सोपे आहे, करणे अत्यंत कठीण, अल्सरच्या रोगात भाले टोचल्यासारख्या भयंकर तीव्र वेदना होत असताही तत्त्वज्ञानाचा आश्रय घेऊन त्या शांतपणे सहन करणे हे वाटते तितके सोपे नाही. अम्मानी ही कठीण गोष्टही करून दाखविली. सोऽहं या परमात्म-स्वरूप महा-मंत्राचे सतत स्मरण करीत त्यांनी अपार धैर्याने रोग परीषहावर विजय मिळिवला. उन्हाळ्याचे दिवस, आतूनही तीव्र दाह, हंडाभर पाणी प्याला तरी भागणार नाही अशी तहान, पण पाण्याचा थेंबही जाता जात नाही ही स्थिती! एकदाच तो ही जलाहार, वाटीभर पाणी घेण्यास अर्धा तास लागे. अशा समयीही धर्मावर अपार श्रद्धा, संयमावर प्रगाढ विश्वास, अर्हच्चरणी निर्व्याज भक्ती, त्याचेच अखंड ध्यान-चिंतन टिकून राहणे महाकठीण; पण पू. अम्मानी ते साध्य केले; मनुष्यजन्माचे शिखर गाठले, व्रती जीवनावर सुवर्ण कलश ठेवून ते सार्थ केले.

**सहगामीकृतं तेन, धर्मसर्वस्वमात्मनः ।**
**समाधिमरणं येन, भवविध्वंसि साधितम् ।।**

'ज्याने संसाराचा अंत करणारे पापनाशक असे समाधीमरण साधले त्याने आपले धर्म-सर्वस्व बरोबर नेले.' या पं. आशाधरजींच्या थोर उक्तीप्रमाणे अम्मानी समाधिमरण साधून महान कल्याणकारी धर्मधन आपल्याबरोबर नेले आहे यांत शंका नाही.

धर्मसेवा व समाजसेवा करावी, तर अशी व समाधीही साधावी, तर अशी याचे स्पृहणीय चित्र त्यांनी आपल्या एकंदर जीवनाने आपणांसर्वासमोर उभे केले आहे. 'सेवाधर्म' परम गहन मानला जातो. मोठमोठ्या योगींनाही तो कठीण असतो. शरीराची माती होणारीच असते. त्या धर्मासाठी, स्वपर-कल्याणासाठी अधिकात अधिक उपयोग करून माती होऊ देण्यातच जीवनाची सार्थकता आहे हे महान सत्य पू. अम्मानी पुनः एकवार आपल्या आदर्श जीवनाने आविष्कृत केले. त्यांच्या अमर आत्म्यास सदैव शांती व सुखलाभ होऊन परंपरेने परमात्मपदाची प्राप्ती होवो हीच हार्दिक कामना याप्रसंगी आपण सारे भावू या.'

# पुण्यश्लोक धर्ममाता कंकुमावशी

**पंडित श्री धन्यकुमार भोरे** कारंजा

पुण्यश्लोक स्वर्गीय धर्मचंद्रिका कंकुबाई उर्फ कंकुमावशी. जैन समाजाचे दादाभाई नौरोजी म्हणून सुप्रसिद्ध असलेले स्वर्गीय सेठ हिराचंद नेमचंद दोशी सोलापूर यांच्या सुविद्य कन्या होत. भारतामध्ये उद्योगाचा नवा मनू आणणारे प्रसिद्ध उद्योगपती स्व. वालचंद हिराचंद यांच्या भगिनी आणि प्रसिद्ध उद्योगपती स्व. सेठ मोतीचंद यांच्या मातोश्री होत. १८७६च्या ज्येष्ठ वद्य १३ला त्यांचा जन्म झाला. अवघ्या सात वर्षांच्या असतानाच त्यांचे मातृछत्र हरवले. त्याकाळची रुढी मोडून वडिलांनी त्यांना प्राथमिक शिक्षण दिले. साधारणतः वयाच्या बाराव्या वर्षी मुंबई येथील श्री. गौतमचंद शहा यांच्याशी त्यांचा विवाह झाला.

वयाची पंचविशी उलटण्यापूर्वीच त्यांना वैधव्य आले. पिताश्री खंबीरपणे त्यांच्या पाठीशी उभे होते. पिताश्रींच्या मार्गदर्शनाखाली पद्धतशीर स्वाध्याय अध्ययन करून पायाशुद्ध धर्मज्ञान घेतले. बुद्धीमध्ये स्वाभाविक विचक्षणता होतीच. शालेय शिक्षण बेताचेच असले तरी चौकस बुद्धी व चोखंदळ वृत्ती होती. स्त्रियांच्या संस्थेमध्ये अनाहूत येणारा माणूस कोण कशासाठी येतो? हे त्या बरोबर ओळखत. उडत्या पाखरांची पंखे मोजावी इतकी दृष्टीची झेप होती. त्यामुळे एक प्रकारचा वाचक व आदरयुक्त दराराही होता.

मुंबईच्या मगनबाई श्राविकाश्रमात त्या विद्याभ्यासासाठी जाऊन राहिल्या. श्री. कंकुबाईनी धर्मज्ञान प्राप्त करून जैन धर्मविषयक आणि स्त्रीसुधारणा विषयात खूप लेखन केले. त्यांचा पहिला लेख १९०६ मध्ये सप्त तत्वे म्हणून जैन गजट मध्ये प्रकाशित झाला. त्यांनी चिकित्सक दृष्टीने रत्नकरंड, द्रव्यसंग्रह, तत्वार्थसूत्र, प्रवचनसार इत्यादी ग्रंथांचे अध्ययन केले. त्यामुळे त्यांच्या विचारात प्रगल्भता व ज्ञानाला खोली प्राप्त झाली. अनेक हिंदी व संस्कृत ग्रंथांचा मराठी अनुवाद केला. त्यांनी दशलक्षण धर्म नामक पुस्तक स्वयं लिहून प्रकाशित केले. द्रव्यसंग्रह, अनित्य पंचाशत, सल्लेखना, समयसार कलश इत्यादी ग्रंथांचा मराठी अनुवाद ही त्यांनी केला.

श्री वीरसेन स्वामी भट्टारक हे अध्यात्माचे प्रभावी प्रवक्ते होते. ही कीर्ती ऐकून त्या दोन-तीन वेळा कारंजास आल्या, परंतु १९१८ मध्ये त्यांचे कारंजास पुन्हा आगमन झाले. त्यांनी ब्र. देवचंद यांना समयसार श्रवण करण्यासाठी कारंजाला जाण्याची प्रेरणा दिली. म्हणूनच श्री. देवचंद काकांचे पाय कारंजास लागले व कारंजा हे त्यांचे कार्यक्षेत्र बनले. ब्र. देवचंद यांना त्यांनी मानसपुत्र मानले होते. आयुष्याचा बराच काळ जवळपास वीस वर्षे त्या आपल्या मानसपुत्र सोबत कारंजा येथे राहिल्या. कारंजाच्या गुरुकुल स्थापनेचे श्रेयही त्यांना जाते. पुढे गावातील स्त्री-पुरुषांमध्ये ही शिक्षणासंबंधी व धर्म ज्ञानासंबंधी आवड निर्माण केली. प्रथम पाठशाळा व पुढे श्राविकाश्रम संस्थेमध्ये रूपांतर होण्यामध्ये पूज्य कंकुमावशींची प्रेरणा हे निमित्त होतेच. त्याबरोबरच त्यांनी आपले सर्व स्त्रीधन ही या कार्यासाठी अर्पण केले. हे योगदान त्याकाळी अनमोल असे होते.

त्यांनी १९०६ पासून जवळपास ३४ वर्षे भारतभर प्रवास करून महलोद्धाराची मशाल मिरवली. कित्येक महिला परिषद, महिला संमेलने यांचे अध्यक्ष पद भूषविले. १९०८ मध्ये दमोह

येथील अधिवेशन व १९०९ च्या द भा सभेच्या अधिवेशनाच्या वेळी स्त्री शिक्षणावर अत्यंत प्रभावी वक्तव्य केले. समाजातील अनेक कुरुढींविरुद्ध त्यांनी आपल्या भाषणाद्वारे प्रहार केला. १९१२मध्ये चतरबाई विद्यालय स्थापना करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. १९३७ पर्यंत त्यांनी आपले बहुभाग जीवन कारंजातच व्यतीत केले. विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी धार्मिक पुस्तके मराठीत उपलब्ध व्हावीत, म्हणून आपले स्त्रीधन वेचून कंकुबाई पाठ्यपुस्तक माला स्थापन केली. याच काळात सिद्धक्षेत्र मुक्तागिरी येथे ब्रह्मचर्य व्रत व प्रतिमेची दीक्षा घेतली. पुढे अनेक व्रतांचे त्यांनी ग्रहण केले व धर्मप्रभावना केली. त्यांनी कवलचांद्रयान यासारखे दुर्धर तप ही कारंजा आश्रमात पार पाडले.

कारंजाला राहत असताना आरा येतील जिनमंदिराच्या प्रतिष्ठापनेसाठी उपस्थित होत्या. या महोत्सवप्रसंगी त्यांचा विलक्षण प्रभाव दिसून आला. आरा येथील जैन समाजाने त्यांना अत्यंत सन्मानपूर्वक धर्मचंद्रिका ही पदवी बहाल केली. आत्मकल्याण व सहजच परकल्याण यांचा संगम कंकुमावशींच्या ठिकाणी होता, म्हणून पंडित देवकीनंदनजी यांनी सार्थ उद्गार काढले की कंकुबाईनी जैन समाजावर अत्यंत मोठे उपकार केले आहेत. त्यांच्या या धर्मसेवा व समाजसेवेबद्दल समाज त्यांचा चिरकाल ऋणी राहील. याप्रमाणे आपले जीवन सार्थ करून त्यांनी १९३९ मध्ये मुंबई येथे आपले शरीर समाधीपूर्वक सोडले. त्यांचा मृत्यू हे समाजाचे कधीही भरून न येणारी हानी आहे.

(पूर्वी लिहिलेल्या लेखावरून सारांश रूपाने हा लेख घेण्यात आला आहे.)

---

# सुश्री बजाआत्या कळमकर

ले.- **सुश्री मंजुळाताई रुईवाले**

कारंजाला कन्या पाठशाळा ही सुश्री बजाआत्या कळमकर (श्री प्रद्युम्नसावजी डोणगावकर यांच्या भगिनी) यांच्या मूळ प्रेरणेचे फळ आहे. श्री महावीर ब्रह्मचर्याश्रम जैन गुरुकुलातील मुले व श्राविकाश्रमातील मुली यांचे ते मातृछत्रच होते. सन १९७३ मध्ये त्यांचा स्वर्गवास झाल्यानंतर सुश्री मंजुळाताई रुईवाले यांनी लिहिलेल्या व मासिक 'सन्मति'मध्ये प्रकाशित झालेल्या त्यांच्या स्मृतिलेखाचा हा काही अंश....

आज आत्याबाईंना इहलोक सोडून दोन महिने होत आले आहेत, पण त्यांची स्मृती मन:पटलावरून दूर होत नाहीत.....

....बजाआत्या यांचा जन्म डोणगावकर घराण्यात पिता श्री चांगासा व माता सौ. राधाबाई यांच्या पोटी सन १८९२ मध्ये देऊळगाव-राजा येथे झाला. त्यावेळी कुटुंबाची आर्थिक स्थिती अतिशय हलाखीची होती. पण मातोश्री राधाबाई अत्यंत धीरगंभीर व चिकाटीने परिस्थितीवर मात करणाऱ्या होत्या. त्याकाळी देखील धर्मप्रभावनेच्या कार्यात अग्रेसर होत्या. पतिनिधनानंतरही त्यांनी हिंमतीने मुलांचे संगोपन करून स्वाभिमानाने जगण्याचे बाळकडू त्यांना पाजले....

....वयाच्या अवघ्या आठव्या वर्षी बजा-आत्यांचा विवाह अमरावती येथील मोतीलालजी कळमकर यांच्यासह झाला. परंतु दुर्दैवाने दोन वर्षांतच प्लेगच्या साथीमध्ये मोतीलालजींचा स्वर्गवास झाला. वय लहान, शिक्षणाचा अभाव,

त्यात वैधव्याची ही आपत्ती....! अवघ्या दहाव्या वर्षी विधवा झालेल्या आपल्या बहिणीला प्रद्युम्नसावजींनी माहेरी आणले....

त्याच दरम्यान सुप्रसिद्ध महिलारत्न सुश्री कंकुबाई व सुश्री मगनबाई स्त्रीशिक्षणाचा प्रसार करण्यासाठी कारंजास आल्या होत्या. तो काळ, ती परिस्थिती फार कठीण होती...... मुलींना शिक्षण देणे, त्यातही विधवेस शिकविणे म्हणजे तर महापापच...!

वरील उभयता महिलारत्न अशाच स्त्रियांच्या उद्धारासाठी झटत होत्या. त्यांनी प्रद्युम्नसावजींना समजावून सांगितले व त्यांच्यासोबत बजाआत्या मुंबईच्या रतनबाई श्राविकाश्रमात दाखल झाल्या.....

.....मूळचीच तल्लख बुद्धी, जोडीला भरपूर चिकाटी व प्रयत्न, त्यामुळे बजाआत्यांनी अल्पावधीतच शालेय व धार्मिक शिक्षणात उत्तम प्रगती केली.....पण त्याच सुमारास (सन १९१८) इकडे माहेरी बंधू श्री गोविंदसावजींच्या धर्मपत्नीचे निधन झाले..... घरी आम्ही सगळी भावंडे लहान वयाची..... त्यांच्या संगोपनासाठी नाइलाजाने बजाआत्यांना कारंजास परत यावे लागले... पुढील शिक्षणाचा विचार सोडून प्राप्त परिस्थितीला साथ द्यावी लागली....

....त्याचवेळी प. पू. समंतभद्र महाराज (तत्कालीन ब्र. देवचंदजी शहा) कारंजास आले होते..... श्री महावीर ब्रह्मचर्याश्रम जैन गुरुकुल संस्थेची पायाभरणी सुरू होती.... मुख्य कार्य संचालक ब्र. देवचंदकाका होते, पण त्यांचा उत्साह टिकवून कार्य सफलतेमध्ये श्री. प्रद्युम्नसावजींनी जसा सिंहाचा वाटा उचलला, तसेच आत्याबाईंनी मातृ वात्सल्याने अंतर्गत व्यवस्थापनाची जबाबदारी उचलली...... मुलांच्या खाण्या-पिण्याची व्यवस्था, आजारपणात सेवा-शुश्रुषा करण्यासाठी, अडचणी सोडविण्यासाठी त्या जणू मातृछत्र होत्या.....

.......याचबरोबर समाजातील स्त्रिया व मुलींकरिता काहीतरी व्हावे, ही सतत अंतरीची इच्छा होती. कोणताही गाजावाजा न करता, स्वतःच्या तुटपुंज्या ज्ञानाच्या बळावर त्यांनी या कार्याला आपल्या घरातूनच प्रारंभ केला. रोज दहा-पंधरा मुली-बायकांना घेऊन शिकविण्यास सुरुवात केली...... त्याला त्यांच्या उत्साहाने व चिकाटीने जैन कन्या पाठशाळेचे रूप मिळाले.. जवळपास १५० मुली-महिला धार्मिक शिक्षण घेऊ लागल्या.त्या स्वतः तर शिकवीतच, इतरांनाही जे येत असेल ते शिकवण्याची प्रेरणा देत....

.......पाठशाळेचे रूपांतर श्राविकाश्रमात झाल्यानंतर सुरुवातीला सात-आठ वर्षे कार्यभार त्यांनीच सांभाळला. पू. कंकुमावशींच्या शेवटच्या आजारपणात वैय्यावृत्ताचा मोठा वाटा त्यांनी उचलला....

...... त्यांची लोकसंग्राहक वृत्ती, चिकाटी व दुसऱ्यांना कार्य प्रवृत्त करण्याची पद्धती प्रशंसनीय होती. अपुऱ्या शिक्षणाच्या बळावर एवढे कार्य करण्याची धडाडी, तर पूर्ण शिक्षणाचा केवढा लाभ समाजाला झाला असता!.......

...... प. पू. गुरुदेवांविषयी त्यांच्या जीवनात प्रगाढ श्रद्धा होती.... धर्मासंबंधी अतीव प्रेम होते...... अनेक वर्षांपूर्वीच सातवी प्रतिमा ग्रहण करून संयम मार्गावर त्या अग्रेसर झाल्या होत्या. स्वाध्यायाची अत्यंत रुची असल्याने सतत अभीक्ष्ण ज्ञानोपयोग सुरू असे. शेवटच्या क्षणापर्यंत त्या ह्या कार्यात सावध होत्या..... त्यांच्या एका-एका गुणाचे स्मरण होऊन अंत:करण भरून येते. त्यांच्या पवित्र स्मृतींना वंदन!

पश्चिम महाराष्ट्रातील जैन सत्साहित्य मिळण्याचे एकमेव ठिकाण......

**भरतेश ग्रंथ भांडार**

मु. पो. बाहुबली, ता. हातकणंगले,
जि. कोल्हापूर ४१६ ११०

**संपर्क :** श्री बाबगोंडा पाटील,८७६७५४१७१०

# आदर्श जीवनाचा वस्तुपाठ–
# श्री. माणिकभून शहा (आ.चंद्रमती माताजी)

महिलारत्न सुश्री कंकुबाई शहा (उत्तर आयुष्यात क्षु. जिनमती माताजी) यांनी मागील शतकात महिलांच्या शिक्षण व सक्षमीकरणासाठी केलेले कार्य सुविख्यात आहे. गावोगावी व्याख्याने, प्रवचने आदिंच्या माध्यमातून त्या सतत समाज प्रबोधन करीत असत.

अशीच एक सन १९३५ची घटना ! तीर्थक्षेत्र गजपंथ येथे पंचकल्याणिक महोत्सव सुरू होता. तेथे कंकुमावशींची भेट झाली एका तरुण विधवा स्त्रीसह.... तिच्यासोबत तिची पाच वर्षांची गोंडस मुलगी देखील होती ! त्याकाळी तरुण विधवा स्त्रीचे आयुष्य म्हणजे नैराश्याची अंधारी गुहाच जणू! सोलापूर जवळील मोहोळ या खेड्यातील या मायलेकी म्हणजे श्रीमती माणिकबाई हिराचंद शहा व विद्युल्लता शहा. पुढील वैराण वाटचालीस काही सम्यक् दिशा मिळावी, यासाठी कंकुमावशींनी त्यांना कारंजा लाड येथील श्राविकाश्रमात येण्यासाठी आग्रह केला.

वाचकहो, आज विचार केला तर वाटते की, सुमारे ९० वर्षांपूर्वीचा तो काळ...... वाहतुकीची साधने मर्यादित, संपर्क साधनांची उपलब्धता त्याहून नगण्य...... अशावेळी सासर–माहेरच्या लोकांपासून दूर....४०० कि.मी. अंतरावर, कारंजासारख्या एका लहानशा गावात एका तरुण विधवा स्त्रीने आपल्या मुलीला घेऊन शिकायला जायचे ठरविणे..... यासाठी किती मोठ्या मनोधैर्याची गरज असेल.....!!

पण मावशींचा उदात्त हेतू ध्यानात घेऊन माणिकबाई लहानग्या विद्युल्लतासह कारंजा श्राविकाश्रमात येऊन पोहचल्या. तेथे पू. गुरुदेव, कंकुमावशी व अन्य स्थानिक ज्येष्ठ भगिनींच्या छत्रछायेखाली दोघीही आश्वस्त झाल्या,त्यांचे पुढील शिक्षणही सुरु झाले.

हायस्कूल शिक्षणासाठी विद्युल्लता सोलापूर येथील श्राविकाश्रमात गेल्या. तेथे शिक्षण क्षेत्रातील, सेवा क्षेत्रातील व संयम क्षेत्रातील नित्य नवीन शिखरे पादाक्रांत करीत नावलौकिक मिळवीत राहिल्या !

माणिकभून मात्र कारंजालाच सेवायोग देत राहिल्या. सुमारे वीस–बावीस वर्षे अत्यंत निष्काम भावनेने त्यांनी संस्थेच्या व्यवस्थापनात मदत केली. तेथील मुलींचा मातेच्या मायेने सांभाळ केला. सोबतच संस्कृत व धार्मिक विषयांचे अध्ययन–अध्यापन सुरू ठेवले.

व्यक्तिगत जीवनात माणिकभून हळूहळू वैराग्याच्या मार्गावर अग्रेसर होत होत्या, व्रताचरण अत्यंत सावधानतेने करीत होत्या. त्यावेळी कारंजात आलेल्या पू. १०८ आचार्य श्री वीरसागरजी महाराजांजवळ त्यांनी सप्तम प्रतिमा ग्रहण केली.

हळूहळू व्यावहारिक जीवनापासून विरक्ती वाढत गेली. त्यांचे उच्च ध्येय लक्षात घेऊन श्राविकाश्रम संस्थेने त्यांना कृतज्ञतापूर्वक निरोप दिला. सन १९५५ मध्ये त्यांनी आ. वीरसागरजी महाराजांजवळ क्षुल्लिका पदाची व नंतर आर्यिका पदाची दीक्षा घेतली. त्यांचे दीक्षेनंतरचे नामकरण आ. चंद्रमती माताजी असे होते. भारतभर विहार करीत माताजींनी उत्कृष्ट धर्मप्रभावना केली. शेवटी दि.३० एप्रिल १९७४ रोजी राजस्थानमधील टोंक या ठिकाणी सल्लेखना पूर्वक समाधी साधली.

कंकुबाई श्राविकाश्रमातील अद्ययावत विशाल ग्रंथालयास 'आ. चंद्रमती ग्रंथालय' हे नाव देऊन संस्थेच्या या प्रारंभिक निःस्पृह सेवाव्रती धर्मात्म्याची स्मृती चिरंतन जतन करण्याचा प्रयत्न आम्ही केला आहे.

श्रद्धेय माणिकभूनचे समग्र जीवन म्हणजे, जीवनात आलेल्या विपत्तीला उन्नतीची पायरी कशी बनवावी, एका आदर्श जैन महिलेचे जीवन कसे असावे याचा जणू वस्तुपाठच आहे! त्यांच्या स्मृतींना सविनय आदरांजली!!

**– प्रज्ञा डोणगावकर**

# गुरुकुलमाता गजाबेन शहा – एक कृतार्थ जीवन

**–प्रज्ञा डोणगावकर**

आजच्या भौतिक युगात प्रसिद्धीसाठी आसुसलेले लोक सर्वत्र दिसून येतात, परंतु पर्वताएवढे कार्य करूनही अणुएवढीही प्रसिद्धीची इच्छा न करणाऱ्या व्यक्ती विरळच असतात! आदरणीय गजाभून त्यापैकीच एक म्हणाव्या लागतील!! जीवनभर त्यांनी गुरुकुल संस्था व समाज यांच्या हितासाठीच प्रयत्न केले, परंतु भाषण, लेखन, व्यासपीठ हार–तुरे यापासून त्या सदैव अलिप्त राहिल्या. जीवनाचा मुख्य उद्देश तर आत्मकल्याण करणे हाच होता, परंतु त्यांच्या विवेकपूर्ण, योजक व धडाडीच्या स्वभावामुळे संस्थांची सेवा व उन्नती सहजच घडत गेली.

**बालपण व शिक्षण –**

शब्दांमध्ये सामावण्याच्या पलीकडचं अक्षरशः शतपैलू व्यक्तिमत्त्व होतं भूनचं! आणि तेवढाच रोमांचक त्यांचा जीवन प्रवास!! दि.२१ नोव्हेंबर १९१३ रोजी अक्कलकोट येथे जैन गुजर ज्ञातीतील मेहता कुटुंबात त्यांचा जन्म झाला. वडिलांचे नाव फुलचंदजी मेहता व आईचे नाव राजूबाई. वडील अत्यंत धार्मिक व उदार, जणू देवमाणूसच! आई अत्यंत स्वाभिमानी, बुद्धिमान व शिस्तप्रिय! चारही मुलांच्या शिक्षणाकडे काटेकोर लक्ष ठेवून असलेली!! परंतु दुर्दैवाने भूनच्या वयाच्या नवव्या वर्षी हे मातृछत्र हरपले.

मुले लहान असल्यामुळे आजोळी धाराशिवला (उस्मानाबाद) गांधी परिवारामध्ये पाठविली गेली. आजोळचे गांधी घराणे अतिशय श्रीमंत, प्रतिष्ठित, विद्वान ! जणू राजघराणेच !! घरात सारखी माणसांची वर्दळ, सतत राजकारणाचे वातावरण....! भूनचे एक मामा फुलचंदजी गांधी प्रसिद्ध वकील होते. ते हैदराबाद स्टेटचे शिक्षण मंत्री होते व पं.जवाहरलालजी नेहरूंच्या अत्यंत मर्जीतले होते. आजोबा नेमचंदजी गांधी स्वतः संस्कृत विद्वान होते. घरी नेहमी विद्वान मंडळींची उठबस असे.

अशा राजघराण्यात भून जणू एखाद्या राजकन्येसारख्या लाडाकोडात वाढत होत्या. त्या भागातील रझाकारांच्या राजवटीमुळे शाळेतील शिक्षण बंद पडले, परंतु घरी संस्कृत व धार्मिक शिक्षण सुरूच होते. मूळच्या कुशाग्र बुद्धीच्या भून स्वयंअध्ययनाच्या विशिष्ट पद्धतीमुळे शिक्षकांवर फारसे अवलंबून न राहता अनेक विषयात पारंगत झाल्या.

**श्रेयसाच्या शोधात –**

ही सुंदर, तेजस्वी व बुद्धिमान कन्या वयात आली व आजोबांनी वर संशोधन सुरू केले. भूनना संसाराच्या व्यामोहात अडकायचेच नव्हते, पण आजोबांना त्यांचा विवाह ही आपली जबाबदारी वाटत होती. लग्न टाळण्यासाठी भूननी अनेक प्रकारे प्रयत्न केले, परंतु आजोबांनी त्यांची ऐकले नाही. श्री. वालचंद शहा गुंजोटीकर यांच्याशी त्यांचा विवाह निश्चित केला. कसाबसा विवाह सोहळा पार पडताच भूननी एक धाडसी पाऊल उचलले. त्याच लग्न मंडपात त्यांनी आजोबांना सांगितले, 'विवाहानंतर आता माझ्यावर तुमचा अधिकार राहिला नाही. तुम्ही तुमचे कर्तव्य पार पाडले आहे, आता मी माझे कर्तव्य करण्यासाठी स्वतंत्र आहे.' अंगावर घातलेले मंगळसूत्रासहित सर्व दागिने उतरवून ठेवून त्या माहेरी निघून गेल्या. त्या तेजस्वी स्त्रीत्वापुढे कोणीही बोलू शकले नाही....!

आजोळच्या वैभवात त्यांचे मन रमत नव्हते. जीवनध्येयाचा मार्ग दृगोच्चर होत नव्हता. धर्मशिक्षण व आत्मकल्याण यासाठी कुणाचा आश्रय

घ्यावा हे देखील स्पष्ट होत नव्हते. अशातच १९३६ साली कारंजाचे प्रद्युम्नसावजी डोणगावकर व क्षुल्लक समंतभद्रजी उस्मानाबादला आले होते. चर्चेतून भूनना आशेचा किरण दिसला व आजोबांची परवानगी घेऊन भून त्या उभयतांबरोबर धार्मिक शिक्षणासाठी कारंजास आल्या. नियतीने जणू तथाऽस्तु म्हटले व पुढे त्या किरणाची लखलखती प्रकाशवाटच बनली!

**कारंजा लाड आगमन–**

कारंजातील वातावरण खूप वेगळे, खानपान वेगळे, राहणी वेगळी....या सगळ्यांशी जुळवून घेत भूननी सावजी काका व महाराज यांच्याकडे जैन धर्मातील अनेक ग्रंथांचा सखोल अभ्यास केला. त्यासाठी संस्कृत–प्राकृत भाषांवर प्रभुत्व मिळविले. बनारसला पंडित फूलचंदजी सिद्धांत शास्त्री यांच्याजवळ पुढील विशेष अध्ययनासाठीही त्या गेल्या. इतरही अनेक विद्वानांकडून विद्यार्जन केले.

**कंकुबाई श्राविकाश्रमासाठी योगदान –**

त्याच दरम्यान सन १९३३मध्ये कारंजा येथे पू. गुरुदेवांच्या प्रेरणेने व श्रद्धेय कंकुमावशींच्या योगदानामुळे कंकुबाई श्राविकाश्रमाची स्थापना झालीच होती. भून जवळपास सोळा वर्षे या संस्थेत राहिल्या. संस्थेतील मुली–महिलांना शिकविणे, आश्रमाचे व्यवस्थापन पाहणे, शाळेचा विस्तार, आवश्यक इमारतींचे बांधकाम, खर्चाचे नियोजन, देणग्या मिळविणे इत्यादी अनेक प्रकारे त्यांनी संस्थेच्या विकास कामांमध्ये स्वतःला झोकून दिले. छात्रावासातील विद्यार्थिनींचे आरोग्य, अभ्यास, छंद, संवयी याकडे त्यांचे बारकाईने लक्ष असे. आश्रमच्या संचालिका आदरणीय मंजुताईंची त्या जणू मोठी बहीण, म्हणजे 'भून' झाल्या ! कारंजाच्या या वास्तव्यात त्यांना सावजी काकांसारखे वत्सल पिता, तात्याजींसारखा नम्र भाऊ, मंजुळाताईंसारखी प्रेमळ बहीण असा रक्ताच्या नात्याचा नव्हे, पण आत्मीय स्नेहाचा गोतावळा मिळाला.

**बाहुबली (कुंभोज) गुरुकुल –**

पुढे पूज्य गुरुदेवांनी कुंभोज बाहुबली येथे मुलांचे गुरुकुल सुरू केले. त्या निमित्ताने गुरुदेवांचा विहार त्या भागात झाला. तेथील व्यवस्थेसाठी भूनने देखील बाहुबलीला प्रयाण केले. काट्याकुट्यांनी भरलेल्या जंगलातील तो डोंगर हळूहळू एक सुंदर रमणीय तीर्थक्षेत्र बनला. भूननी त्या डोंगराला फळाफुलांच्या झाडांची हिरवी लेणी चढवली भगवान बाहुबली महामूर्तीची उभारणी करण्यात आली, सोबतच अनेक मंदिरे व गुरुकुलांच्या वास्तू उभ्या राहिल्या. शेकडो मुलांना सुसंस्कारित करणारे एक कल्याणकारी संस्कार केंद्र म्हणून अल्पावधीतच बाहुबली गुरुकुलाची ख्याती सर्वत्र पसरत राहिली. या सगळ्यामागे भूनची योजकता, दूरदृष्टी व अथक परिश्रम आहेत.

गुरुकुल संस्थांवर ओढवणाऱ्या अनेक आपत्ती–अडचणी त्या निर्भयपणे दूर करीत असत.

**पुन्हा एकदा कारंजा....!–**

सन १९८८मध्ये पू. गुरुदेवांची सल्लेखना–पूर्वक समाधी झाली. त्यानंतर कारंजा येथे कंकुबाई श्राविकाश्रम संस्थेला पुन्हा एकदा भूनच्या दीर्घ वास्तव्याचा व अमूल्य मार्गदर्शनाचा लाभ मिळू लागला.

त्यांच्याच प्रेरणेची व अथक प्रयत्नांची फलश्रुती म्हणून सन १९९० ते २००० या कालावधीमध्ये श्राविकाश्रम संस्थेमध्ये अनेक आवश्यक नूतनीकरण प्रकल्प, नवीन बांधकाम योजना पूर्णत्वास गेल्या. वयाची ८० वर्षे ओलांडल्यानंतरही गावोगावी फिरुन दान संकलन करणे, इमारतींचे सुयोग्य आराखडे बनविणे, बांधकाम उपयुक्त व सौंदर्यपूर्ण व्हावे याची काळजी घेणे, कारागीरांकडून सुबक कामे करवून घेणे, शाळेच्या व विद्यार्थिनींच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणे......इत्यादी विविध कामे भूनना करताना मी जवळून पाहिली आहेत. कामे फक्त उरकून टाकलेली तर त्यांना मान्यच नसे. हाती घेतलेल्या प्रत्येक छोट्या–मोठ्या कामात व्यवस्था, सौंदर्य व उपयुक्तता निर्माण करणे, हे त्यांचे खास

कौशल्य होते. त्याची प्रचीती आम्हाला पदोपदी येत असे.....त्यातून खूप काही शिकायला मिळालं आहे ! त्या कालखंडात आम्ही कार्यकर्त्यांनी संस्थेसाठी आणि मुलींसाठी जे जे मागावे, ते ते भूनकडून मिळाले! तेही विना विलंब !! भून जणू कल्पवृक्षच होत्या संस्थेसाठी !!

म्हणूनच सन २०१३च्या ऑक्टोबरमध्ये भूनच्या वयाचा शतकपूर्ती सोहळा, श्राविकाश्रम संस्थेचा ८० वर्षपूर्ती समारोह व नवीन वास्तू संकुलाचे उद्घाटन हा त्रिवेणी आनंद महोत्सव श्राविकाश्रमच्या प्रांगणात आम्ही मोठ्या उत्साहाने साजरा केला होता.

**स्त्री हिताची जपणूक–**

भून कोठेही असोत, अनेक महिला घरातील सासुरवास, भांडणे, व्यसने यांना कंटाळून भूनपाशी आपली दुःखे उघड करीत असत. भून त्या स्त्रियांचे, त्यांच्या सासरच्या लोकांचे समुपदेशन करीत, प्रसंगी कानउघाडणी करीत. जर पती व्यसनी असेल तर त्याला देवासमोर बसवून व्यसन त्यागाचा नियम देऊन मगच त्या महिलांची पाठवणी करीत. अनेक स्त्रियांना त्यांनी आत्महत्येपासून वाचवून त्यांचे संसार सुरळीत मार्गी लावले आहेत, त्यांना उपजीविकेचे मार्ग सुचविले आहेत. बाहुबलीला त्यांच्या घराच्या अंगणातील झाडाखाली बसून मी असे न्याय निवाडे होताना अनेकदा अनुभवले आहेत....! महिला सक्षमीकरण याहून वेगळे काय असते?

**गुणवैशिष्ट्ये –**

स्वीकृत कार्य परिपूर्णत्वाला नेण्यासाठी लागणारी चिकाटी व नियोजन कौशल्य भूनकडे उपजतच होतं. त्यांचा दुसरा महत्त्वाचा गुण म्हणजे सेवाभाव! त्यागी–मुनी, विद्वान, अपंग–आजारी व्यक्ती, निराश्रित महिला–पुरुष, गुरुकुलांतील मुले–मुली.... एवढेच नव्हे तर, पशुपक्षी, वृक्ष–वनस्पती यांचीही सेवा करावी ती भूननीच ! आयुर्वेद व निसर्गोपचाराच्या प्रयोगसिद्ध अभ्यासातून त्यांनी अनेकांना व्याधिमुक्त केले होते. सल्लेखना घेऊ इच्छिणाऱ्या कित्येक व्रती साधकांच्या वैयावृत्ताची संपूर्ण चोख व्यवस्था भूनने अतिशय आत्मीयतेने केल्याचे सर्वविश्रुतच आहे. आहारदान, औषधदान, अभयदान व शास्त्रदान अशा चारही प्रकारच्या दानांमध्ये त्या तत्पर होत्या.

भूनच्या व्यक्तिमत्त्वाचा अजून एक विशेष म्हणजे, त्यांच्या जीवनात असणारा अहिंसा –सत्य–न्याय–सदाचार–व्यवस्था यांचा आग्रह; अर्थात् असत्य, अन्याय, अनीती, अव्यवस्था यांच्याबद्दल असणारी पराकोटीची चीड ! व्यक्तीमध्ये नाही, तर गुणांमध्ये अनुराग हे त्यांचे जीवन सूत्र होते व त्यात कसलीही तडजोड त्यांना मान्यच नसे.

भूनचे वाचन विपुल होते, विद्यार्जनामध्ये काटेकोरपणा होता. वयाच्या शतायुषी वळणावर देखील समोरच्या वक्त्याची व्याकरण किंवा शब्दार्थ किंवा तत्त्वार्थ याबाबत झालेली सूक्ष्म चूक देखील त्यांच्या लगेच ध्यानात येत असे. स्वतः त्यांनी कधीही प्रवचन किंवा व्याख्यान दिले नाही, लेख लिहिले नाहीत किंवा कार्यकर्त्यांना पाठही दिले नाहीत; परंतु त्यांचे समग्र जीवन हाच एक आदर्श वस्तुपाठ होता!

**शुभंकर संकेत**

आदरणीय डॉ. सुजाताताई (आता पू. आर्यिका १०५ श्री शुद्धोऽहंश्री माताजी) यांच्या उल्लेखाशिवाय हे लेखन अपुरे असेल! भूनना सुजाताताई सारखी मेधावी, नम्र, सोशिक, जणू सेवामूर्ती अशी धर्मपुत्री आणि सुजाताताईंना भूनसारखी असामान्य व्यक्तिमत्त्वाची धर्ममाता, गुरुमाऊली मिळणे, हा नियतीचा एक शुभंकर संकेतच म्हणावा लागेल!

शतकोत्तर जीवनाची कृतार्थता अनुभवलेल्या या गुरुकुल मातेच्या स्मृतींना कृतज्ञतापूर्वक विनयांजली!

**वर्गणीदारांना विनंती...**

**कृपया वार्षिक व आजीवन वर्गणीदारांनी आपली वाढीव वर्गणी पाठवून सहकार्य करावे..**

# पद्मश्री पंडिता सुमतीबाई शहा : एक दिव्य तेजोमय व्यक्तिमत्त्व

**श्री. अनंत बाबुराव बळ्ळे,** सोलापूर

साधी राहणी, उच्च विचारसरणी, निःस्वार्थ सेवा आणि अपार प्रेमाचा संगम म्हणजेच पद्मश्री पंडिता सुमतीबाई शहा. त्यांचे जीवन म्हणजे एक प्रेरणादायी ग्रंथ जिथे प्रत्येक पानावर त्याग, करुणा, ज्ञान आणि धर्मनिष्ठेची अक्षय गाथा लिहिलेली आहे.

सुमतीबाई शहा म्हणजे एक कल्पवृक्ष, जी प्रत्येकाची इच्छा पूर्ण करणारी, गरजूंना आधार देणारी आणि प्रत्येक स्त्रीच्या अंतरात्म्यात आत्मनिर्भरतेचे बीजं रोवणारी, कधी संजीवनी, कधी वात्सल्यमूर्ती, तर कधी कामधेनू बनून त्या समाजाच्या अनेक स्तरांमध्ये आपले स्नेहसिंचन करत राहिल्या.

त्यांनी श्रमाला प्रतिष्ठा दिली, शिक्षणाला अध्यात्माची जोड दिली आणि शिक्षणाचे माध्यम करून हजारो स्त्रियांना आत्मोन्नतीच्या मार्गावर नेले. त्याग, धर्मनिष्ठा, करुणा, परोपकार आणि दान या सर्व सद्‌गुणांची त्या मूर्तिमंत प्रतिमा होत्या.

क्षुल्लिका राजुलमती माताजींच्या सान्निध्यात राहून त्यांनी श्राविकाश्रमाचे नेतृत्व केले. त्या आश्रमाच्या फक्त व्यवस्थापिका नव्हत्या, विधवा, अपंग, निराधार आणि परित्यक्ता महिलांसाठी त्या आशेचा दीपस्तंभ ठरल्या. केवळ सहानुभूती पुरेशी नाही हे जाणून त्यांनी त्या स्त्रियांना ज्ञानदान, आत्मसन्मान आणि स्वावलंबनाची शिदोरी दिली.

त्यांचे धर्मकार्य हे बाह्य कर्मकांडापुरते मर्यादित नव्हते. त्यांच्या भक्तीचा ओघ पारंपरिक श्रद्धा आणि सामाजिक चेतना यांचा सुंदर संगम होता. त्यांचे आई-वडील स्वर्गीय आचार्य श्री शांतिसागर महाराजांचे भक्त होते, आणि सुमतीबाईंनी ती परंपरा एक अखंड वाहती सरिता म्हणून आपल्या जीवनात टिकवली.

त्यांच्या बोलण्यात अमोघ प्रभाव होता. श्रोत्यांना मंत्रमुग्ध करणारी त्यांची वक्तृत्वशैली म्हणजे केवळ शब्दांचा खेळ नव्हे, तर हृदयाशी संवाद साधणारी एक दिव्य शक्ती होती. त्या केवळ वक्ता नव्हत्या, त्या विचारांचं सर्जक रूप होत्या - सामाजिक आणि धार्मिक विचारांची जागृती घडविणाऱ्या एक विदुषी होत्या.

त्यांचे नाव 'सुमती' म्हणजे सुसंस्कृत, विवेकी आणि ममतेची धनी. या नावाला त्यांनी आपल्या कृतीने आणि आचारधर्माने सार्थ केले. ज्ञानगंगा, धर्मसेवा, सामाजिक कार्य आणि स्त्री सक्षमीकरण या सर्वांच्या संगमातून त्यांचे व्यक्तिमत्त्व निर्माण झाले.

त्यांचे जीवन म्हणजे निःस्पृह, निष्काम कर्मयोग, त्यांनी आपल्या चारित्र्याच्या तेजाने जैन इतिहासात आपले नाव सुवर्णाक्षरांनी कोरून ठेवले आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत भारत सरकारने त्यांना 'पद्मश्री' पुरस्काराने गौरवले. पण खरे गौरवकर्ते आपण सारे आहोत कारण आपल्यातली प्रत्येक माता, भगिनी, कन्या आणि युवक त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊ शकतो, नवा मार्ग शोधू शकतो. चला, आपण सर्व मिळून त्यांच्या कार्याचा वारसा पुढे नेऊया.

# धर्ममाता मंजुळाताई रुईवाले

ले .- **प्रांजली रुईवाले,** कारंजा लाड

निष्काम कर्मयोगी, वात्सल्य मूर्ती, विवेकी, सहनशील, गुणग्राहक, कार्यकुशल, अनुशासनप्रिय, दक्ष, कर्तव्यकठोर, उत्कृष्ट वक्ता आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे संस्थेमधील मुलींच्या धर्ममाता ! अशा अनेक गुणांनी अलंकृत असलेली व्यक्ती, अनेक महिलांचा आश्रय आणि असंख्य बालिकांच्या जीवनाचा प्रकाश, जणू संस्थेचा प्राण असणाऱ्या आदरणीया मंजुताई– आमच्या ताई!

कारंजातील सुखवस्तू धार्मिक अशा डोणगावकर घराण्यात दि. १९ नोव्हेंबर १९१७ रोजी ताईंचा जन्म झाला. पू. गुरुदेवांचे अनन्य सहयोगी श्री प्रद्युम्नसावजी डोणगावकर यांचे धाकटे बंधू श्री गोविंदसावजी हे त्यांचे वडील. ताई केवळ एक वर्षाच्या असताना त्यांना मातृवियोग सहन करावा लागला. परंतु मोठे बाबा, बजाआत्या, गुजाआत्या असलेल्या मोठ्या संयुक्त कुटुंबात त्यांचे संगोपन मोठ्या प्रेमाने होत राहिले.

शालेय शिक्षण जेमतेम इयत्ता चौथीपर्यंत झाले व तत्कालीन रिवाजाप्रमाणे वयाच्या अवघ्या बाराव्या वर्षी कारंजातीलच श्री रतनलालजी रुईवाले यांच्याशी त्यांचा विवाह झाला. रतनलालजी पू. गुरुदेवांचे परम शिष्य होते. संसार सुरू झाला, बाळाची चाहूलही लागली. पण दुर्दैवाने तेव्हाच पतिराजांचा अकाली मृत्यू झाला. पण पोटातील अंकुरासाठी ताईनी स्वतःला कसेबसे सावरले.

त्याकाळी अशी परिस्थिती म्हणजे निराशेची अंधारी गुहाच असे! पण माहेर व सासरची समंजस वडीलधारी मंडळी ताईच्या आयुष्याला काही विधायक दिशा मिळावी, यासाठी प्रयत्नशील होती.

नुकतीच १९३३ मध्ये कंकुबाई श्राविकाश्रमाची स्थापना झाली होती. मुलगा गजकुमारच्या जन्मानंतर ताईंनी संस्थेच्या कामात लक्ष घालायला सुरुवात केली. प. पू. गुरुदेव, प्रद्युम्नसावजी, गजाभून, बजाआत्यासारख्या ज्येष्ठ व अनुभवी मंडळींच्या मार्गदर्शनात ताईंना संस्था संचालनाचे प्राथमिक धडे मिळाले. पुढे मिळत गेलेल्या प्रत्येक अनुभवाला ताईंनी गुरु बनविले. अशाप्रकारे जीवनात आलेल्या विपत्तीला ताईंनी उन्नतीची पायरी बनविली!

त्या काळात एखाद्या प्रतिष्ठित घरातील विधवेने घराबाहेर पडून काही काम करणे, मग ते धार्मिक स्वरूपाचे का असेना, हेच मोठे धाडसाचे होते! त्यामुळे साहजिकच ताईंना थोडी नाराजी, थोडा विरोध सहन करावाच लागला, पण त्या आपल्या कामापासून अजिबात विचलित झाल्या नाहीत.

ताईंनी संस्था संचालनातील सगळे बारकावे शिकून घेतले. त्या मुलींच्या मनाच्या शिल्पकार बनल्या. आपल्या आचार–विचारांनी जीवन पवित्र बनवावे, आळसाला दूर सारून जीवनात आशेचा शुभदीप सतत तेवत ठेवावा, कष्ट–संकटांना मिठी मारून धैर्याने त्यातून बाहेर पडावे–यशस्वी व्हावे, श्रद्धा अविचल ठेवून सांप्रत जीवन पुरवावे.... अशा ताईंच्या संस्कारांनी समृद्ध झालेली छात्रावासातील मुलगी ताईंच्या आशीर्वादाचे पाथेय घेऊन बाहेरच्या जगात निर्भयपणे वावरत असे.

अशा शेकडो मुली (स्वतः आई–आजी झालेल्या!) जेव्हा आज पुन्हा संस्थेमध्ये येतात, ताईंच्या फोटो समोर नतमस्तक होतात, ताईंच्या आठवणी भरभरून सांगतात, त्यावेळी आपलेही हृदय कृतज्ञतेने भरून येते.

ताईंनी अनेक मुली-महिलांची जीवने सावरली आहेत-फुलविली आहेत. या कामाचे मोल काही उदाहरणांवरून स्पष्ट होते - एक आई, तिची मूक-बधिर तरुण मुलगी व लहान नात. संस्था त्यांचे आधारस्थान, अर्थातच ताई त्यांची माता! ताईंनी त्यांना आश्वस्त केले, मुलीचे शिक्षण तर केलेच, सोबतच मातृवत् प्रेमही केले. आज त्या नातीचा बहरलेला व संस्कारित संसार बघताना ताईंची आठवण झाल्याशिवाय राहत नाही.

स्व. सुलोचना मोतीराम मुळावकर या ताईंची मानस कन्या! त्या म्हणतात, 'मंजुताई म्हणजे आमच्या आईच! काय दिले नाही ताईंनी? जन्मभर पुरेल एवढी संस्कारांची शिदोरी दिली आहे आम्हाला....!' आणि त्यांचे यजमान ताईंच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करताना म्हणतात, 'ताई, तुमच्या मुलीला मी नाही सांभाळले, तिनेच मला सांभाळले!'

मुंबईच्या शिल्पा सावंत या मुलीला तिच्या आजीने श्राविकाश्रमात आणले होते. सुरूवातीला ती बावरली होती. पण नंतर ती लिहिते, 'पू.मंजुताईंनी मला मायेने जवळ केले. आईसारखे वात्सल्य मला त्यांनी दिले. ज्याप्रमाणे वाळवंटातून चालताना बऱ्याच वेळानंतर दिसणारी हिरवी झाडी मनाला सुखावून जाते, त्याप्रमाणे मला संस्थेत आल्हाददायक वाटत असे...'

ताईंचे वैयक्तिक जीवन व्रतस्थ, संयमित, सेवाशील, निःस्पृह होते. कामाव्यतिरिक्तच्या वेळात सतत ज्ञानोपासना सुरू असे. प्रसिद्धीपराङ्मुख वृत्तीमुळे स्वतःच्या कार्याचा कधीही गाजावाजा होणार नाही, याची त्या दक्षता घेत.

'मी केवळ आज्ञापालन केले' एवढेच त्या म्हणत असत. संस्थेचे संचालिका पद सलग पन्नासाहून अधिक वर्षे सांभाळल्यानंतर, दीर्घकालीन आजाराने दि.२ मे १९९४ रोजी ताईंचा स्वर्गवास झाला.

संस्थेच्या सेवेला वाहून घेतलेल्या ताईंच्या कार्यासाठी साने गुरुजींनी वापरलेला **'जीवंत पूजा'** हा शब्द खरोखरच सार्थ वाटतो!

## बा. ब्र. विमलाताई मुराबट्टे, भोज

न्यायतीर्थ बा. ब्र. विमलताई मुराबट्टे (अक्का) यांचे दि. १४ जुलै २०२१ रोजी हुपरी येथे स्वर्गवास झाला. त्या चारित्र चक्रवर्ती आचार्यश्री शांतिसागरजी महाराज यांचे भाव भोज (जि. बेळगाव) येथील होत्या. तथापि कारंजा (लाड) येथील कंकुबाई श्राविकाश्रम येथे त्यांनी माध्यमिक शिक्षण घेतले. धर्माचे बाळकडू येथेच त्यांना मिळाले. काही काळ तेथेच त्यांनी अध्यापनाचे काम ही केले. अनेक मुलींना धर्माचे धडे दिले. तेथील वातावरण असाय्य झाल्याने त्या गावी परत आल्या. पण पू. गुरुदेवश्री समंतभद्र महाराज यांच्यावर त्यांची परम भक्ती आणि गुरुकुल शिक्षणाविषयी अपार लळा कायम होता.

साधर्मीविषयीचे वात्सल्य असीम होते. न्यायतीर्थ, जैन धर्माच्या अभ्यासिका, सल्लेखना साधणाऱ्यासाठी त्या **समाधिदूत** होत्या. आज अखेर त्यांनी अनेक साधू, व्रती व श्रावकांची सद्गती साधून सल्लेखनेचे संस्कार आत्मसात केलेच होते. अक्का एक चालते बोलते धर्मपीठ होत्या. बाहुबलीतील कोणत्याही कार्यक्रमप्रसंगी किंवा शिक्षण शिबीरात त्यांना आमंत्रित केले तर त्या कधी ही नकार किंवा अडचण सुद्धा सांगत नव्हत्या. शिबीरात विशेष करून प्रौढापेक्षा मुलांना शिकविण्यात त्यांना विशेष रूची वाटत होती. किती ही तास घेण्यास सांगितले तर ते कधी थकत नव्हत्या किंवा कंटाळा करत नव्हत्या. धर्मशिक्षणाच्या क्षेत्रात त्यांनी अतुलनीय कार्य केले आहे. गावोगावी अनेक शिबिर, विधान, पंचकल्याणक इ.प्रसंगी आवर्जुन हजेरी लावत व सदुपदेश करीत असत.

# दागिन्याचा नव्हे तर शिक्षणाचा हट्ट धरा : वासाहतिक महाराष्ट्रातील जैन स्त्रियांचे शिक्षण

– **रूपेश मडकर,** विभाग प्रमुख, इतिहास विभाग,
शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर. संपर्क – ८०८७९२६६५२

अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात आणि एकोणिसाव्या शतकात ब्रिटिशांचे आगमन झाल्यानंतर, महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात शिक्षणाच्या क्षेत्रात मोठे बदल घडून आले. ब्रिटिश शासकांनी आपल्या प्रशासकीय सोयीसाठी आणि पाश्चात्त्य संस्कृतीचा प्रसार करण्यासाठी आधुनिक शिक्षणाची सुरुवात केली.

**या काळातील शिक्षणाची प्रमुख वैशिष्ट्ये:**

**१. मिशनऱ्यांचे योगदान :** ख्रिश्चन मिशनऱ्यांनी सुरुवातीला शाळा उघडल्या, विशेषतः गरीब आणि मागासलेल्या लोकांसाठी. त्यांनी मुलींच्या शिक्षणालाही प्रोत्साहन दिले. त्यातून पारंपरिक भारतीय समाजात मोठे बदल घडून आले.

**२. सरकारी शाळांची स्थापना :** ब्रिटिशांनी मुंबई, पुणे यांसारख्या शहरांमध्ये इंग्रजी शाळा आणि महाविद्यालये सुरू केली. लॉर्ड मेकॉलेच्या शिक्षण धोरणामुळे इंग्रजी शिक्षणाला महत्त्व प्राप्त झाले.

**३. सामाजिक सुधारणेची लाट :** महाराष्ट्रात महात्मा जोतिराव फुले, सावित्रीबाई फुले, गोपाळ गणेश आगरकर, महर्षी धोंडो केशव कर्वे, पंडिता रमाबाई यांसारख्या समाजसुधारकांनी शिक्षणाच्या प्रसारासाठी, विशेषतः स्त्रिया आणि अस्पृश्यांच्या शिक्षणासाठी मोठे कार्य केले.

**४. महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले :** यांनी १८४८मध्ये पुण्यात मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली व स्त्रीशिक्षणासाठी आयुष्यभर संघर्ष केला.

✻ महर्षी कर्वे : यांनी स्त्रियांच्या उच्च शिक्षणासाठी आणि विधवांच्या पुनर्वसनासाठी महत्त्वाचे कार्य केले. १९१६ मध्ये त्यांनी भारतातील पहिले महिला विद्यापीठ (श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ) स्थापन केले.

✻ पंडिता रमाबाई : यांनी शारदा सदन आणि मुक्ति सदन यांसारख्या संस्था स्थापन करून निराधार स्त्रिया आणि विधवांना शिक्षण व आश्रय दिला.

**४. पारंपरिक शिक्षणातून आधुनिक शिक्षणाकडे संक्रमण :** पारंपरिक गुरुकुल पद्धती व मदरशांच्या जागी आधुनिक अभ्यासक्रम, इंग्रजी भाषा आणि पाश्चात्त्य विज्ञान यांचा समावेश असलेल्या शाळा येऊ लागल्या.

**५. शिक्षणाचा प्रसार :** सुरुवातीला उच्चवर्गीय पुरुषांपुरते मर्यादित असलेले शिक्षण हळूहळू मध्यमवर्ग आणि इतर समाजापर्यंत पोहोचू लागले. अर्थात, ब्रिटिशांनी अत्यंत तुटपुंजी रक्कम शिक्षणासाठी उपलब्ध केल्याने हे शिक्षण वरच्या वर्ग–जातींमधील पुरुषांपुरतेच मर्यादित राहिले. शिक्षणात ब्रिटिशांनी 'झिरपता सिद्धांत' (Down filtration Theory) घेतल्याने शिक्षण तथाकथित खालचा वर्ग अथवा जाती आणि स्त्रियांपर्यंत पोहचण्यास बराच कालावधी जावा लागला.

या काळात शिक्षणाचे महत्त्व वाढत गेले आणि ते सामाजिक प्रगतीचे एक महत्त्वाचे साधन बनले. तथापि, शिक्षण सर्वांपर्यंत पोहोचण्यास अजूनही अनेक अडथळे होते यात सामाजिक विरोध पारंपारिक व आधुनिक दोन्ही ज्ञानावर असलेली मक्तेदारी ब्राह्मण जातींना सोडायची नव्हती!, आर्थिक समस्या आणि पारंपरिक रूढी यांचा समावेश होता.

**आधुनिक वासाहतिक महाराष्ट्रातील जैन स्त्रियांचे शिक्षण व व्यवस्थात्मक अडथळे**

आधुनिक वासाहतिक काळात,

महाराष्ट्रातील जैन स्त्रियांच्या शिक्षणाची स्थिती अनेक स्तरांवर आव्हानात्मक होती. जरी एकूणच महाराष्ट्रात शिक्षणाची लाट आली होती आणि समाजसुधारक स्त्रियांच्या शिक्षणासाठी प्रयत्न करत होते, तरी जैन समाजात काही विशिष्ट व्यवस्थात्मक अडथळे होते, परिणामी शिक्षणाचा वेग मंदावला.

**१. परंपरागत रूढी आणि सामाजिक मानसिकता :** जैन समाज, विशेषतः दिगंबर पंथातील काही जाती, पारंपरिक मूल्यांना अधिक महत्त्व देत होते. स्त्रियांची मुख्य भूमिका गृहिणी आणि माता म्हणून पाहिली जात असे. त्यामुळे, मुलींना शाळेत पाठवण्याऐवजी त्यांना घरगुती कामात आणि धार्मिक संस्कारात गुंतवून ठेवण्याला प्राधान्य दिले जाई. बालविवाहाची प्रथाही अजूनही मोठ्या प्रमाणात अस्तित्वात होती, त्याने मुलींचे शिक्षण थांबत असे.

**२. आर्थिक आणि व्यावसायिक प्राधान्यक्रम :** जैन समाज हा प्रामुख्याने व्यापार आणि व्यवसायात गुंतलेला होता. त्यामुळे, मुलांच्या शिक्षणाला व्यावसायिक दृष्टिकोनातून महत्त्व दिले जात असे, जेणेकरून ते कुटुंबाचा व्यवसाय पुढे नेऊ शकतील. मुलींच्या शिक्षणाकडे मात्र 'गुंतवणूक' म्हणून पाहिले जात नसे, कारण त्यांना कुटुंबाच्या आर्थिक उन्नतीमध्ये थेट योगदान देण्याची अपेक्षा नव्हती. काही कुटुंबांत, मुलींना लहानपणापासूनच घरगुती व्यवसायात मदत करण्यास सांगितले जाई, त्यामुळे त्यांना शाळेत जाण्यासाठी वेळ मिळत नसे.

**३. स्वतंत्र शिक्षण संस्थांचा अभाव :** सुरुवातीच्या काळात जैन स्त्रियांसाठी स्वतंत्र शाळा किंवा शिक्षण संस्था फारशा नव्हत्या. मिशनऱ्यांच्या किंवा सरकारी शाळांमध्ये मुलींना पाठवण्यास अनेक जैन कुटुंबे कचरत असत, कारण त्यांना पाश्चात्त्य संस्कृतीचा किंवा अन्य धर्माचा प्रभाव आपल्या मुलींवर पडेल अशी भीती होती. त्यामुळे, शिक्षण उपलब्ध असले तरी, ते स्वीकारण्याची सामाजिक तयारी कमी होती.

**४. पडदा पद्धतीचा प्रभाव (काही प्रमाणात) :** काही जैन जातींमध्ये पडदा पद्धती किंवा स्त्रियांना घराबाहेर पडण्यावर निर्बंध होते, ज्यामुळे त्यांना शाळेत जाणे अवघड होत असे. सार्वजनिक ठिकाणी मुलींना पाठवण्यावर सामाजिक दबाव होता.

**५. शिक्षिकांचा अभाव :** मुलींना शिकवण्यासाठी योग्य आणि त्याच समाजातील शिक्षिका मिळणे हे एक मोठे आव्हान होते. पुरुष शिक्षकांकडून शिकण्याला अनेक कुटुंबे अनुकूल नव्हती.

**६. जागरूकतेचा आणि नेतृत्वाचा अभाव :** सुरुवातीच्या काळात जैन समाजात स्त्रियांच्या शिक्षणासाठी पुढाकार घेणारे समाजसुधारक किंवा नेते तुलनेने कमी होते. इतरांनी सुरू केलेल्या चळवळींचा थेट आणि तात्काळ प्रभाव जैन समुदायावर दिसला नाही. परंतु कालांतराने श्री. हिराचंद नेमचंद दोशी यांच्या सारख्या सुधारकांनी शिक्षणासाठी पुढाकार घेतला असला तरी त्यांनाही पुरुषसत्ताकाच्या मर्यादा ओलांडता आल्या नाहीत.

तथापि, विसाव्या शतकाच्या सुरुवातीला, आधुनिक शिक्षणाचे महत्त्व हळूहळू जैन समाजातही रुजू लागले. उदारमतवादी जैन कुटुंबे आणि काही समाजधुरीणांनी मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यास सुरुवात केली. जैन शिक्षण संस्थांनी (उदा. काही जैन बोर्डिंग आणि शाळा) स्त्रियांसाठी शिक्षणाचे दरवाजे उघडले. महात्मा फुले, कर्वे यांच्या कार्याचा प्रभाव अप्रत्यक्षपणे जैन समाजावरही झाला. हळूहळू स्त्रियांच्या शिक्षणाविषयीची मानसिकता बदलू लागली. या व्यवस्थात्मक अडथळ्यांवर मात करत, हळूहळू जैन स्त्रियांनी शिक्षणाच्या संधींचा लाभ घेण्यास सुरुवात केली आणि आधुनिक महाराष्ट्राच्या विकासात आपले योगदान दिले. आज अनेक जैन स्त्रिया उच्चशिक्षित असून विविध क्षेत्रांत यशस्वी आहेत, जे त्या काळातील संघर्षाचे आणि बदलाचे प्रतीक आहे. अर्थात, हे बदल एकाएकी झाले नाहीत. तसेच सुरुवातीचे प्रयत्न हे पुरुषसत्ताक व धार्मिक सत्तेच्या चौकटीत झाल्याचे लक्षात घ्यावे लागते.

**आधुनिक काळातील जैन स्त्रियांचे शिक्षणातील योगदान–**

दक्षिण भारत जैन सभेच्या (तत्कालीन नाव

दक्षिण महाराष्ट्र जैन सभा) सन १८९९ मध्ये झालेल्या स्तवनिधी येथील पहिल्या सभेत गोदुबाई आदिराज उपाध्ये यांनी 'स्त्री शिक्षणाची आवश्यकता' यावर भाषण केले. या स्त्रीचे भाषण म्हणजे महाराष्ट्रातील जैन स्त्री शिक्षणाची पायाभरणी करणारी घटना ठरली. यातून पुढे दक्षिण महाराष्ट्र जैन सभेने या विषयावर भर दिला. जैन महिला परिषदेची स्थापना झाल्याने स्त्रियांच्या शिक्षणास चालना मिळाली. सभेच्या १९०३ सालच्या वार्षिक अधिवेशनात स्त्री शिक्षणाचा ठराव मंजूर करण्यात आला. सभेच्या अंतर्गत 'स्त्रीशिक्षण विभाग' सुरु करण्यात आला. श्री जिनविजय मासिकाच्या नोव्हेंबर १९०६च्या अंकात स्त्री शिक्षणाला चालना मिळावी म्हणून पुढील विचार प्रकाशित केले –

'.....त्याचप्रमाणे स्त्रियांना शिक्षण न दिल्यामुळे आम्ही आमच्या समाजाची अर्धी शक्ती कमी करत असून सुशिक्षित आयांपासून मुलांना मिळणाऱ्या शिक्षणाच्या आड येत आहोत. इतकेच नव्हे तर शिक्षणाच्या अभावामुळे आयांची मानसिक शक्ती खुरटून गेल्याकारणाने पुढील संततीवर तितक्या मानाने हानीकारक परिणाम घडून येण्यास कारणीभूत होत आहोत. नवरा-बायकोच्या शिक्षणामध्ये इतके अंतर राहिल्यामुळे, घरी एकमेकाच्या सहनुभूतीपासून मिळणारे सुख आणि उत्तेजन याला आपण अंतरणार आहोत. सारांश, घरी अशिक्षित स्त्रीरूपी अज्ञानाची लोहश्रृंखला एका पायात अडकवून दुसऱ्या पायाने आम्ही पुढे जाण्याचा प्रयत्न करीत आहोत. अशाने आम्हास मजल मारता येणार नाही. स्त्रीशिक्षणाची टूम आधुनिक लोकांनीच काढली आहे असे नाही. आमच्या राष्ट्रीय इतिहासाला सुशोभित करणाऱ्या अशा थोर आणि तेजस्वी स्त्रिया आमच्या समाजामध्ये निर्माण झाल्या होत्या. हे तुम्हाला माहीत असेलच. त्याच सनातन हेतूस चिकटून ही सभा प्रयत्न करीत आहे. यात नवीन काही नाही.'

श्री जिनविजय मधील वरील विचार हे तत्कालीन सुधारकांचे व स्त्रीशिक्षण पुरस्कर्त्यांचे प्रातिनिधिक विचार म्हणून पाहता येतात. अर्थात, सुक्ष्मपणे वाचता वरील विचारांना तत्कालीन पुरुषसत्ताक विचारांच्या मर्यादा असल्याचेही लक्षात येते. असे असले तरी, या विचारांशी संवादी राहत, संघर्ष करत स्त्री शिक्षणाची वाटचाल होत राहिली. द. भा. जैन सभेच्या १९०६च्या महिला अधिवेशनात अध्यक्षपदावरून बोलताना पं. मगनबाई यांनी **'भगिनींनो, तुम्ही पुरुषांजवळ कपडेलत्ते, दागदागिने अगर इतर कशाबद्दलही आग्रह धरू नका. पण शिक्षणाचा आग्रह धरा. तुमचे कल्याण ज्ञानात आहे, ऐश्वर्यात नाही.**' स्त्री शिक्षणाच्या या प्रयत्नातील महत्त्वाचे पाऊल म्हणजे दि. ३१.१.१९०८ रोजी कोल्हापूर येथील 'जैन श्राविकाश्रम' या मुलींच्या शिक्षण संस्थेचे उद्‌घाटन पंडिता मगनबाई यांच्या शुभहस्ते झाले. यावेळी श्रीमती उमाबाई तात्या पाटील, श्रीमतीबाई बापूराव कोकीळ, श्रीमती शामाबाई मोरुसे व सौ. ज्ञानमतीबाई लठ्ठे यांनी आपली नावे दाखल केली. सौ. गोदुबाई आदिराज उपाध्ये या आश्रमातील पहिल्या शिक्षक होत्या. मगनबाई या महिलेने विसाव्या शतकाच्या सुरवातीस स्वतःचे वैयक्तिक दुखः दूर सारून स्त्री शिक्षणासाठी व उन्नतीसाठी मोठे प्रयत्न केले. त्यांचा तत्कालीन रिवाजाप्रमाणे वयाच्या तेराव्या वर्षी विवाह झाला. परंतु वयाच्या अठराव्या वर्षीच त्यांना वैधव्य प्राप्त झाले. त्यांचे वडील शेठ माणिकचंद जव्हेरी यांनी आपल्या मुलीस माहेरी आणून शिक्षणाची व्यवस्था केली. मगनबाईंनी स्वतः शिक्षण घेतले, धर्मशिक्षण घेतले आणि अज्ञानात अडकलेल्या महिलांना शिक्षण घेण्याची प्रेरणा दिली. कोल्हापूर येथील श्राविकाश्रमानंतर सोलापूरच्या धर्मचन्द्रिका कंकुबाई व अंकलेश्वरच्या पं. ललिताबाई यांच्यासह पं. मगनबाई यांनी अहमदाबाद येथे श्राविकाश्रमाची स्थापना २५ ऑक्टोबर १९०९ रोजी केली. काही अडचणींमुळे १९१२ मध्ये हा श्राविकाश्रम मुंबई येथे हलवण्यात आला. त्यामुळे मुंबई व आसपासच्या महिलांच्या शिक्षांची सोय झाली. याच

श्राविकाश्रमाचे नाव १९१८मध्ये रतनबाई रुक्मीणीबाई असे नामकरण करण्यात आले.

| अ. नं. | विद्यार्थिनीचे नाव | गांव | जात. | वय. | कुमारी सौभाग्यवती विधवा | काय शिकते. | कोणत्या शाळेत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्रीमती आवटे. | खडकलाट | पंचम | १९ | सौभाग्यवती | इंग्रजी ५ वी | फीमेल हायस्कूल |
| २ | श्यामाबाई मोरूसे | कोल्हापूर | पंचम | २४ | विधवा | प्रायमरी ट्रेनिंग ३ रे वर्ष | फीमेल ट्रेनिंग कॉलेज |
| ३ | तानुबाई चौधरी | सोलापूर | सेतवाळ | १९ | सौभाग्यवती | प्रायमरी ट्रेनिंग प्रिपरेटरी | सेवासदन |
| ४ | त्रिवेणी रणदिवे | सोलापूर | सेतवाळ | २२ | सौभाग्यवती | " | " |
| ५ | गयाबाई जवडे | सोलापूर | सेतवाळ | १७ | सौभाग्यवती | " | " |
| ६ | श्रीमती कळंत्रे | औरवाड | पंचम | २३ | विधवा | इंग्रजी २ री | " |
| ७ | अनंतमती उपाध्ये | सौंदत्ती | पंचम | १२ | कुमारी | इंग्रजी १ ली | फीमेल हायस्कूल |
| ८ | सुलोचना उपाध्ये | सौंदत्ती | पंचम | ६ | कुमारी | मराठी १ ली | फीमेल हायस्कूल |
| ९ | राजुबाई शहा | वडाळ | गुजर | १३ | कुमारी | मराठी १ ली | सेवासदन |
| १० | गोदूबाई मगदूम | तुळसवडे | पंचम | १० | कुमारी | मराठी १ ली | सेवासदन |
| ११ | मैनाबाई रणदिवे | सोलापूर | सेतवाळ | १० | कुमारी | मराठी ३ री | फीमेल हायस्कूल |

वरील विद्यार्थीनीपैकी नं. २, ६, व ९ नंबरच्या विद्यार्थिनींनी पुढे विविध श्रविकाश्रमांची फार चांगल्या रीतींनी अभिवृद्धी करून दाखविली. श्यामाबाई मोरुसे यांनी कोल्हापूरच्या, श्रीमती कळंत्रे यांनी सांगलीच्या व मुंबईच्या आणि राजूबाई शहा यांनी सोलापूरच्या श्राविकाश्रमांची अत्यंत परिश्रमपूर्वक व ध्येयनिष्ठेने वाढ केली.

तक्ता क्र. १ मैनाबाई श्राविकाश्रम, पुणे येथील विद्यार्थिनी( साभार – द. भा. जैन सभेचा इतिहास)

काही कारणांनी सन १९०८ मध्ये कोल्हापुरात सुरु झालेला श्राविकाश्रम १९११ मध्ये बंद पडला. मुलींच्या शिक्षणाची गैरसोय होऊ नये म्हणून मुलींना मुंबई येथील श्राविकाश्रमात जाण्यास सांगितले. परंतु दूरचे अंतर व मोठे शहर यामुळे बहुतेक कोणी गेले नाही. त्यामुळे विधवा, परित्यक्त्या तसेच मुलींच्या शिक्षणाची सोय करणे फार जरुरीचे होते. यावेळी सोलापूरचे श्री हिराचंद रामचंद गांधी (हरीभाई देवकरण) यांनी आपल्या उदार देणगीतून पुण्याजवळील हिंगणे बुद्रुक येथे श्री. धोंडो केशव कर्वे यांच्या अनाथ बालिकाश्रमाच्या आवारात दि. ६.०१.१९१८ रोजी 'मैनाबाई जैन श्राविकाश्रम' सोलापूरच्याच धर्मचन्द्रिका श्रीमती कंकुबाई यांच्या हस्ते सुरु करण्यात आला. कोल्हापूरच्या जैन श्राविकाश्रमातील पहिल्या विद्यार्थिनी श्रीमती शामाबाई मोरुसे या मैनाबाई श्राविकाश्रमाच्या लेडी सुप्रिटेंड म्हणून काम पाहू लागल्या तर कोल्हापूर श्राविकाश्रमाच्या पहिल्या शिक्षिका गोदुबाई उपाध्ये व त्यांचे पती श्री. आदिराज देवेंद्र उपाध्ये हे मैनाबाई जैन श्राविकाश्रमाचे व्यवस्थापक म्हणून काम पाहू लागले. परंतु पैशाच्या अभावी मैनाबाई श्राविकाश्रम दोन वर्षात बंद पडले. अशा कठीण प्रसंगी पुण्याच्या मैनाबाई श्राविकाश्रमात राहून शिक्षण घेतलेल्या बालविधवा श्रीमतीबाई कळंत्रे यांनी स्त्रीशिक्षणाची प्रेरणा घेऊन या कार्यात पुढाकार घेण्याचा निश्चय केला. सन १९२२च्या दक्षिण महाराष्ट्र जैन सभेच्या वार्षिक अधिवेशनात त्यांनी या भागात श्राविकाश्रम सुरु होण्याची आवश्यकता सभेच्या धुरिणांना पटवून दिली तसेच स्वतः जबाबदारी घेण्याची तयारी दर्शवली. त्यांच्या या निश्चयाला बळ देण्यासाठी श्रीमती शामाबाई मोरूसे व श्रीमती कोकीळ या निष्ठावंत कार्यकर्त्या श्राविकाश्रमाच्या तालमीतून तयार झाल्या होत्या. श्राविकाश्रमाची गरज व कार्यकर्त्यांची तळमळ पाहून सभेने १९२२च्या अधिवेशनात सांगलीला जैन महिलाश्रम सुरु करावा असा ठराव संमत केला. त्याप्रमाणे ९.४.१९२२

रोजी 'जैन महिलाश्रम, सांगली' रीतसर सुरु झाला. सभेच्या 'स्त्री शिक्षण विभागाचे' सेक्रेटरी श्री शांतगौडा रायगौडा पाटील यांनी हा महिलाश्रम सुरु करण्यासाठी खूप धडपड केली.

कळंत्रे आक्कांनी पुढे सन १९३२ साली निपाणी भागातील महिलांची व मुलींची शिक्षणाची सोय व्हावी म्हणून निपाणी येथे आश्रम व शाळा सुरु केली. या आश्रमाच्या संचालिका म्हणून श्रीमती कोकीळाबाई काम पाहू लागल्या. चार-पाच वर्ष निपाणीचा आश्रम व्यवस्थित सुरु होता. परंतु मुंबई श्राविकाश्रमाच्या संचालिका श्रीमती ललिताबाई यांचे निधन झाल्याने कोकीळाबाईंना मुंबईला जावे लागले. परिणामी हळूहळू निपाणी येथील महिलाश्रम बंद पडला. पूर्वी श्राविकाश्रमात फक्त राहण्याची सोय होत असे व बाहेरील शाळेत प्रवेश घ्यावा लागे. परंतु कळंत्रे आक्कांनी आश्रम (वसतिगृह) आणि शाळा असा एकत्रित प्रयोग प्रथम सांगलीत सुरु केला. त्यामुळे मुलींना शिक्षणाची अधिक मोकळी संधी उपलब्ध झाली. विविध ठिकाणच्या श्राविकाश्रमात शिकलेल्या मुलींनी, विधवा स्त्रियांनी स्त्री शिक्षणाची धुरा आपल्या खांद्यावर घेतली व जैन समाजातील मुलींचे शैक्षणिक व सामाजिक भविष्य सुनिश्चित केले असे कळंत्रे आक्का, शामाबाई मोरुसे, कोकिळाबाई यांच्या कृतीने सिद्ध केले. या स्त्रियांनी आपले वैयक्तिक दुःख बाजूला ठेवले, समाजाच्या व परिस्थितीच्या विपरीत त्यांनी या शिक्षण संस्थांना जिवंत ठेवण्यासाठी अनेक प्रकारचे कष्ट घेतले त्यातून स्त्री शिक्षणाची गुढी उभी राहिली. कार्यकर्त्यांच्या या प्रयत्नांना श्रीमती सीताबाई दावडा (नातेपुते) सारख्या दानशूर महिलांनी बळ दिले. त्यांनी सांगली येथील बोर्डिंगच्या बांधणीला देणगी दिली. त्यातून सांगली येथील रा. ध. दावडा दिगंबर जैन बोर्डिंग उभी राहिली. अन्य स्त्रियांच्या शिक्षणाला बळ मिळाले. त्यामुळे या भागातूनच जैन समाजातील पहिल्या महिला डॉक्टर मालतीबाई मुळे या पुढे आल्या. त्यांनी १९२०च्या सुमारास तत्कालीन मॅट्रीक नंतर एल. सी. पी. एस. हा डॉक्टरी अभ्यासक्रम पूर्ण केला. त्यांचे पती श्री. मुळे त्याकाळी सामाजिक जाणीवेतून आश्रमातील मुलींना इंग्रजी व गणित शिकवत असत. सन १८९९ साली द. भा. जैन सभेच्या पहिल्या अधिवेशनात स्त्री शिक्षणावर उत्स्फूर्त भाषण करणाऱ्या व श्राविकाश्रमातील पहिल्या शिक्षिका गोदुबाई उपाध्ये यांच्या कन्या सुलोचनाबाई अण्णासाहेब भोकरे यांनी अशा आश्रमातच आपल्या शिक्षणाचा 'ओनामासीधम' केला. सांगली आश्रमातूनही शिक्षण घेतले. पुढे त्यांनी अनेक परिषदांमधून भाषणे केली. जैन समाजातील सुधारणांना पुढे नेले. 'प्रगती आणि जिनविजय'चे संपादन, त्यांची सर्वात महत्त्वाची कामगिरी म्हणजे त्यांनी सन १९४०च्या दरम्यान द.भा.जैन सभेचा सचित्र संक्षिप्त इतिहास लिहिला. ज्या सभेच्या पहिल्या अधिवेशनात त्यांच्या आईने 'स्त्री शिक्षणाची आवश्यकता' या विषयावर भाषण दिले, श्राविकाश्रमाच्या पहिल्या शिक्षिका झाल्या, ज्या सभेने स्त्रियांना शिक्षणासाठी संस्था उभ्या केल्या, त्या सभेचा 'इतिहास' एका स्त्रीने लिहावा, ही माझ्या मते गोदुबाई उपाध्ये, कंकुबाई, मगनबाई, कळंत्रे आक्का, शामाबाई मोरूसे, कोकीळाबाई, ललिताबाई यासारख्या स्त्री शिक्षणासाठी आयुष्य देणाऱ्या स्त्रियांना त्यांनी केलेल्या कार्याची पावती दुसरी असू शकत नाही. आज एकविसाव्या शतकात स्त्री शिक्षण सहज उपलब्ध आहे, त्यामागे १९व्या-२०व्या शतकातील स्त्री-पुरुष कार्यकर्त्यांनी सर्व प्रकारचा त्याग केला, म्हणून हे शक्य झाले. याची आठवण महिलादिनी उजागर करणे, इतके तरी आपण करू शकतो.

**संदर्भ :**


१. दोशी, हिराचंद नेमचंद (संपा); जैनबोधक. १८८८-१८९९. सोलापूर.

२. पाटील, बी. बी. (संपा.); विसाव्या शतकातील जैन समाजसेविका. २०००. श्री. बा.भु. पाटील ग्रंथ प्रकाशन मंडळ, सांगली.

३. संगवे, विलास; दक्षिण भारत जैन सभेचा इतिहास. १९७६. दक्षिण भारत जैन सभा, सांगली.

# विनयांजली



पू. आर्यिका पार्श्वमती माताजी



धर्मचंद्रिका कंकुमावशी



पू. आर्यिका चंद्रमती माताजी

या अंकातील विविध लेखांमध्ये ज्या अनेक महिला रत्नांचा उल्लेख आलेला आहे, त्यापैकी काहींची छायाचित्रे या विभागात प्रस्तुत करीत आहोत.

# विनयांजली



स्व. श्रद्धेय गजाबेन शहा
(बाहुबली)



पद्मश्री स्व. पं.सुमतीबाई शहा
(सोलापूर)



स्व. पं.मंजुळाताई रुईवाले
(कारंजा)



स्व. पं.विद्युल्लताभून शहा
(सोलापूर)



स्व. सुश्री शांताताई कान्हेड
(कारंजा )

# विनयांजली



स्व. पंडिता मगनबाई



स्व. श्रीमती शामाबाई मोरूसे



स्व. श्रीमती सीताबाई दावडा



स्व. श्रीमती सुलोचनाबाई भोकरे



स्व. श्रीमती श्रीमतीबाई कोकीळ



स्व. आ. श्रीमतीबाई कळंत्रे



स्व. श्रीमती गोदुबाई उपाध्ये





स्व. नर्मदाबाई देवलसी, नागपूर

# विनयांजली



स्व. सोनाबाई जयकुमारजी किल्लेदार
(नागपूर)



स्व. सौ. सुंदराबाई गंगासावजी भोरे
(कारंजा लाड)



स्व. पद्माबाई जगदीशजी किल्लेदार
(नागपूर)



स्व. द्रौपदाबाई पन्नालालजी डोणगांवकर
(देऊळगाव राजा)



स्व. मनोरमाबाई मोतीचंदजी दर्यापूरकर
(नागपूर)



स्व. विमलाबाई हिराचंदजी किल्लेदार
(नागपूर)



स्व. कमलताई रमाकांतजी नांदगावकर
(अंजनगाव सुर्जी)

# विदुषीरत्न सुश्री. विद्युल्लता हिराचंद शहा

**श्री. अनंत बाबुराव बळ्ळे,** सोलापूर

विद्युल्लता भून म्हणजेच बा. ब्र. कु विद्युल्लता हिराचंद शहा या पद्मश्री सुमतीबाई शहांच्या अत्यंत विश्वासू, सहकारी व जीवाभावाच्या स्नेही होत्या, तसं पाहिलं तर त्यांच्यात गुरु-शिष्याचंही नातं होतं, म्हणाल तर मैत्रिणीचं नात. विद्युल्लता शहा या श्राविकाश्रमातच लहानाच्या मोठ्या झाल्या, शिकल्या आणि आश्रमाला त्यांचा फार मोठा आधार मिळाला. या श्राविका संस्थेच्या अभिवृद्धीसाठी त्यांनी सर्वस्व अर्पण केले त्यांच्या मातोश्री श्रीमती माणिकबाई हिराचंद शहा या सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ येथील राहणाऱ्या होत्या. दुर्दैवाने लहानपणीच त्यांच्यावर वैधव्याची कुऱ्हाड कोसळली. आई वडिलांची ही एकुलती एक मुलगी. मोहोळचे नगरशेठ असा त्यांच्या वडिलांच्या नावलौकिक होता. आई माणिकबाई वृत्तीने फारच धार्मिक, सालस आणि पापभीरु होत्या.

वैधव्यप्राप्तीमुळे माणिकबाई कारंजा येथे पूज्य समंतभद्र महाराजांच्या सान्निध्यात राहायला गेल्या, तेथेच विद्युल्लता भूनचे मराठी सहावीपर्यंतचे शिक्षण पूर्ण झाले. पुढील शिक्षणाकरिता त्यांना सोलापूरला श्राविका आश्रमात ठेवण्याचा निर्णय घेतला, श्राविकाश्रमाचा लौकिक त्यांनी कारंजात ऐकला होता आणि आपल्या मुलीने खूप शिकावे, मोठे व्हावे आणि आजोबांचा लौकिक वाढवावा अशी त्या माऊलीची इच्छा होती. विद्युल्लताभूनचे सातवी पासूनचे शिक्षण सोलापुरात झाले. त्या जन्मतःच हुशार, बुद्धिमत्तेची दैवी देणगी लाभलेल्या असल्यामुळे एस.एस.सी. परीक्षा ही त्या चांगल्या गुणांने उत्तीर्ण झाल्या. आता पुढील शिक्षणाचा प्रश्न उभा राहिला तेव्हा त्यांना उच्च शिक्षण देण्यास बऱ्याच मंडळींचा विरोध होता. कॉलेजात मुलं-मुली एकत्र शिकत असल्यानं जुन्या कर्मठ लोकांना त्यानी कॉलेज-शिक्षण घ्यावे असे वाटत नव्हते, पण होय, नाही करता करता त्यांना कॉलेजात दाखल करण्यात आलं. दरवर्षी त्या चांगल्या गुणांने उत्तीर्ण होत राहिल्या आणि बी. ए. झाल्या, एकूणच शिक्षणाविषयी व शिक्षण कार्याविषयी वाटणारी त्यांची ओढ पाहून सुमतीबाईंनी त्यांना बी. टी. या उच्च शिक्षणासाठी कोल्हापूरला पाठवले. बी.टी. करण्यासाठी कोल्हापूरला जाण्याआधी आपल संपूर्ण आयुष्य श्राविका संस्थेच्या कार्याला अर्पण करण्याचा मनोदय त्यांनी स्वतःहून व्यक्त केला होता तेव्हा सुमतीबाईंना अत्यंत गहिवरून आलं होतं. तेव्हा त्या त्यांना म्हणाल्या होत्या, 'तुम्ही स्वतःच या कार्यासाठी तयार झालात ही नक्कीच अत्यंत स्वागतार्ह गोष्ट आहे. तुमच्यासारख्या प्रेमळ, समंजस, ध्येयवादी, त्यागी शिष्याची मला फारच गरज होती.'

तसे पाहिले तर कु. विद्युल्लता भून आश्रमातील अनेक मुलींपैकी एक, पण संस्थेविषयीचा त्यांचा कृतज्ञता भाव केवढा उच्च प्रतीचा होता. संसाराच्या मोह पाशात जखडून स्वतःच जीवन उद्ध्वस्त व दुःखी न करता शिक्षण कार्याला वाहून घेण्याचा व अध्यात्मभाव जपण्याचा त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील त्यागी सद्भाव खरोखरच असामान्य होता!

त्या कोल्हापूरहून बी.टी. होऊन आल्यावर लगेच त्यांच्यावर उमाबाई श्राविका प्रशालेची जबाबदारी सोपविण्यात आली. खरे पाहता मुख्याध्यापिकेची जबाबदारी स्वीकारण्यासाठी किमान पाच वर्षांचा तरी शिक्षकी पेशाचा अनुभव लागतो, परंतु त्याकाळी अशा शिक्षित महिलाच

अस्तित्वात नसल्याने संस्थेची अडचण लक्षात घेऊन शिक्षण खात्याने तशी परवानगी दिली.
त्यांना धर्मशास्त्राची, तत्त्वज्ञानाची खोल समज होती व आवड ही तेवढीच अफाट होती. संस्कृत, प्राकृत, अर्धमागधी, पाली, मराठी, हिंदी, इंग्रजी आदी अनेक भाषेत त्यांनी प्रावीण्य मिळवलं. ज्या संस्थेमुळे आपल्याला एवढ शिकायला मिळालं, आपलं मानसिक आणि बौद्धिक स्थित्यंतर घडलं व सन्मानित आयुष्य वाट्याला आलं त्या संस्थेविषयी आपण सदैव कृतज्ञ राहिलं पाहिजे हा त्यांचा कृतज्ञता भाव व शालीन वृत्ती सुमतीबाईंना फार आवडत असे. उच्च शिक्षण घेऊनही त्यांच्या ठायी अहंकाराचा लवलेशही कधी आला नव्हता, त्या अतिशय विनम्र स्वभावी होत्या.

आपलं सगळे आयुष्य निरपेक्षपणे स्त्री शिक्षण-कार्याला वाहून घ्यावं, आपल्यातील अध्यात्मभाव जपावा व उत्तरोत्तर तो वाढवावा, निराधार व अडचणीत असलेल्या मुलींना मदत करावी व त्यात समाधान मानावं असा त्यांचा शालीन व सर्व समभावी स्वभाव होता.

त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांना लग्न, संसार, मुलं-बाळं यांत अजिबात रस नव्हता. चार-चौघींसारखं आयुष्य घालविण्यापेक्षा काहीतरी भव्य-दिव्य करावं, स्वतःच्या सुखाच्या शोधात आयुष्य संपविण्यापेक्षा इतरांच्या विशेषतः दिनदुबळ्यांच्या सुखासाठी शरीराचा कण-कण झिजवावा अशी त्यांची महत्त्वाकांक्षा होती.

मुख्याध्यापिकेचा अनुभव नसल्याने त्यांच्या हातून चुका होत असतः माझ्यामुळे संस्थेचे नुकसान तर होणार नाही ना? या चिंतेने अस्वस्थ होऊन त्यांनी एके दिवशी सुमतीबाईसमोर मला मुख्याध्यापिकेच्या जबाबदारीतून मुक्त करा अशी आर्त विनवणी केली. 'पण का?' असे विचारल्यावर त्या भीत-भीत म्हणाल्या, 'रागावू नका भून, खरं सांगते, मला एवढी मोठी जबाबदारी पेलत नाही. भीती वाटते. आपल्यामुळे संस्थेचे नुकसान झालं तर!'

'असं तुम्हाला खरंच वाटतं !'
'हो, महावीरांची शपथ, खरे असंच वाटतं.'
'मग तर मी तुम्हाला मुळीच मुक्त करणार नाही या जबाबदारीतून. कारण तुमच्या अनुभवामुळे किंवा अज्ञानामुळे संस्थेची इतकी हानी होणार नाही; उलट तुमच्या प्रामाणिकपणामुळे, कार्यनिष्ठेमुळे, कर्तव्य-तत्परतेमुळे संस्थेची भरभराटच होईल.' असे बोलून त्यांचे सांत्वन केले. आणि त्या दिवशी सुमतीबाईंनी त्यांना सर्व दृष्टीने तयार करण्याचा चंग बांधला. केवढा हा सुमतीबाईंचा विद्युल्लता भूनवर अदम्य विश्वास!

शाळेच्या कामाव्यतिरिक्त संस्थेसाठी देणग्या जमविण्याचे काम त्यांच्याकडे असे. शालेय नियतकालिकेचे संपादन, वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन इत्यादी अन्य कामेही त्यांच्याकडे सोपविली. सोपविलेली कामे अत्यंत उत्साहाने अंगीकार करून निष्ठेने पार पाडण्याची जिद्द त्यांच्या ठायी आली. लेखन व वक्तृत्व शैली त्यांच्या ठिकाणी स्वाभाविकपणेच होती.

सुमतीबाई शहा आपल्या आत्मचरित्रात लिहितात की, 'विद्युल्लताबाईंमुळे माझ्या कामाचा व्याप बराच कमी झाला होता. पुढे पुढे तर मी त्यांच्यावर विश्वासून राहू लागले आणि बघता-बघता त्या माझ्या विश्वासातल्या सहकारी बनल्या. जिवाभावाच्या स्नेही झाल्या. आम्ही एकमेकीवर भगिनीवत् प्रेम करू लागलो. संस्थेला आपला संसार मानून तो नीटनेटका करण्यासाठी अहोरात्र झटू लागलो. संस्थेच्या आजच्या भरभराटीत विद्युल्लताबाईंचा सिंहाचा वाटा आहे. विशेषतः उमाबाई श्राविका प्रशालेच्या प्रगतीला त्यांचा अविश्रांत श्रम, प्रामाणिक तळमळ आणि दुर्दम्य उत्साहच कारणीभूत आहे. आपली शाळा सर्व दृष्टीने अद्यावत् असावी यासाठीच त्या सदैव चिंतित असत. शाळा हाच त्यांचा ध्यास व शाळेचा उत्कर्ष हेच त्यांचे ध्येय बनले होते.'

# तन सेवेशी, मन सेवेशी –
# श्रद्धेय शांताताई कान्हेड

**– उल्का रुईवाले**, कारंजा (लाड)

'तन सेवेशी, मन सेवेशी' हे श्रद्धेय शांताताई कान्हेड यांना समर्पित असणारे पुस्तक म्हणजे 'यथा नाम, तथा ताईंचे जीवन!', ही बाब पुस्तकाचे वाचन करत असताना प्रकर्षाने लक्षात येते. मला ताईंचा सहवास प्रत्यक्षात जास्त नाही मिळाला, कारण मी संस्थेमध्ये प्रत्यक्ष कामाला बऱ्याच उशिरा सुरुवात केली. वयोमानानुसार ताई थकत चालल्या होत्या, संस्थेतील त्यांच्या राहत्या जागेवरून बालविकास मंदिरात येणे–जाणे करणे कठीण होत चालले होते. एक दिवस प्रज्ञाताई मला ताईंकडे घेऊन गेल्या व म्हणाल्या, 'ताई, ही उल्का मंजुताईंची नातसून! आपणास हिची चांगली मदत होईल, असे वाटते!'

ताईंचा पहिलाच प्रश्न – 'स्वाध्याय करता का?' मी होकारार्थी मान डोलावली व सांगितले, 'आद. विजूताईंकडे सुरुवात केली आहे...'

दुसरा प्रश्न – 'लहान मुले आवडतात का?'

मी अगदी आनंदाने 'हो!' म्हटले.

झाले, माझ्या कामाला सुरुवात झाली होती! पण आनंदाएवढीच जबाबदारीची जाणीवही जास्त खुणावत होती. कारण कंकुबाई श्राविकाश्रम संस्थेतील हा बालविकास मंदिराचा विभाग ताईंनी प्रारंभापासूनच विशिष्ट पद्धतीने, कुशलतेने व अतिशय परिश्रमपूर्वक सांभाळून नावारूपाला आणला होता. ताईंनी वह्यांमध्ये लिहिलेल्या विस्तृत नोंदी, चिमुकल्यांसाठी तयार करवून घेतलेले शैक्षणिक साहित्य इ. अनेक गोष्टींचे अवलोकन करताना त्यांची अभ्यासू वृत्ती, दूरदृष्टी, कल्पकता, समर्पण भावना इत्यादी गोष्टी ध्यानात येऊ लागल्या. मग ताईंच्या पूर्वायुष्याबद्दल जाणून घेण्याचा मी प्रयत्न केला.

**विपत्तीतून उन्नती –**

वाशीम जिल्ह्यातील अनसिंग या गावातील श्री. रुखबसा आणि लक्ष्मीबाई सावले या धर्मप्रेमी दांपत्याची कन्या शांताताई यांचा जन्म जुलै १९२१चा. बालपणापासूनच ज्ञान व संयम यांचे बाळकडू मिळाले होते. शालेय शिक्षण इयत्ता आठवीपर्यंत झाले व तत्कालीन रिवाजाप्रमाणे वयाच्या पंधराव्या वर्षी त्यांचा विवाह अमरावती निवासी श्री. मोतीलालजी कान्हेड यांच्यासह झाला. परंतु दुर्दैवाने पतीच्या अकाली मृत्यूमुळे दोन वर्षांच्या आतच ताईंचा संसार संपुष्टात आला.

**बालविकास मंदिराची उभारणी–**

अमरावती येथे धार्मिक अध्ययनासोबतच संस्कृत व हिंदी भाषांच्या परीक्षाही ताईंनी दिल्या. पुढे प.पू. गुरुदेव समंतभद्र महाराज यांच्या सत्प्रेरणेने ताईंनी कारंजा श्राविकाश्रमात सेवायोग देण्याचे ठरविले. संस्थेत बालिकांसाठी वेगळा शिक्षण विभाग सुरू करण्याचे ठरत होते. त्यावेळी बालवाडी ही संकल्पना समाजमनात पुरेशी रुजली नव्हती. ताईंनी ही जबाबदारी स्वीकारण्याची तयारी दाखवली. कोणतेही काम करताना त्यासाठी समर्पणाची भावना असल्याशिवाय त्या कामात गती व कौशल्य येत नाही, याची जाणीव त्यांना होती. ज्या काळात एकट्या स्त्रीने घराबाहेर पडणे देखील अशक्यप्रायः होते, त्या काळात ताईंनी यवतमाळ येथे जाऊन या विषयाचे शास्त्रोक्त प्रशिक्षण घेतले. त्या कोर्समध्ये सर्वोत्कृष्ट गुणवत्ता मिळवून स्वतःला सिद्ध केले व संस्थेमध्ये सन १९५५मध्ये बालविकास मंदिर विभाग सुरू केला.

**गुरुकुल पंचसूत्रीवर आधारित शिक्षण प्रणाली–**

प. पू. गुरुदेवांनी गुरुकुल संस्थांसाठी शील–ज्ञान–प्रेम–सेवा–व्यवस्था ही पंचसूत्री

कार्यान्वित केली होती. आदरणीय ताईंनी या पंचसूत्रीला केंद्रस्थानी ठेवूनच बालविकास मंदिराचा अभ्यासक्रम निश्चित केला.

बालपणातील अनुभव मुलांच्या व्यक्तिमत्त्वावर सखोल व प्रभावी परिणाम करतात आणि म्हणूनच या टप्प्यावर दिलेले शिक्षण व संस्कार त्यांच्या भविष्यासाठी भक्कम पाया घालतात. भाषा, गणित, निरीक्षण, सर्जनशीलता यासारखी मूलभूत कौशल्ये सहज व आनंददायी पद्धतीने विकसित झाली तर मुलांमध्ये जिज्ञासा, आत्मविश्वास व शिकण्याची आवड निर्माण होते. स्वच्छता, शिस्त, वेळेचे महत्त्व, सहकार्य, आदर, समयसूचकता, समूहात शिकणे, कृतिप्रधान उपक्रम यातून मुलांचा सर्वांगीण विकास होत असतो, हे ओळखून प्रयोगशील ताईंनी त्यानुसार शिक्षण प्रणाली विकसित केली. त्यावेळी अकोला जिल्ह्यात सुरू झालेली ही दुसरीच बालवाडी होती. लवकरच संस्थेचा हा विभाग अतिशय लोकप्रिय झाला.

**खेळातून शिक्षण–**

आज जगभरात गाजत असलेल्या 'ज्ञानरचनावाद' या संकल्पनेचा वापर ताईंनी ७० वर्षांपूर्वीच केला होता. किंबहुना हीच संकल्पना आमच्या बालविकास मंदिराचा आत्मा आहे, असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही!

आज प्रचलित असणारी Pink Tower, Addition - Subtraction Box इ. शैक्षणिक खेळाची साधने ताईंनी त्याचवेळी कारागीरांकडून स्वतः अचूक मोजमापे देऊन बनवून घेतली होती. अजूनही सुस्थितीत असलेल्या या साधनांचा नियमित वापर शाळेत होत असतो, हे मी आवर्जून सांगू इच्छिते.

मुलांमधील सुप्त गुण कसे ओळखावे, परिपाठातून–बालसभेमधून मुलांना संयम कसा शिकवावा– याबद्दल ताईंनी त्यांच्या वह्यांमध्ये नोंदी करून ठेवल्या आहेत. आजही त्यांचा उपयोग आम्हाला होत आहे.

आद. ताईंनी शिकविलेले मूलभूत तत्त्व म्हणजे, 'मुले फक्त वाढवू नका, मुलांना फक्त शिकवू नका, तर मुलांना स्वतः घडण्याची संधी व जबाबदारी द्या. कळीला स्वतःला फुलू दिले, तरच ते फूल परिपूर्ण होत असते....' या तत्त्वाचे पालन करीत असतानाच काळाला अनुसरून शाळेत सुसज्ज ग्रंथालय, ॲक्टिव्हिटी रुम, संगणक, डिजिटल बोर्ड इ. आधुनिक साधनांच्या मदतीने गुणवत्तापूर्ण शिक्षण दिले जाते. पण आधुनिकतेच्या नावाखाली शाळेच्या स्नेहसंमेलनात कधीही सिनेमांच्या गाण्यांचा– नृत्यांचा वापर केला जात नाही! त्याऐवजी पुस्तके, वाचन, पर्यावरण, जल जागृती, पशू–पक्षी संवर्धन, भारतीय सण, थोर पुरुष, व्यायाम, योगा इ. संकल्पनांवर आधारित नावीन्यपूर्ण उपक्रम व प्रकल्प शिक्षिका व मुलांच्या प्रत्यक्ष सहभागातून उत्साहाने साजरे होतात. आमच्या शाळेचे हे वेगळेपण नावाजले जात असते!

सरतेशेवटी आद. ताईंच्या व्यक्तिमत्त्वातून व संचालनाच्या माझ्या अनुभवातून सांगावेसे वाटते की, दूरदृष्टीसोबतच प्रेम, संयम, संवेदनशीलता आणि सर्जनशीलता यांचा संगमच लहान बालकांच्या सर्वांगीण विकासात खऱ्या अर्थाने यशस्वी ठरतो, आनंददायक ठरतो. याची प्रचिती तेव्हा येते, जेव्हा सत्तर वर्षे पूर्ण केलेल्या या शाळेतून शिकून गेलेले व आता आजोबा झालेले आमचे माजी विद्यार्थी आपल्या मुलांना व त्यानंतर आता आपल्या नातवंडांनाही याच बालवाडीत शिकवण्यासाठी आग्रही असतात...!



**सुमारे ७०च्या दशकातील कंकुबाई श्राविकाश्रमातील महिला स्वाध्याय वर्गाचे छायाचित्र**

# ज्योतीने ज्योत उजळते!
# प्रकाशाचा वारसा पुढे चालविते....!!

**– विपुल खेडकर,** नागपूर
८८८८८५४४३४

ज्यांना गुरुकुल शिक्षण प्रणालीरूपी दीपकाचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीतीने प्रकाश लाभला, अशा अनेक किरण शलाकांनी स्वतःसोबतच इतरांच्याही जीवनात ज्ञानाच्या प्रकाशवाटा उजळल्या आहेत. समाजाने कदाचित त्यांना पुरेसे पुरस्कृत केले नसेलही, परंतु जिनधर्म प्रभावनेच्या इतिहासामध्ये या स्त्री-रत्नांसाठी सन्मानाचे व कृतज्ञतेचे पान अवश्य राखून ठेवले जाईल, हे निर्विवाद!

या सर्व माहिती संकलनासाठी मासिक सन्मतिच्या मान्यवर लेखिका विपुल खेडकर (नागपूर) यांनी अत्यंत परिश्रम घेतले आहेत, त्यासाठी त्यांना मनःपूर्वक धन्यवाद!

नकाशावर मोठमोठ्या नद्या, पर्वत, शहरे स्थान मिळवितात, मात्र लहानुल्या नद्या, ओढे, झरे, ओहोळ यांना नकाशामध्ये स्थान मिळाले नाही, तरी ते आजूबाजूच्या शेतीला, वनराईला संजीवनी प्रदान करीत असतात. जगाच्या जगरहाटीमधे सुद्धा याहून वेगळे काय आढळते? थोर व्यक्तींनी सुरू केलेल्या ज्ञानगंगेच्या प्रवाहाला पुढे अखंड प्रवाहित ठेवण्यासाठी अनेक सर्वसामान्य व्यक्ती देखील आपल्या परीने प्रयत्न करताना दिसतात. अशा काही अल्पपरिचित पण ज्यांनी इतरांना प्रबुद्ध करण्याचा तळमळीने प्रयत्न केला, त्यांना या महिला विशेषांकाच्या निमित्ताने आठवून, त्यांच्या कार्याचा शब्दगौरव या निमित्ताने करावा असे वाटले, म्हणून हा लेखन प्रपंच......!

आज विविध ठिकाणी महिला गौरव कार्यक्रमांचे आयोजन बघता मन भूतकाळात डोकावले. आपल्या आजी-पणजींची कष्टपूर्ण दिनचर्या आठवू लागली. या दिनचर्येचा आनंदी भाग म्हणजे अभिषेक, पूजन आणि सकाळ-सायंकाळ स्वाध्याय, शास्त्रवाचन ! तेव्हाच्या प्रौढ महिलांचा नित्यक्रम ! बऱ्याच ठिकाणी सामूहिक शास्त्रवाचन होत असे. यासाठी कोणी पंडितच असतील असे नाही, तर महिलांमध्ये स्वाध्यायाची रूची आणि वाचनाची गोडी असणारी, दोन-चार इयत्ता शिकलेली एखादी महिला ग्रंथाचे वाचन करून इतरांना अर्थ समजावून सांगत असे. शिकविण्याची हातोटी अशी की, चारही अनुयोगातील विविध विषय पक्के करून घेत! अशा या गेल्या शतकातील, अर्थात मुख्यत्वेकरुन सन १९०० ते २००० या शंभर वर्षात विदर्भातील, विशेषतः नागपूर, कारंजा-लाड, अंजनगाव सुर्जी, जिंतूर, देऊळगाव राजा इ. गावांमधील विशेष ज्ञानसाधना करणाऱ्या काही महिलांचा परिचय मी आपणास या लेखाद्वारे घडविण्याचा प्रयत्न करते. अर्थातच आता यातील बहुसंख्य महिलांचे देहपरिवर्तन झाले असल्याने, त्यांच्या परिवाराकडून किंवा शिष्य वर्गाकडून जी माहिती प्राप्त झाली आहे, तीच येथे प्रस्तुत होते आहे.

या विषयाशी संबंधित कारंजाचे नाव घेताच कृतज्ञतापूर्ण उल्लेख करावासा वाटतो तो आदरणीय **श्री. प्रद्युम्नसावजी डोणगांवकर यांचा! प. पू. समंतभद्रजी महाराजांचे** (तत्कालीन ब्र. देवचंदजी

शहा) गुरुकुल शिक्षण प्रणालीचे पुनरुज्जीवन करण्याचे स्वप्न प्रत्यक्षात साकार करण्यासाठी तन–मन–धन समर्पित केलेले महामना व्यक्तिमत्त्व!

सव्वाशे वर्षांपूर्वी बघेरवाळ समाजात मुलींनी शाळेत जाऊन शिक्षण घ्यावे, असा त्यांनी केवळ विचारच केला नाही तर प्रत्यक्षात आणला, स्वतःच्या बालविधवा बहिणीला, बजाबाईंना, मुंबईच्या श्राविकाश्रमात शिकायला ठेवून.... ! घरातील सर्व मुलींना शिक्षणाचे, धार्मिक शिक्षणाचे पाठ स्वतः दिले.

त्याचीच फलश्रुती म्हणून, सुश्री बजाबाईंनी कंकुबाई श्राविकाश्रमाच्या स्थापनेपासूनच अतिशय मोलाचे योगदान दिले. संस्थेचे व्यवस्थापन, धार्मिक अध्यापन, मुलींची काळजी, आर्थिक व्यवहार इ. अनेक बाबी त्यांनी समर्थपणे हाताळल्या, ते देखील स्वतःची संयम साधना काटेकोरपणे सांभाळून!

श्री. प्रद्युम्नसावजी यांची एकुलती कन्या म्हणजे **सुंदराबाई गंगासावजी भोरे !**

बघेरवाळ समाजातील स्त्री शिक्षणाचे उद्घाटक आदरणीय श्री प्रद्युम्नसावजी डोणगांवकर ज्यांना पिता म्हणून लाभले. अशा सुंदराबाईंचा जन्म १९०६ सालचा. वडिलच ज्ञानदाते असल्याने कदाचित शालेय शिक्षण कमी झाले असेल, पण वाचन–लेखन करता येत होते. शिवाय पाठांतर, मनन आणि चिंतन यांचा तर वारसाच लाभला होता. अशा या सुंदराबाईंचा प्रवेशिका या ग्रंथावरचा अधिकार अतुलनीय होता. स्वतःच्या चारही मुलांच्या धार्मिक अध्यापनासोबतच काही वर्षे कंकुबाई श्राविकाश्रमामध्येही धार्मिक अध्यापनाचे काम त्यांनी सांभाळले होते.

**कारंजा नगरी ज्ञानियांचे माहेरघर !** इथल्या क्षेत्राचाच हा प्रभाव असेल, येथे विद्वान निपजतात अथवा येथे येऊन विद्वत्ता प्राप्त करतात. या भूमीत असणारी सेनगण मंदिर, बालात्कार मंदिर आणि काष्ठासंघ मंदिर ही तीन मंदिरे तसेच दोन गुरुकुले, प्रत्येक ठिकाणी एक स्वाध्याय ग्रुप होता आणि आजही चालू आहे. यापैकी मुख्य स्वाध्याय केंद्र म्हणजे पाठशाळेचा (कंकुबाई श्राविकाश्रम) उल्लेख प्रत्येक ठिकाणी येतो. या पाठशाळेच्या संचालिका **आदरणीय मंजुळाताई रुईवाले** यांचे उपकार तर समाज विसरू शकणार नाही. त्यांनी अनेक पिढ्या घडवल्या म्हटले तर वावगे ठरणार नाही. तसा या अंकात त्यांच्याबद्दल सविस्तर लेख आलेलाच आहे. त्याद्वारे आपण त्यांचे कार्य कर्तृत्व विस्ताराने जाणून घ्यालच!

**विदुषी विजयाताई भीसीकर** हा विसाव्या आणि एकविसाव्या शतकात सर्वांवर अखंडपणे ज्ञानवर्षाव करणारा वटवृक्ष ! जो यांच्या सान्निध्यात आला तो प्रसन्नतेनेच बाहेर पडला.मोठा शिष्यवर्ग लाभण्यासोबतच तितक्याच तोडीचा तयार झाला याचेही समाधान त्यांच्या चेहऱ्यावर झळकत असते. यांच्या अनेक उल्लेखनीय शिष्यांमधे **स्व. सुमनताई चवरे, विजयाताई नांदगावकर, प्रांजलीताई रुईवाले, प्रज्ञाताई डोणगांवकर, कविताताई चवरे** प्रभृति ताईंचा स्वाध्याय वारसा दमदारपणे पुढे नेत आहेत. सौ. प्रतिभाताई महाजन लहान मुलांच्या धर्मशिक्षणासाठी विविध नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात विशेष रस घेतात.

**श्री काष्टासंघ मंदिर** म्हणजेच मधले मंदिर ! आसपासच्या सर्व महिलांचे सायंकालीन स्वाध्यायाचे ठिकाण ! या मंदिराची महिलांची स्वाध्याय परंपरा जवळपास शंभर वर्षांपासूनची ! येथील शास्त्र स्वाध्याय **स्व. मैनाबाई चवरे, स्व. लीलाबाई देऊळगांवकर, स्व. सुमनताई चवरे, स्व. निर्मलाबाई नांदगावकर** यांनी अखंडपणे सुरू ठेवला होता. हीच परंपरा आता **करुणाताई नांदगावकर** अखंडितपणे पुढे नेत आहेत .

**बालात्कार मंदिराशी** संबंधित नाव घेतले जाते **आदरणीय सौ. प्रभाताई कन्हैय्यालालजी चवरे** यांचे. त्या स्वतः तर स्वाध्यायाला बसतीलच, पण आपल्या प्रभावी व्यक्तिमत्त्वाने इतरांना पण प्रेरित

करतील! स्वाध्यायात उपस्थित असणाऱ्यांची संख्या उल्लेखनीय म्हणावी अशीच! आजही नियमित पाठशाळा चालणारे हे ठिकाण !

**आ. ब्र. भारतीदीदी चवरे** यांनी तर धर्माकरिता आपले जीवन समर्पण केलेले आहे. त्यामुळे पाठशाळा, स्वाध्याय, ध्यान याची आवड निर्माण होणारा मोठा वर्ग त्या घडवताहेत. अंजली चवरे व मंजली रायबागकर या बहिणींची जोडगोळी तितक्याच आत्मीयतेने या पाठशाळेत कार्यरत असते.

**सेनगण मंदिराशी** संबंधित सायंकाळचा स्वाध्याय बरीच वर्षे संस्कृतमध्ये विशेष कौशल्य असणाऱ्या **स्व. वासंतीबाई डोणगांवकर** यांनी घेतला. कारंजात आजमितीला आणखी एक पाठशाळा सुरु आहे. तिच्या सुचारू संचालनात **स्व. कुमुदिनीताई काळे, प्रमिलाताई भेलांडे, संगीता फुरसुले, प्रणिता फुरसुले, अंजली काळे** यांचा मोठा सहभाग आहे.

बघेरवाळ समाज तीन-चारशे वर्षांपूर्वी-पासून मोठ्या संख्येने एकत्र असणारे दुसरे ठिकाण म्हणजे नागपूर ! येथे बघेरवाळ समाजाची पंचायत असणारी दोन प्राचीन मंदिरे इतवारी भागात आहेत. येथे अनेक वर्षांपासून नियमित स्वाध्याय परंपरा टिकून आहे.

या परंपरेच्या शीर्षस्थानी आहेत, **श्रीमती रतनबाई उर्फ सोनाबाई जयकुमारजी किल्लेदार** !

शुभ्र गोरा वर्ण, शुभ्र पांढरे पातळ, शुभ्र पांढरे केस, मध्यम उंची, भारदस्त बांधा, मोठा आवाज ! मुळातच आजी या नावाचाच वचक असणाऱ्या आमच्या बरोबरीच्या सगळ्यांनाच त्या समोरून येतांना दिसल्या की थोडा घाम फुटल्यागतच व्हायचे! तशात एक दिवस कुठलीही पूर्वकल्पना न देता आमच्या आजीने शाळेच्या सुट्टीत एक दिवस दुपारी आम्हा दोघी बहिणींना त्यांच्या घरी त्यांच्यासमोर उभे केले आणि दर्शनपाठ आदि शिकण्याच्या टीममध्ये आमची एंट्री झाली!! सोबतीला आमच्यासारख्याच बरोबरीच्या बापड्या असल्याने फार जड गेले नाही!....पण त्यांच्या शिकवण्याचा प्रभाव मात्र जाणवू लागला आणि बरेच धार्मिक पाठांतर त्या काळात झाले.

अशा या सोनाआजींचा जन्म २६ फेब्रुवारी १९०८चा ! वयाच्या तेराव्या वर्षी लग्न आणि एकोणपन्नासाव्या वर्षी आलेले वैधव्य! जवळपास छत्तीस वर्षांचा वैधव्याचा प्रदीर्घ काळ! शालेय शिक्षण किती होते हे तर माहित नाही, पण श्री पार्श्वप्रभू दिगंबर जैन सेनगण मंदिरात त्यांचा दरारा होता. शास्त्रवाचन, धार्मिक क्लास, स्वतः सोळाकारण, कर्मदहन सारखी मोठमोठी व्रते करणे, इतरांना करण्याची प्रेरणा देणे, पूजा म्हणण्यात सहाय्य करणे हा त्यांचा शिरस्ता ! तेव्हा साधं वाचनही करू न शकणाऱ्या अनेक महिलांना त्यांचे अस्खलित उच्चार, समजावून सांगण्याची पद्धत आपलेसे करीत असे. नागपुरात महिला वर्गाला स्वाध्याय करण्याची, चातुर्मासाचे चार महिने मोठे सामायिक म्हणण्याची आणि मंदिरात रोज सकाळ-सायंकाळ तीन-तीन तास बसण्याची संवय लावण्याचे श्रेय कदाचित त्यांच्याकडेच जात असेल!! तसेच पुढे स्वाध्याय घेऊ शकणारा महिला शिष्यवर्ग सुद्धा त्यांनी घडविला.

साधारण समकालीन असणारे हे दुसरे व्यक्तिमत्त्व आहे, **सौ. सुशीलाबाई उर्फ नर्मदाबाई भगवानसावजी देवलसी** यांचा जीवनपट उलगडतोय १९१५-१९९९च्या दरम्यानचा! त्यांचे लौकिक शिक्षण इयत्ता चौथीपर्यंत!

नागपूरच्या गरिबे परिवारातील ही लेक कारंजा येथील देवलसींची सून झाली. मुळातच शिक्षणाची प्रचंड आवड, त्यामुळे कंकुबाई श्राविकाश्रम कारंजा येथे श्रीमती माणिकभून (अर्थात पूज्य आर्यिका १०५ श्री चंद्रमती माताजी), पूर्वाश्रमीचे श्री देवचंदजी (पू. १०८ श्री समंतभद्रजी महाराज) तथा श्री प्रद्युम्नसावजी डोणगावकर अशा

विद्वान मंडळींकडे संस्कृत व धार्मिक शिक्षण झाले.

कंकुबाई श्राविकाश्रमात काही काळ संस्कृतचे अध्यापनही केले. सन १९५०मध्ये नागपूरला आल्यानंतर अनेक महिलांना अ, आ, इ, ई या बाराखडीपासून लिहायला-वाचायला शिकवले. तत्त्वार्थसूत्र, द्रव्यसंग्रह, भक्तामर स्तोत्र, छहढाला, रत्नकरंड श्रावकाचार, पुरुषार्थ-सिद्ध्युपाय, चोवीस ठाणा आदि ग्रंथ शिकवले. चोवीस ठाणा ग्रंथावर तर त्यांचे प्रभुत्वच होते. आपल्या अतिशय सुमार बुद्धीच्या शिष्यांना सुद्धा त्या चोवीस ठाणा सहज लावायला शिकवायच्या. त्यांच्या शिष्यवर्गात बहुतांश शिष्य हिंदी भाषक असत. यांची ही दिवसभराची पाठशाळा चालूच असे. एकीकडे स्वतःची कामे, तर दुसरीकडे ज्ञानदान...असे अव्याहतपणे जीवनाच्या अंतिम समयापर्यंत सुरु होते.

'दिसामाजी काहीतरी ते लिहावे,
प्रसंगी अखंडित वाचीत जावें'

हेच त्यांचे जीवनसूत्र होते. अनेक वह्यांमधून बरीच माहिती त्यांनी लिहून ठेवलेली आहे. यांची विशेषता अशी सांगतात की, त्यांनी त्यांच्या वह्यांमधे लिहून ठेवले होते की, त्यांच्या अंतिम समयी काय काय म्हणायचे! त्याप्रमाणे शेवटी वाचा बंद झाली तरी, त्यांनी निर्देश दिले आणि स्वतः योजल्याप्रमाणे स्वतःचे मरण साधले.

अत्यंत धार्मिक, व्रतवैकल्ये-उपवासादि मनापासून करणाऱ्या, मात्र कुठल्याही प्रकारच्या कर्मकांडाला मुळीच थारा न देणाऱ्या, असे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वर्णन करता येईल. स्पष्ट आणि शुद्ध उच्चारांवर त्यांचा विशेष भर असे. प्रचंड पाठांतर व निरंतर स्वाध्याय ही वैशिष्ट्येही सांगता येतील.

त्यांच्या शिक्षणाच्या आवडीमुळे त्या कधी स्वस्थ बसल्या नाहीत. नातवंडांसोबत इंग्लिश अक्षरे लिहायला त्या शिकल्या. तसेच सामाजिक कार्याची त्यांची आवड त्यांना जैन महिला परिषदेच्या अधिवेशनांपर्यंत घेऊन गेली. त्यांच्या अनेक शिष्यांपैकी आज एक आचार्य गुणभद्रनंदी आणि एक आर्यिका माताजी आहेत.

याच परंपरेत **आ. सोनाआजी किल्लेदार याच्या कनिष्ठ स्नुषा स्व. प्रा. सौ. पद्माताई शांतिकुमारजी किल्लेदार** या होत. सन १९२६ साली कारंजा येथे भोरे घराण्यात जन्माला येऊन नऊ दशके उत्साहाने तळपणारे हे व्यक्तिमत्त्व म्हणजे बघेरवाळ समाजाचा गौरव होता!

आजोबा श्री. प्रद्युम्नसावजी डोणगावकर यांच्या सारख्या विद्वान मंडळींच्या छत्रछायेत या हिऱ्याला विद्वत्तेचे पैलू पडलेत. स्वतंत्र विचारसरणी लाभली. धार्मिक शिक्षणाबरोबरच M.A. आणि पुढे Ph.D. पर्यंतचे लौकिक शिक्षण देखील त्यांनी प्राप्त केले. लग्नानंतर नागपुरातील किल्लेदारांच्या प्रतिष्ठित घराण्यात धाकट्या स्नुषा म्हणून त्यांनी प्रवेश केला. त्या काळात उच्चविद्याविभूषित होऊन कॉलेजमधे शिकविणाऱ्या महिलांपैकी एकमेवाद्वितीय अशा त्या होत्या. शिवाय त्यांचे स्पष्ट, शुद्ध बोलणे हे नागपुरातील वैशिष्ट्यपूर्ण वैदर्भी भाषेत वेगळे उठून दिसायचे! नव्यानेच कॉलेज शिक्षण घेणाऱ्या मुली किंवा शिक्षण घेऊन नागपुरात आलेल्या सुना, असा त्यांचा नव्या विचारांचा शिष्य वर्ग असायचा.

द्रव्यानुयोगावर त्यांची विशेष पकड ! त्यामुळे समयसार, प्रवचनसार आदि ग्रंथांचा स्वाध्याय करणारी पिढी नागपुरात तयार करण्याचे श्रेय त्यांचे आहे म्हटले तर, अतिशयोक्ति होणार नाही. त्यांच्या घरी शिष्य आणि विद्वानवर्गाची वर्दळ सदासर्वकाळ असायची. मुद्देसूद बोलणे आणि प्रत्येक शब्दाची सहज उकल करून सांगण्याचे त्यांचे तंत्र चांगलेच लक्षात आहे.

यानंतर आठवण होते पद्माताईंच्या समवयस्क असणाऱ्या **स्व. श्रीमती मनोरमाबाई मोतीचंदजी दर्यापूरकर** यांची. कारंजा येथील रायबागकर कुटुंबात दि. ९ ऑक्टोबर १९३१ रोजी जन्मलेल्या मनुताईंचे नववीपर्यंतचे शिक्षण कंकुबाई श्राविकाश्रम, कारंजा लाड येथे झाले. तेथील पाठशाळेत त्यांनी धार्मिक शिक्षणाचे धडे गिरवले.

लग्नानंतर त्यांनी आपले B.A., B.T.Ed. पर्यंतचे लौकिक शिक्षण पूर्ण करून, मुले–संसार सांभाळत नागपूरमधील नित्यानंद कन्या शाळेत अध्यापन केले. धार्मिक शिक्षणाचे जे बाळकडू प्राप्त झाले होते, त्याचा अनायासे असा फायदा झाला की श्री पार्श्वप्रभू दिगंबर जैन मोठे मंदिर (इतवारी, नागपूर) येथे मुलींसाठी स्वतंत्र पाठशाळा चालविण्यासाठी (मुलांची पाठशाळा होती, परंतु मुले–मुली एकत्र शिक्षण घेण्याची पद्धत तेव्हा रूढ नव्हती) त्यांना विचारणा करण्यात आली आणि धार्मिक अध्यापनाच्या कार्यात त्यांचा प्रवेश झाला. पुढे त्यांच्या अध्यापनाच्या लौकिकाने त्यांना श्री श्वेतांबर तेरापंथ स्वाध्याय भवन मधेही पाठशाळेत अध्यापनास बोलविण्यात आले. काही वर्षे तेथेही त्या नियमित जात असत .

त्यांची उत्तम अध्यापन शैली, संस्कृत भाषेवरील प्रभुत्व आणि व्यक्तिमत्त्वातील गोडवा विद्यार्थिनींना आकर्षित करीत असे.

सकाळची शाळा, घरकाम उरकून दुपारपासून धार्मिक अध्यापनाची सुरुवात होई. कोणी भक्तामर शुद्ध शिकायला तर कोणी तत्त्वार्थवाचन, कोणी प्रवेशिका तर कोणी छहढाला शिकायला! आजूबाजूचा हिंदी भाषिक वर्ग ! त्यांना संस्कृत उच्चारण अवघड जात असे. मनूताईंचे प्रेमळ समजावणे... सोबतच पेढा, लाडू असे बघेरवाळी आतिथ्य.... त्यामुळे पाठशाळेव्यतिरिक्त दिवसभरही शिष्यवर्गाचे येणे सुरूच असे! ताईंजवळ मन मोकळे करणारा स्त्रीवर्गही बराच असे. त्यांना योग्य मार्गदर्शन, स्वाध्यायाची आवड निर्माण करणे.. यातही ताई यशस्वी होत होत्या. पुढे पाठशाळा तर मागे पडली, परंतु मंदिरात स्वाध्याय सुरु केला. कोणी कोणतीही शंका विचारली की ताईंचे उत्तर तयार असे.

आयुष्याच्या अंतिम दशकात त्यांनी मोबाईलशी मैत्री केली. दिवसरात्र स्वतःला प्रवचन, क्लासेस यांच्याद्वारे धर्मध्यानात गुंतवून घेतले.

९४ वर्षांच्या दीर्घ आयुष्यात त्यांच्या अध्यापनात कधी खंड पडला नाही. अंतिम समयापर्यंत ताईंचा शिष्य वर्ग त्यांच्याजवळ स्वाध्यायासाठी हजर होता, हे आणखी त्यांचे एक वैशिष्ट्य!

**स्व. सौ. विमलताई हिराचंदजी किल्लेदार**

सहा भाऊ आणि तीन बहिणी अशा मोठ्या, पण शिक्षणाचे फारसे संस्कार नसणाऱ्या नागपूरमधील खेडकर परिवारात सन १९२९ साली विमलताईंचा जन्म झाला. त्यावेळी नागपुरात मुलींच्या शिक्षणाची सोय असेलही, पण घरचे वातावरणच शिक्षणाला अनुकूल नव्हते. परंतु शिक्षण घेण्याची प्रबळ इच्छा ताईंना स्वस्थ बसू देत नव्हती. मोठ्या हट्टाने आणि जिद्दीने त्यांनी कारंजा श्राविकाश्रमाचा पर्याय निवडला आणि यशस्वी पार पाडला देखील... पण पुरेसे शिक्षण घेण्याआधीच नागपूरला परत येऊन विवाह वेदीवर चढावे लागले.

श्राविकाश्रमात मिळालेले धार्मिक संस्कार किल्लेदारांसारखे सासर मिळाल्याने वृद्धिंगत झाले. सासूबाई श्रीमती सोनाबाई व धाकट्या जाऊबाई सौ. पद्माताई यांच्याजवळ घरीच शिक्षणाची गंगा वाहू लागली! स्वतःची ज्ञानलालसा आणि गुरुद्वयांचे मार्गदर्शन यामुळे धार्मिक शिक्षणाची घोडदौड सुरु झाली. वयपरत्वे सोनाआजींना जसजसे मंदिरात येणे कठीण होऊ लागले, तसा या हक्काच्या नवीन शिष्याने तो भार अलगदपणे पेलला. आजही मंदिरात स्वाध्याय करणाऱ्या बहुतांश स्वाध्यायी महिला त्यांचे स्मरण करीत असतात. सर्वसामान्यांना, विशेषतः हिंदी भाषकांना, द्रव्यानुयोगाची रुची लावण्याचे कठीण कार्य त्यांनी केले. ज्ञानदानाची गंगा अविरत पुढे नेणे आणि शिष्यांना परिपूर्ण करणे याकडे त्यांचा विशेष कल होता .

याच परंपरेतील पुढील नाव आहे.–

**श्रीमती सरलाताई सुभाषजी मुधोळकर!**

मनमोकळे हसणाऱ्या, आपल्या उंच आवाजाने परिसर दणाणता ठेवणाऱ्या, लहानथोरांना

'जय जिनेंद्र' करून बोलते करणाऱ्या सरलाताई देखील कारंज्याच्या माहेरवाशीण! ९ ऑक्टोबर १९४५ रोजी जन्माला आलेल्या सरलाताई कारंजातील मिश्रिकोटकरांची लेक! जात्याच बुद्धिमान सरलाताईंना आयुष्याच्या प्रारंभी अनेक कष्ट सोसावे लागले, परंतु कष्टांना हसत हसत सामोरे जाणाऱ्या सरलाताईंनी B.Ed.चा आणि प्रथम मातृत्व धारणाचा प्रवास अगदी सोबतीनेच पार पाडला!

कारंजाच्या वास्तव्यात अगदी बालवयात सौ. चंद्राबाई चवरे यांच्याशी संपर्क आला आणि त्यांनी आपल्यात धार्मिक शिक्षणाचे बीजारोपण केल्याचे त्या मोठ्या आदराने सांगतात. त्यांच्या पुढील गुरु म्हणजे आदरणीय मंजुळाताई रुईवाले! त्यांनी श्राविकाश्रमाच्या पाठशाळेतून जे ज्ञान दिले, ते त्यांचे शब्द आजही कानी घुमत असतात, असं त्या सांगतात. त्यानंतरच्या गुरु म्हणून त्या आ. विमलताई किल्लेदार यांचा उल्लेख करतात. अशा आपल्या सर्व गुरुंच्या प्रति आदरभाव असणाऱ्या सरलाताईंनी शाळेमधे अध्यापन केले आहे. इंग्रजी विषयात त्यांचा विशेष हातखंडा!

मुली लहान असतांना श्री दिगंबर जैन सेनगण मंदिर लाडपुरा, इतवारी (नागपूर) येथे पाठशाळा सुरू करून अनेक बालकांना संस्कारित केले. परंतु शाळा, घर-संसार या व्यापात ते मागे पडले.

पुढे मुलींची लग्नकार्ये झालीत, सांसारिक जबाबदाऱ्या पार पडल्या. मग त्यांनी स्वतःला पूर्णपणे धार्मिक क्षेत्राकडे वळविले आणि स्वाध्यायात मन विशेष रमू लागले. जसे विमलताई किल्लेदार यांनी नागपूर सोडले, तसा त्यांचा स्वाध्याय वर्ग सरलाताईंनी सांभाळला! पूजा, विधाने, स्वाध्याय, प्रश्नपत्रिका सोडविणे अशा सगळ्या उपक्रमांमुळे मंदिराचा परिसर दुमदुमत ठेवला. पुढे त्यांनी नागपूरचा निरोप घेतला आणि अखंड चालू असणाऱ्या स्वाध्याय वर्गात खंड पडू लागला. सध्या त्या अंजनगावसुर्जी येथे धार्मिक अध्ययनात समरस असतात.

यांच्याशिवाय वर उल्लेख केल्याप्रमाणे मोठ्या मंदिराच्या पाठशाळेत काही काळ ज्ञानदानाचे कार्य **सौ. दमयंती कमलाकरजी पेंढारी** यांनी केले, तर सेनगण मंदिरामधे चालणाऱ्या पाठशाळेत **सौ. अनुराधा शरदजी मुधोळकर, सौ स्नेहा खेडकर** यांनी केले. गेल्या दोन तीन वर्षांपासून मोठ्या मंदिरामध्ये **डॉ. उज्वलाताई डोणगांवकर** या करणानुयोगावर विशेष स्वाध्याय वर्ग चालवीत आहेत.

सन्मति मासिकच्या मान्यवर लेखिका **सौ. हर्षाताई वेखंडे** यांचे शिक्षण व करिअर तंत्रज्ञान शाखेतील, परंतु डॉ. प्रियंकर जैन व अन्य विद्वानांजवळ शास्त्रोक्त पद्धतीने जिनागमाचे अध्ययन करून त्याला स्वतःच्या चिंतन-मननाची जोड दिल्यामुळे आज तत्त्वज्ञानाच्या एक उत्कृष्ट अध्यापक म्हणून नागपूर येथे कार्यरत आहेत.

सदर प्रभागातील जैन मंदिर व परवार पुरा जैन मंदिर येथे मागील शतकात **कुसुम पटोरिया आणि विद्युल्लता चौधरी** यांच्या अध्यापनाची माहिती मिळते.

पुढील परिचय करून देते आहे,

**अंजनगावातील स्वाध्यायरत महिलांचा...!**

**श्रीमती कमलताई रमकांतजी नांदगांवकर**

खानदानी श्रीमंती असणारे अंजनगाव-सुर्जी म्हणजे कमलताईंची कार्यभूमी! महामहोपाध्याय पदवीने अलंकृत, न्यायतीर्थ श्री नरेंद्रकुमारजी भीसीकर यांच्या ज्येष्ठ कन्येच्या रूपात १९३५मध्ये जन्म घेतलेल्या कमलताईंचे लौकिक शिक्षण फार फार तर सहावीपर्यंत झाले होते, मात्र धार्मिक शिक्षण न्यायतीर्थची पहिली परीक्षा उत्तीर्ण होण्यापर्यंत पोहोचले होते. अशा विद्यालंकृत कमलताईंना अंजनगावात पाठशाळा सुरु करण्यास प्रोत्साहन दिले कमलताई जोहरापूरकरांनी! दिवसेंदिवस पाठशाळेचे रोपटे असे फुलू-फळू लागले की याला पाठबळ द्यायला स्व. सुशीलाबाई

कमळसंगई, कांताताई जगदीशजी संगई, कांताताई अरुणजी संगई स्वतःच्या आवडीने जोडल्या गेल्यात. त्यापूर्वी बालात्कार गण मंदिरात **स्व. सुवर्णाबाई खुशाल संगई** ही जबाबदारी सांभाळीत असत.

लहानपणापासूनच मुलांना करणानुयोग, न्यायशास्त्रासारख्या विषयांची देखील ओळख सहजरीतीने होईल इतके सोपे करून त्यांचे शिकविणे होते. पाठशाळेचे वर्ग श्री सेनगण मंदिरामध्ये सायंकाळी भरत. काष्ठासंघ मंदिरात रोज सकाळी सुरु असणाऱ्या मोठ्यांच्या नियमित स्वाध्याय वर्गात त्या उपस्थित असत. हळूहळू हा स्वाध्याय वर्ग त्याच घेऊ लागल्या.

कालांतराने कमलताई अंजनगाव सोडून गेल्या आणि स्वाध्याय वर्गाची जबाबदारी परिपूर्ण रीतीने **सौ. विजयाताई अविनाशजी संगई** यांनी सांभाळली, केवळ पुढेच नेली नाही तर Va zoom, google द्वारे सगळ्या जगाला आपल्या स्वाध्यायाशी जोडून घेतले. देशविदेशात त्यांचा स्वाध्यायवर्ग आज नियमित रूपाने सुरु आहे. नागपूरचे माहेर असणाऱ्या सौ. विजयाताई नागपूर युनिव्हर्सिटीच्या सुवर्णपदकाच्या मानकरी असून पदवीला असतांना तत्त्वज्ञान विषयाचा अभ्यास केल्याने तौलनिक बुध्दीची विशेषता आहे. जात्याच असलेली बुद्धिमत्ता, लौकिक शिक्षणाची जोड, कमलताईंचे सानिध्य आणि सासूबाईंचे प्रोत्साहन ! साहजिकच हा तारा उजळला आणि पूर्ण प्रकाशाने प्रकाशित आहे. काही धार्मिक पुस्तकांचे लेखन त्यांनी केले आहे. गुणस्थान, लेश्या आदि प्रत्येक विषय स्वतंत्रपणे हाताळून आठ-आठ दिवसांचे त्यांचे शिबिर अनेक नवागतांना लाभकारी ठरतात.

अंजनगावात धार्मिक क्षेत्रात कार्यरत असणारे आणखी एक व्यक्तिमत्व म्हणजे
**सौ. भारतीताई सुरेंद्रजी खंडारे!**

आदरणीय पंडिता विजयाताई भिसीकर यांचे मातृछत्र व श्राविकाश्रमाचे संस्कार लाभलेल्या भारतीताई देखील उच्च विद्याविभूषित! पुणे युनिव्हर्सिटीतून M.A.ही पदवी संपादन केलेल्या! त्यांच्या नियमित स्वाध्याय वर्गातून ज्ञान ग्रहण करणारा त्यांचा मोठा शिष्यवर्ग आहे. **स्वाध्याय कराल तर तराल,** हे त्यांचे बोधवाक्य आहे. नयांचे विवेचन करण्यात यांना विशेष रूची आहे. काही धार्मिक पुस्तकांचे लेखन त्यांनी केले आहे.

अशाप्रकारे अंजनगावात समृद्धीसोबत धर्मज्ञानाचीही उदात्तता वाढविण्यात महिलांचा वाटा मोठा आहे.

**देऊळगांव-राजा** येथील महिला वर्ग ज्ञानाने अव्वल! येथे ज्ञान प्रबुद्धता वाढविण्याचे श्रेय जाते, **स्व. द्रौपदाबाई पन्नालालजी डोणगावकर** यांच्याकडे.

१९३०मध्ये त्यांचा जन्म झाला, पण द्रौपदाबाई बालपणीच मातृछत्राला पारख्या झाल्या. कदाचित त्यांचे हित यातच असेल म्हणून असे घडले म्हणायचे! मातृहृदयी मामा ब्र. माणिकचंदजी चवरे (तात्याजींनी) यांनी मातेची उणीव भासू दिली नाही. श्रध्देय तात्याजींनी या बालिकेला आपल्या छायेत घेतले आणि त्यांच्या परीस स्पर्शाने जीवन उजळून निघाले.

पूज्य गुरुवर्य श्री समंतभद्र महाराजांजवळ शिक्षण घेतांना महाराजांनी सांगितलेला उपदेश आणि दिलेला पुढील नियम- **'जरी एकच व्यक्ती शिकण्याच्या अभिलाषेने आपणाजवळ आली तरी, वेळ-काळ आदींचा अडसर न बाळगता मुक्त हस्ताने ज्ञानदान करायचे!',** सदैव स्मरणात ठेवून त्यांनी पवित्र ज्ञानदानाचे कार्य केले. समृद्ध भाषा, तंतोतत शब्द, प्रत्येक शब्दाचा अर्थ असा समजून लक्षात ठेवणे की, तो पुन्हा कधीच विसरू नये यावर विशेष भर असणाऱ्या द्रौपदाबाईंचा शिक्षणाचा प्रथम विषय प्रवेशिका हा असायचा. तसे तर चारही अनुयोगांत त्यांची भरारी असायची पण मन द्रव्यानुयोगत स्थिरावायचे. देऊळगांव मधे पाठशाळा आणि स्वाध्यायवर्गात 'महिलांनी' शिकविण्याची सुरुवात यांच्यामुळे झाली. लहान-मोठ्या, ज्ञानाची

पूर्वपीठिका असणाऱ्या- नसणाऱ्या सर्वांना स्वतःच्या आग्रही आणि आपुलकीच्या शैलीने जोडून धर्माची आस्था निर्माण केली. उल्लेखनीय शिष्यवर्गामध्ये **स्व. उर्मिलाबाई मिश्रीकोटकर, स्व. मनोरमाबाई डोणगांवकर, पुष्पाताई डोणगांवकर, नलिनीताई मुधोळकर** ही नावे घ्यावी लागतील. देऊळगांव-राजा येथे तेवत असणारी ही धर्मज्योत पुढील कालखंडात तेवती ठेवण्याचे श्रेय आहे.- **सौ. नयना मिश्रिकोटकर, अर्चना डोणगांवकर** यांच्याकडे तर, पाठशाळेची नियमितता जपत आहेत **शुभदाताई डोणगावकर, कृत्तिका डोणगांवकर आणि सोनाली खवडे** या धर्मभगिनी!

श्रद्धेय तात्याजींच्या घराण्यातील अकोला येथील स्व. जयकुमारजी चवरे, बालचंदजी चवरे, धर्मचंद्रजी चवरे यांचे परिवार म्हणजे पू. गुरुदेवांप्रति नितांत श्रद्धा व समर्पणाचे आदर्श उदाहरणच! गुरुकुलातील शिक्षण पूर्ण करून पुढील शिक्षणासाठी संघर्ष करणाऱ्या अनेक गुणवंत विद्यार्थ्यांचे जणू आधारस्थान!! ब्र. तात्याजींच्या काकी स्व. मंदोदरीबाई चवरे यांनी अशा विद्यार्थ्यांच्या मदतीने स्वतःच्या घरीच पाठशाळा सुरू केली होती. हे विद्यार्थी त्यामध्ये क्षत्रचूडामणि, तत्त्वार्थसूत्र आदि ग्रंथ शिकवीत असत, अशी नोंद सापडते.

फार पूर्वी जैनपूर नावाने ओळखले जाणाऱ्या **नेमगिरी जिंतूरमधे** स्वाध्याय परंपरा चालविणाऱ्यांमध्ये पहिले नाव येते **सौ. लीलाताई जिंतूरकर** यांचे. १९४३मधे कारंजाच्या चवरे परिवारात त्यांचा जन्म झाला. लीलाताईंना उदारमना आजोबा लाभले होते स्व. श्री शामलालजी दुलासा काबरी ! पू. गुरुदेव समंतभद्र महाराज यांचे अनन्य सहयोगी व कारंजा गुरुकुलाच्या स्थापनेत मोठे योगदान असणारे!! कारंजा जन्मभूमी असल्या कारणाने धार्मिक शिक्षणाचा पाया येथेच पक्का झाला. पुढे विवाहानंतर जिंतूरमध्ये स्वाध्याय वर्गाच्या रुपात तो प्रस्फुटित झाला.

याच ठिकाणी स्वाध्यायात अग्रेसर होत्या **प्रमिलाताई भोंगाडे,** ज्या पुढे परभणीला राहण्यास गेल्या. त्यांचेही धार्मिक शिक्षण कारंजा कंकुबाई श्राविकाश्रमातच झाले होते.

तिसऱ्या व्यक्ती म्हणजे **सौ. शांताताई चंद्रकांतजी कळमकर** या होत. सन १९४५मधे कारंजातील कस्तुरीवाले कुटुंबात जन्माला आलेल्या शांताताई ! वडिलांची फिरतीची नोकरी असली तरी मूळ गांव कारंजा असल्याने धार्मिक शिक्षणाचे संस्कार कारंजातच झाले. जिंतूर मध्ये धर्मप्रेमी स्व. श्री. नेमलालजी कळमकर यांच्या कुटुंबात स्नुषा म्हणून प्रवेश झाला. शिक्षकी पेशा आणि मूळची स्वाध्यायाची आवड, शिकविण्याची कला,थोडे संगीताचे अंग, गेयता आदि गुणांमुळे सुरू असलेल्या स्वाध्याय वर्गाला अधिक भरीव स्वरूप आले. आपल्या चारही मुलांवर, नातवांवर धार्मिक संस्कार करण्यात त्या यशस्वी ठरल्या.

गेल्या शतकाच्या उत्तरार्धात समाजजीवनात अनेक बदल घडून आलेत. जवळपास दोनशे वर्ष एका जागी वास्तव्यास असणारा समाज नोकरीनिमित्ताने बाहेर पडू लागला. मात्र धर्माचे बाळकडू, उपजत अध्यापनाचे अंग आणि स्वाध्यायाची आवड असणाऱ्या महिला वर्गाने या बदलाकडे जिनधर्म प्रभावनेची संधी म्हणून पाहिले. गावोगावी स्वाध्याय मंडळे तयार केलीत.

अशांमधे पहिले नाव येते **स्व. सगुणाबाई कस्तुरीवाले** यांचे. कारंजातील जन्म, श्राविका-श्रमातील धर्मसंस्कार व स्वाध्यायाची अत्यंत रुची या बळावर त्यांनी प्रत्येक बदलीच्या गावी अशी प्रभावना साधली होती.

अजून एक उल्लेखनीय नाव म्हणजे **श्रीमती चंदाताई मिश्रीकोटकर.** कारंजाच्या पं. नरेंद्रकुमारजी भीसीकर यांच्या या कन्येने कर्मभूमी सोलापूर येथेही पिताजींचा हा स्वाध्याय वारसा जतन केला. पुढे बारामती येथे ऑफलाईन स्वाध्याय वर्ग घ्यायच्या आणि आता पुण्याहून त्यांचा ऑनलाईन वर्ग सुरु

असतो.

पुढील नाव आहे, अकोला निवासी **सौ. मंगलाताई निरंजनजी देवलसी** यांचे. मंदिर आणि स्वाध्यायाकरिता निवृत्तीनंतर त्यांनी घरच मंदिराजवळ घेतले आहे. रोज मंदिरामध्ये स्वाध्याय चालतो. वैशिष्ट्य म्हणजे यांच्या स्वाध्याय वर्गात महिलांसोबतच पुरुषवर्ग देखील मोठ्या संख्येने हजर असतो!

याच श्रृंखलेत उल्लेख करावासा वाटतो, **सौ. मीनाताई किरणजी गरीबे** यांचा ! उत्साही आणि सदैव कार्यरत असणारे हे दाम्पत्य ! नोकरी निमित्ताने अकोला, नाशिक, अमरावती असे महाराष्ट्रभर भ्रमंती केलेले आणि प्रत्येक ठिकाणी स्वाध्याय ग्रुप तयार करणारे ! आता Emedia द्वारे सर्वदूर पोहोचून अनेकांना स्वाध्यायास प्रवृत्त करताहेत.

पुढची कडी जोडते आहे, **सौ. दीप्ती अमोल खंडारे**. आधी डोंबिवली, आता ठाणे या महानगरांमधे स्वाध्याय ग्रुप तयार करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य हे स्वाध्यायप्रेमी दाम्पत्य करीत आहे. कारंजा ही जन्मभूमी व मुंबई ही कर्मभूमी असणाऱ्या दीप्ती महाविद्यालयात सायन्स विषयाच्या प्राध्यापिका होत्या. स्वाध्यायही तेवढ्याच कुशलतेने घेतात.यांचा स्वाध्याय ग्रुप देखील E media वर कार्यरत असतो.

पुरातन काळापासून आपण बघत आलो आहोत...प्रसिद्धी, मोठेपणा किंवा गौरव कशाचीही आशा न बाळगता अशा अनेक सर्वसामान्य स्त्रिया धर्माची ध्वजा आपल्या मस्तकी धारण करून निरलसपणे ती धर्मध्वजा पुढच्या पिढीला सोपवित आल्या आहेत. म्हणूनच आजतागायत जैनत्वाचे संस्कार घराघरातून स्वयंपाकघर ते देवघरापर्यंत टिकून आहेत.

वाचकांच्या ध्यानात आलेच असेल की, यापैकी **बहुसंख्य महिलांचे धर्मशिक्षण प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीतीने कारंजा लाड येथील कंकुबाई श्राविकाश्रम येथे झाले आहे.** प. पू. गुरुदेव समंतभद्र महाराज, पू. कंकुमावशी यांच्या सत्प्रेरणेने सुरु झालेल्या या कन्या गुरुकुल संस्थेद्वारे मागील शतकापासून झालेली व होत असलेली ही धर्म प्रभावना केवळ अनन्यसाधारण अशीच म्हणावी लागेल!!

भक्ती आणि ज्ञान दोन्ही मार्गांचा समतोल साधत धर्माचा ध्वज उंचावत ठेवणाऱ्या माझ्या माहितीतील या काही अगदी मोजक्या स्त्रियांचा परिचय सन्मति मासिकाच्या या विशेषांकाच्या निमित्ताने आपणासमोर आणण्याचा हा प्रयत्न मी केला आहे. मला जाणीव आहे की, या विषयाची व्याप्ती अतिशय मोठी आहे. माझ्या मर्यादित माहितीनुसार व मर्यादित वेळेत, तरीही पूर्ण प्रयत्नपूर्वक मी हे संकलन प्रस्तुत करते आहे. यात अनवधानाने कोणाचे नाव सुटले असल्यास अथवा कोणाच्या भावना दुखावल्या गेल्या असल्यास उत्तम क्षमाभाव असावा!

(प. पू. गुरुदेवांच्या प्रेरणेने कारंजा लाड येथे इ.स.१९३३ मध्ये कंकुबाई श्राविकाश्रमाच्या रूपाने उजळलेली धर्म शिक्षणाची ज्योत प्रज्वलित ठेवणाऱ्या मागील शतकातील या काही महिलांचे कार्य सामान्य नसून, खरोखरच महान आहे! आम्हाला जाणीव आहे की, अशी स्त्री रत्ने अजून अनेक असू शकतात, त्या सर्वांना मनःपूर्वक अभिवादन!

आवर्जून अधोरेखित करावे अशी बाब म्हणजे, अतिशय परिश्रमपूर्वक हे संकलन सादर करणाऱ्या, प्रस्तुत लेखाच्या लेखिका **विपुलताई खेडकर व स्नेहा खेडकर** या दोन स्वाध्याय परायण व अध्यापन कुशल भगिनी नागपूरच्या लाडपुरा मंदिरातील पाठशाळा व स्वाध्याय वर्गाची परंपरा सुरु ठेवण्यासाठी सतत प्रयत्नशील असतात. दिव्याने दिवा उजळतो म्हणतात, ते हेच! त्यांचेही मन:पूर्वक अभिनंदन व शुभेच्छा!

-- संपादक)

# रसग्रहणाच्या पलिकडे...शब्दार्घ्य विनयांजली

**सौ. वंदना दर्यापूरकर,** अमरावती

सेवाव्रती महिलांच्या कार्याच्या सन्मानार्थ समर्पित या विशेष अंकासाठी श्रद्धेय गजाबेन शहा यांच्या जीवनकार्याचा सुंदर आढावा पू. आर्यिका शुद्धोऽहंश्री माताजी (पूर्वाश्रमीच्या ब्र. डॉ. सुजाताताई रोटे) यांच्या प्रांजळ शैलीतून ज्यामध्ये साकार झाला आहे, अशा **गुरुकुलमाता गजाबेन– जीवन दर्शन** या पुस्तकाचे समीक्षण आपल्यासमोर प्रस्तुत करणे औचित्यपूर्ण होईल, असा विश्वास वाटतो.

वंदना दर्यापूरकर यांच्या सिद्धहस्त लेखणीतून उतरलेले हे रसपूर्ण समीक्षण, नव्हे शब्दार्घ्य, वाचकांना कसे वाटले, हे जरूर कळवावे...!

**पुस्तकाचे नाव– गुरुकुल माता गजाबेन–जीवनदर्शन**

**शब्दांकन - ब्र.सुजाता रोटे (सध्या पू.आर्यिका १०५ श्री शुद्धोऽहंश्री माताजी)**

**गौरव ग्रंथ...**

दि. ३१ जुलै २०११ रोजी झालेल्या विद्वत् संमेलनात श्रद्धेय गजाबेनच्या अपूर्व कार्याची दखल घेऊन सन्मति प्रकाशनाकडून गौरव ग्रंथ प्रकाशित करण्याचा लोकमानस घोषित झाला. भूनच्या कार्यासंबंधी सगळ्यांकडून लेख मागविण्यात आले. परंतु ज्यांनी आपल्या आयुष्यातील तीस वर्षे भूनच्या सहवासात काढली, त्या सुजाताताईंसाठी; **याचि देही याचि डोळा..मी ब्रह्म पाहिला** या उक्तीप्रमाणे पाहिलेल्या व अनुभवलेल्या, गजाबेनच्या तेजस्वी व्यक्तिमत्त्वाचे दर्शन व जीवनकार्याचे मूल्यमापन संक्षिप्त शब्दांत लिहिणे शक्यच नव्हते. त्यामुळे त्यांनी जो काही सविस्तर लेख लिहिला. तोच वाचकांसमोर गुरुकुल माता– जीवनदर्शन या नावाने चरित्रग्रंथ म्हणून आला. सदोदित श्वेतवस्त्र परिधान करणाऱ्या व माथ्यावर पदर घेऊन असणाऱ्या घरंदाज, सोज्वळ, सात्त्विक, करारी दिसणाऱ्या गजाबेनचे सुंदर  छायाचित्र पुस्तकाच्या मुखपृष्ठावर आहे. पुढच्याच पानावर कुंभोज बाहुबलीचे श्रद्धास्थान असलेल्या बाहुबली भगवंतांच्या फोटोला वंदना करून, प्रेरणास्थान असलेल्या प. पू. गुरुदेव १०८ श्री समंतभद्र महाराजांचे आत्ममग्न असे छायाचित्र आहे. पुढे त्यांचा परिवार, त्यागीजन, संस्थेचे व्रती कार्यकर्ता व स्वतः लेखिका सुजाताताई यांच्यासोबतच्या छायाचित्रांनी काही पाने सजली आहेत. तर मलपृष्ठावर एका दृष्टिक्षेपामध्ये त्यांचा कौटुंबिक परिचय, लौकिक–धार्मिक शिक्षण व जीवनकर्तृत्व वाचकाच्या एका नजरेत भरेल असा दिला आहे. एकंदरीतच पुस्तकाचे बाह्यांग आकर्षक असे झाले आहे.

अनमोल समजले जाणारे मानवी जीवन सगळ्यांनाच लाभलेले असते, परंतु असाधारण व्यक्तिमत्त्व आपल्या सेवाभावी वृत्तीमुळे, महत् कार्यामुळे अलौकिक असे जीवन जगतात व आपल्या पावलांचे अमिट ठसे, त्यांच्या सहवासात येणाऱ्यांच्या जीवनात उमटवून जातात. असे अलौकिक व्यक्तिमत्त्व लेखकाच्या लेखणीला जीवनचरित्र लिहिण्यास उद्युक्त करतात. अशा महान व्यक्तींचा पैस एवढा मोठा असतो की, त्यांना शब्दबद्ध करणे सोपे नसते. स्वतः लेखिकाही म्हणते,

'भूनचे जीवन व कार्यच एवढे महान आहे की त्याचे शब्दांत वर्णन करणे कठीण आहे.' चरित्रनायिकेचे जीवनचरित्र शब्दांकित करून योग्य न्याय देऊ शकलो की नाही, याबद्दल स्वतः लेखिका साशंक असली तरी हयात असताना, प्रत्यक्ष भूनसमोरच चरित्रलेखन लिहिण्याचे आगळेच परम सौभाग्य लेखिकेला लाभले आहे.

धाराशिव नगरीची रंजक माहिति सांगून, रोचक वर्णनाने पुस्तकाचा प्रारंभ केलेला आहे. गजाबेनचे आजोळ धाराशिव म्हणजे आजच्या मराठवाड्यातील उस्मानाबाद. या शहराच्या प्राचीन इतिहासाचे वर्णन, नील व महानील या नावाच्या विद्याधरांनी केलेली जैन लेण्यांची रचना व जिनबिंब स्थापनेचा 'करकंडुचरिउ' या ग्रंथात उल्लेख आल्याचा ऐतिहासिक संदर्भ देऊन हे शहर इसवी सनापूर्वी वसले असावे, याची शक्यता व्यक्त केली आहे. ओघातच धाराशिव नावाच्या उद्‌गमाचे कथन व जवळच्या तेरापुर (तेर )नगरीत भगवान महावीरांचे समावशरण येऊन गेल्याचा उल्लेख केलेला आहे. वास्तविक पाहता गजाबेनचा जन्म अक्कलकोटच्या मेहता घराण्यातला. पण लेखिकेने त्यांच्या कौटुंबिक पार्श्वभूमीची सुरुवात आजोळ धाराशिवपासून केली आहे. सुज्ञ वाचकाला प्रश्न पडलाच तर, पुढील पानांवर त्याचे उत्तर मिळते. गजाबेनचा बालपणापासून तारुण्यापर्यंतचा, संस्कारक्षम वयातील जडणघडणीचा काळ धाराशिवमध्ये व्यतीत झाला आहे.

**कौटुंबिक पार्श्वभूमी...**

लेखिकेने धाराशिवचे गांधी घराणे, अक्कलकोटचे मेहता घराणे, सोलापूरचे दोशी घराणे असा भूनच्या कौटुंबिक गोतावळ्याचा विस्तृत परिचय करून दिलेला आहे. धाराशिवच्या सावकार असलेल्या गांधी घराण्यात गजाभूनच्या आई राजूबाईचा जन्म झाला, अक्कलकोटच्या श्री फुलचंद मेहता या सत्त्वशील, देखण्या पुरुषोत्तमाशी त्यांचा विवाह झाला. या दाम्पत्याच्या पोटी गजाबेनचा दि.२१ नोव्हेंबर १९१३ रोजी जन्म झाला. या तेजस्वी कन्यारत्नाचे नाव गजराबाई ठेवले गेले. कुंडलीनुसार कन्येच्या भाग्यात राजयोग आहे व तिच्या हातून भव्य दिव्य काम होणार आहे असे ज्योतिष्य वर्तवले गेले होते. एक मोठी बहीण आवलबाई व लहान दोन भावंडे जीवराज आणि विमलचंद अशी चार भावंडे. परंतु मुले लहान असतानाच क्षयरोगामुळे मातेचे निधन झाले. यानंतर गजाबेन आजोळीच वाढल्या. त्यांच्या दुसऱ्या मातेचेही नाव राजूबाई होते व त्यांनी या भावंडांचे पालनपोषण आपलीच मुले समजून योग्य रीतीने केले. चणीने लहान, तब्येतीने नाजूक असलेल्या गजाबेनला त्यांची बालविधवा मावशी माणिकबाईंनी खूप लाडाने जपले व वाढवले. उस्मानाबाद शहर निजामाच्या आधिपत्याखाली असल्याने, गजाबेनला शालेय शिक्षण फक्त चौथीपर्यंतच घेता आले. पण आजोबा नेमचंद बाबांसोबत त्यांनी कर्मकांड सारख्या क्लिष्ट धर्मग्रंथांचे लहान वयातच अध्ययन केले. मनात संसाराविषयी विरक्तीचे भाव होते. तरीही वयाच्या अठराव्या वर्षी त्यांचा विवाह त्यांच्या मनाविरुद्ध वालचंद शहांशी लावून दिला गेला. या असफल विवाहाचे वर्णन लेखिकेने 'त्याच विवाह मंडपात तिने संसाराला क्षत करून अक्षत आत्म्याला वरले' असे केले आहे. या एका वाक्यात भूनची असार संसाराप्रतिची उदासीनता, निर्विकारता दर्शवली आहे.

**आत्मकल्याणाच्या मार्गावर अग्रेसर...**

चिखलातही कमलिनीने चांदणे प्राशन करून विकसित व्हावे, तसे गजाबेननेही संसारकर्दमापासून अलिप्त राहून आत्मकल्याणाचा पथ निवडला, आत्मविकास साधला. भाग्याने मिळालेल्या संधीचे त्यांनी सोने केले, संस्कृत विषयाचे अध्ययन केल्यामुळे शास्त्रार्थात त्यांची रुची वाढली. पुढील धार्मिक शिक्षण घेण्यासाठी श्राविकाश्रमात जाता यावे म्हणून त्यांनी सत्याग्रहाचा मार्ग अवलंबिला. पू. समंतभद्र महाराजांमुळे, त्यांना कारंजाच्या श्राविकाश्रमात अध्यात्म शिकण्याची

संधी मिळाली. कारंजात प्रद्युम्नसावजी डोणगावकर यांनी भूनचे पिता व गुरु अशा दोन्ही भूमिका निभावल्या. श्राविकाश्रमातील मंजुळाताई यांच्याशी त्यांचे भगिनीवत प्रेम जुळले, ब्र. कंकुबाई यांची मातृवत् माया मिळाली. या कारंजा नगरीचा ऋणानुबंध भूनने आजीवन जतन केला. कारंजा येथील श्राविकाश्रमात भूनने व्यतीत केलेल्या सेवाकाळाचे वर्णन तपशीलवार केले आहे.

**कर्मरत योगिनी...**

कंकुबाई श्राविकाश्रमात भूनने संस्कृत व धार्मिक अध्यापनाचे कार्य केले. आश्रमवासी मुलींच्या त्या माता, गुरु व प्रसंगी सेवा सुश्रुषा करणाऱ्या धन्वंतरी, सेविकाही झाल्या. १९३४ साली कुंभोज बाहुबली येथे गुरुकुलाची स्थापना झाली. महाराजांची व्यवस्था पाहण्यासाठी म्हणून भूनचेही बाहुबलीला जाणे होऊ लागले. भूनबद्दल लिहिताना महाराजांच्या जीवनातील संक्षिप्त व प्रसंगानुरूप आवश्यक उल्लेख लेखिकेने ठिकठिकाणी केले आहे. अर्थातच याशिवाय भूनचे चरित्र पूर्ण होऊ शकले नसते. महाराजांनी कुंभोजला मुनिदीक्षा घेतल्यानंतर भूनही बाहुबलीला स्थायिक झाल्या. महाराजांचे शरीरस्वास्थ्य व संस्था या दोन्ही अनधिकृत जबाबदाऱ्या भूनने आपल्या मानल्या. भ. बाहुबलीचा बृहन्मूर्ती प्रतिष्ठा महोत्सव, कुंदकुंदागम उत्कीर्ण कार्य, महाराजांची विहारव्यवस्था, दिव्यावदान समारोह... या सगळ्यांमध्ये समायोजनाचे कार्य भूनने उत्कृष्टरित्या पार पाडले. **आदहिदं कादव्वं जइ सक्कं परहिदं च कादव्वं** हे महाराजांचे ध्येयवाक्य लक्षात ठेवून भूननी आत्महित न सोडता परहिताचे कार्य केले. भूनचे चरित्र म्हणजे एका कर्मरत योगिनीचे चरित्र आहे.पुढे गुरुकुल वत्सला या उपाधीने त्यांना गौरवान्वित केले गेले. वास्तविकतः त्या उपाधीचाच तो गौरव होता.

**अष्टपैलूस्पर्शी व्यक्तिचित्रण...**

लेखिका म्हणजेच आदरणीय सुजाताताई स्वतः भूनची मानसकन्या, धर्मकन्या तर भून त्यांची धर्ममाता ! साहजिकच दीर्घ सहवास मिळाल्यामुळे भूनच्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचे आपल्या समर्थ लेखणीने यथास्थित चित्रण करून त्यांनी वाचकांच्या डोळ्यासमोर भूनच्या अंतर्बाह्य स्वरूपाचे प्रकटीकरण केले आहे. कन्या गोरी, चाफेकळी-प्रमाणे नाक, भव्य ललाट, रूप वडिलांचे व गुण आईचे, अत्यंत बुद्धिमान, चाणाक्ष व शिस्तप्रिय, भूनचा स्वभाव नारळासमान आहे, वरकरणी कठीण पण आतून मऊ, ख्याती- पूजा-लाभ प्रतिष्ठा यांची यत्किंचितदेखील अपेक्षा नव्हती, भूननी नेहमी सुई-दोऱ्याप्रमाणे जोडण्याचे कार्य केले आहे, गुरुदेवांचे प्रत्येक कार्य सफल होण्यासाठी भूनचा सिंहाचा वाटा आहे. त्यांनी कधी आपली प्रसिद्धी केली नाही, सर्वांच्या इच्छा पूर्ण करणाऱ्या भून म्हणजे जणू कल्पवृक्षच आहे..... यासारख्या अनेक प्रासंगिक वाक्यांमधून भूनचे व्यक्तित्व वाचकांसमोर उलगडत जाते.आपले दोष विचारून ते कळल्यावर आनंदी होणाऱ्या गजाभून, धर्मचर्चा, ग्रंथवाचन, स्वाध्याय व अध्ययन यामध्ये आपला जास्तीत जास्त वेळ व्यतीत करणाऱ्या ज्ञानाराधक भून, चारही दानांमध्ये तत्पर असणाऱ्या, प्राणिमात्रांवर भूतदया दाखवून आश्रय देणाऱ्या, आयुर्वेद व निसर्गोपचाराचे उपजत ज्ञान असणाऱ्या व श्रद्धेने त्यांच्याकडे येणाऱ्यांचे रोग निवारण करणाऱ्या धन्वंतरी, प्रसिद्धीविन्मुख पण कार्यसाधिका प्रतिभा असलेल्या भून.. अनेक घटना व प्रसंगांमधून कडक शिस्त, व्यवस्थापन कौशल्य, स्पष्टवक्तेपणा, करारी बाणा, प्रेमळपणा.. इ. भूनच्या गुणांचे दर्शन घडवून लेखिकेने वाचकांसमोर भूनला साकारले आहे.

**प्रांजळ, साधी लेखनशैली...**

कुठलाही अभिनिवेश न आणता, वास्तव प्रांजळपणे कथन करणारी, संथ, शांत पण प्रवाही... **सत्याचा अनुभव वेधि सत्यपणे । अनुभवाच्या गुणे रुची येते** अशी लेखिकेची लेखनशैली आहे.

अनुभव अनिवार आवेगाने बोलू लागले की, त्यालाच साहित्य गुणांची कांती येते, याप्रमाणे साहित्यिक मूल्याने सजलेल्या या पुस्तकाचे अंतरंग म्हणजे गजाबेनचे व भूनप्रति लेखिकेचे स्वतःचे

अंतरंग उघडून दाखवले आहे. केवळ भावनेच्या आहारी न जाता भूनी लिहिलेल्या डायऱ्या, सन्मतीमधील लेख व प्रत्यक्ष अनुभव यावर आधारित हे चरित्र, इतिहास संशोधनाला उपयुक्त व वाचकाला प्रेरणा देणारी ठरेल असे आहे. आवश्यक तिथे तारखांची नोंद आहे. लेखनाची भाषा ओघवती असून मुद्देसूद मांडणी केलेली आहे. संस्कृत श्लोक, म्हणी व सुभाषिते यांनी भाषाशैली मंडित आहे.

सुसंस्काररूपी अत्तराचे सिंचन करीत. त्याचा सुगंध आजूबाजूला दरवळत असे, जो कीर्तीपासून दूर पळतो, त्याच्या पाठीमागेच कीर्ती लागते, भूनी दान गोळा करून अचेतन इमारती उभ्या करणे एवढेच कर्तव्य न मानता, आश्रमातील चेतन मूर्तींच्या विकासाकडेही आपले लक्ष केंद्रित केले; अशा अनेक सुंदर वाक्यांमधून लेखिकेच्या लेखनसामर्थ्याची वाचकाला प्रचीती येत राहते. मुद्देसूदपणे व सुसंगतपणे कथन केलेले हे धाराप्रवाही चरित्रलेखन वाचकाच्या मनाचा ठाव घेणारे आहे. स्वतः लेखिकेने आपल्या मनोगतात, 'माझी लेखनशैली अत्यंत साधी आहे, अलंकृत भाषाशैलीच्या वापराचा सराव नाही व अवास्तव वाढवून लिहिता येत नाही, जशी वस्तुस्थिती असेल तसे रेखाटण्याची सवय आहे, त्यामुळे मी लिहिलेले चरित्र गुणात्मक नसले तरी तथ्यात्मक नक्कीच आहे असे अत्यंत विनयाने नमूद केलेले आहे.

**लेखिका सुजाताताईंबद्दल थोडेसे...**

धर्मपुत्रीला मिळाली धर्ममाता या शीर्षकातील परिच्छेदात स्वतः सुजाताताईंनी त्या भूनच्या सहवासात कशा आल्या, याबद्दल सविस्तर माहिती दिली आहे. प्रारब्ध उज्वल असेल तर योग कसे जुळून येतात, याचे हे स्वानुभव कथन आहे. स्वतः महाराजांनी, गजाबेन! हे रत्न आहे... हातात मिळालेले रत्न सोडू नका... तुम्हाला सुद्धा म्हातारपणी यांचा आधार होईल असे सुचवले होते. महाराजांच्या मुखारविंदातून जणू नियतीनेच भविष्यवाणी वदली होती. भूनने सुजाताताईंना मातृवत् प्रेम व छत्रछाया दिली आणि त्यांनीही कन्या धर्माचे शेवटपर्यंत पालन केले. उमलत्या वयातील या कळीला फूल होताना भूनकडून धर्मसंस्काराचे सिंचन मिळाले, आगमाचे विवेकचक्षु मिळाले. आज त्याची परिणती म्हणजे पूर्वायुष्यातील ब्र. सुजाताताई या सध्या आर्यिकेची दीक्षा घेऊन, १०५ श्री शुद्धोऽहंश्री माताजी म्हणून आत्मपथावर अग्रेसर आहेत.

**रसग्रहण नोहे, जाणिजे शब्दार्घ्य...!**

आद. प्रज्ञाताईने हा लेख लिहिण्यासाठी विश्वासाने मला पात्र समजले, ह्याचे कारण म्हणजे अल्पकाळासाठी का होईना भूनचे सान्निध्य मला लाभले होते. त्यांच्या अविस्मरणीय व्यक्तिमत्त्वाच्या सुगंधी आठवणी आजही मनात जपलेल्या आहेत. त्यावर एक ललित मी यापूर्वी लिहिले होते. प्रज्ञाताईंचे सहज बोलणेही माझ्यासाठी एक प्रज्ञावंत सूचना आहे व तिचा अनादर करण्याची माझी प्रज्ञा नसल्यामुळे मी या सूचनेचा सहर्ष स्वीकार केला. पुस्तक वाचावयास घेताच, भूनच्या सहवासात बाहुबलीला घालवलेला बालपणीचा काळ माझ्या डोळ्यांसमोर उभा राहिला. माझे 'वंदा' असे नामकरण करणाऱ्या भूनचे प्रेमळ रूप मी अनुभवले आहे. त्या कारंजाला येण्याआधीच मला त्यांचा भेटीसाठी निरोप मिळत असे व मलाही त्यांच्या भेटीची ओढ लागून असायची. बाहुबलीला राहून आल्यानंतर त्यांनी माझ्याबद्दल आई-वडिलांना अभिमान वाटेल असे एक पत्र लिहिले होते, ती मूल्यवान भेट आजही माझ्या संग्रही आहे. बाहुबलीला त्यांची माझी शेवटची भेट झाली, तेव्हा विस्मरणामुळे त्यांनी मला ओळखले नाही; पण बाबांना म्हणजेच अभयसावजींना मात्र त्या विसरल्या नव्हत्या. तेव्हाचे त्यांचे निर्व्याज, निरागस रूप डोळ्यात भरून घेऊन तेथून जड पावलाने मी त्यांचा निरोप घेऊन निघाले होते.

सुजाताताईंनी लिहिलेले गजाबेनचे हे जीवनचरित्र म्हणजे एका तेजस्वी आत्मज्योतीने दुसऱ्या ओजस्वी आत्मज्योतीला शब्दांनी ओवाळले आहे. या निर्मळ भावशब्दांच्या जलाशयातूनच

थोडेसे जल घेऊन मी माझे हे शब्दार्घ्य भूनच्या स्मृतीचित्राला समर्पित केले आहे. प्रांजळपणे सांगायचे तर पुस्तकाचे किनाऱ्यावरून तटस्थपणे रसग्रहण न करता, भावार्थसरितेमध्ये खोल शिरून, चिंब भिजून रसपान करण्याचा प्रयत्न केलेला आहे. वास्तविक मनोगत लिहिण्याचा माझा मानस नव्हता पण शेवटी लिहिण्याचा भाव झाला एवढेच!

**सौ. उषाताई सावळकर, नागपूर**

भारतात पारतम्त्य होते. गुलामगिरीत जखडला होता. घरची परिस्थिती जेमतेम होती, पण धार्मिक प्रवृत्तीच्या कुळात १४ जून १९४० रोजी वरुड महाराष्ट्र येथे सौ. उषाताई यांचा जन्म झाला. आई शालिनीताई व वडील श्री. चिंतामणराव कस्तुरे घरी दोन भाऊ आणि तीन बहिण असा कुटुंब होता. जेमतेम आठवीपर्यंतचे शिक्षण होताच वयाच्या १७ व्या वर्षी १९५८ मध्ये नागपुर येथील श्री सुधाकरराव सावळकर यांच्याशी विवाह झाला. वैवाहिक जीवनात एकत्र कुटुंबात राहून विवेक व विनय याला सांभाळत १९६१मध्ये दहावीची परीक्षा उत्तीर्ण केली. लौकिक कर्तव्यासोबतच धार्मिक अध्ययन करीत असताना १९८० मध्ये हिंगोलीचे पंडित श्री. प्रियकरजी यांचे सानिध्य लाभले आणि आध्यात्मिक घोडदौड सुरू झाली. वेगवेगळ्या ठिकाणी व जयपूर येथे जाऊन आल्याने द्रव्यानुयोगाची विशेष पकड झाली. ताईंनी अनेक नामवंत विद्वानांच्या सोबत तत्त्वचर्चा केली. त्यानंतर त्यांनी नागपूरला १९८१ पासून समयसार इत्यादी ग्रंथावर प्रवचन सुरू केले. लक्ष्मीनगर मंदिरात स्वाध्याय घेणे, पाठशाळा चालवणे हे आज अखेर म्हणजे वयाच्या ८७व्या वर्षापर्यंत हव्याहातपणे त्यांनी सुरू केले. सोबतच अनेक विविध विधान व शिबिरांचे आयोजन करून सर्वांना स्वाध्यायाची सार्थ प्रेरणा दिली.

–सौ. माधवी जैन, नागपूर

**स्व. सौ. श्रीदेवी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ बाहुबली गुरुकुलासाठी धन्यकुमार बापूसो पाटील यांची उदार देणगी**



मूळ जयसिंगपूरनिवासी, पण सध्या आष्टा येथे राहणारे श्री. धन्यकुमार बापूसो पाटील हे लहानपणापासूनच गुरुदेवांचे निष्ठावंत भक्त म्हणून ओळखले जातात. आष्टा अर्बन बँकेचे ते माजी मुख्य कार्यकारी अधिकारी असून समाजकार्य व धार्मिक कार्यात त्यांचा नेहमीच सक्रिय सहभाग राहिला आहे. बाहुबली येथील गुरुकुलाच्या विविध उपक्रमांना त्यांनी सातत्याने सहकार्य केले आहे. गुरुकुल विकास, आगम मंदिर बांधकाम तसेच इतर अनेक उपक्रमांमध्ये त्यांनी गुरुदेवांच्या आज्ञेनुसार वेळोवेळी मदतीचा हात दिला आहे. गुरुकुलाची प्रगती आणि गुरुकुलात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास यासाठी ते सदैव तत्पर असतात.

दि. २५ फेब्रुवारी २०२६ रोजी त्यांनी आपल्या पत्नी सौ. श्रीदेवी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ गुरुकुलात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मदत व्हावी या उदात्त हेतूने रुपये एक लाख इतकी देणगी अर्पण केली. या देणगीतून गुरुकुलातील गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक सहाय्य मिळणार असून त्यांच्या शिक्षणासाठी मोठा आधार निर्माण होणार आहे.

याशिवाय स्तवनिधी गुरुकुलातील विकासास देखील बहुमोल सहकार्य केले आहे. त्यांच्या या योगदानामुळे गुरुकुलाच्या विविध योजनांना बळ मिळत असून संस्थेच्या प्रगतीस हातभार लागत आहे. देणगी अर्पण करताना त्यांच्या कुटुंबीयांचीही उपस्थिती होती. यामध्ये त्यांचे सुपुत्र प्रदीप पाटील व सुधीर पाटील, स्नुषा सौ. कविता व सौ. सुनेत्रा, तसेच नातवंडे प्रीतीश व यश उपस्थित होते. कुटुंबीयांच्या उपस्थितीत ही देणगी संस्थेचे संचालक गोमटेश बेडगे यांच्या उपस्थितीत गुरुकुलाच्या सेवेस अर्पण करण्यात आली.



# ब्र. मंगलादीदी बनल्या क्षुल्लिका सुधृतिश्री माताजी

मंगलादीदी यांचा जन्म सन १९७३ मध्ये जि. हिंगोली येथील सेनगाव येथे एका साध्या व गरीब कुटुंबात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव श्री. शांतीनाथ मांगुळकर व आईचे नाव सौ. पद्मावती मांगुळकर असे आहे. त्यांना नंदकुमार व अशोक असे दोन भाऊ आणि एक बहिण आहे. वडिलांचा मुख्य व्यवसाय शेती असून इतर वेळी ते शेजारील गावांमध्ये जाऊन बांगड्या भरण्याचे काम करतात. लहानपणापासूनच घरात जैन धर्माचे संस्कार मिळाल्यामुळे त्यांचे बंधू नंदकुमार मोठे पंडित-शास्त्री झाले. त्यामुळे मंगलादीदींचेही मन धार्मिकतेकडे वळले.

वयाच्या विसाव्या वर्षी म्हणजे सन १९९३ मध्ये त्यांचा विवाह सुरेशराव विठ्ठल कंधारकर (आखाडा बालापूर, ता. कळमनुरी, जि. हिंगोली) यांच्याशी झाला. कंधारकर कुटुंबाचा पूर्वीपासून भांड्यांचा व्यवसाय आहे.

मंगलादीदी यांना स्नेहल नावाची एक मुलगी आहे. दुर्दैवाने स्नेहल अवघी तीन वर्षांची असताना तिचे वडील सुरेशराव कंधारकर यांचे वयाच्या पस्तीसाव्या वर्षी हृदयविकाराने अचानक निधन झाले. या कठीण प्रसंगानंतरही मंगलादीदी खचल्या नाहीत. त्यांनी धैर्याने परिस्थितीवर मात करत आपल्या मुलीचे संगोपन केले आणि तिचे शिक्षण पूर्ण केले.

स्नेहलचे दहावीपर्यंतचे शिक्षण गावात झाले. पुढील शिक्षण नांदेड येथे तर इंजिनिअरिंगचे शिक्षण पुणे येथे झाले. आज ती इलेक्ट्रिकल इंजिनिअर म्हणून नोकरी करत आहे. कुटुंबातील मोठे दिर श्री. बबनराव कंधारकर व जाऊबाई सौ. पुष्पा कंधारकर तसेच दुसरे दिर श्री. रमेश कंधारकर व जाऊबाई सौ. रेखा कंधारकर यांनी स्नेहलला आपल्या मुलीसारखे प्रेम देत तिच्या आयुष्यात वडिलांची उणीव भासू दिली नाही.

स्नेहलने शिक्षण पूर्ण केल्यानंतर पुणे येथे दोन वर्षे नोकरी केली. त्यानंतर देवरुख येथील जैनोन्नती मंडळाचे अध्यक्ष, समाजसेवक व व्यापारी श्री. जयेंद्र मुकुंद मांगले यांचे सुपुत्र जयदीप (एम.ई. कॉम्प्युटर) यांच्याशी सन २०१९ मध्ये तिचा विवाह मोठ्या थाटामाटात झाला. सध्या स्नेहल व जयदीप दोघेही बेंगळुरू येथे एका चांगल्या कंपनीमध्ये नोकरी करत आहेत. स्नेहलच्या सासूबाई सौ. ज्योती जयेंद्र मांगले या जैन धर्माबद्दल विशेष आस्था असणाऱ्या असून जैनोन्नती महिला मंडळ देवरुखच्या अध्यक्षा आहेत.

मंगलादीदी यांना कु. जिज्ञासा नावाची चार वर्षांची नात आहे. मुलीचे सासर मनासारखे मिळाले, तसेच माहेर व सासरच्या कुटुंबाचा आधार आणि आई-वडिलांचे आशीर्वाद या सर्व गोष्टींचा विचार करून त्यांनी दीक्षा घेण्याचा निश्चय केला.

गेल्या पंचवीस ते तीस वर्षांपासून त्या जैन धर्माविषयी पाठशाळा घेणे, प्रवचन करणे, लोकांमध्ये जैन धर्माबद्दल जागृती करणे आणि धार्मिक ग्रंथांचा अभ्यास करणे या कार्यात सतत कार्यरत होत्या. या आध्यात्मिक साधनेतून त्यांच्यात मोक्षप्राप्तीची भावना दृढ झाली आणि त्यांनी दीक्षा घेण्याचा निर्णय घेतला.

शनिवार दि. २८ फेब्रुवारी २०२६ रोजी बाहुबली (कुंभोज), ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर येथे श्री सिद्धचक्र महामंडल विधान या पवित्र कार्यक्रमात प.पू. आचार्य श्री १०८ सुयशसागरजी महाराज व सहसंघस्थ प.पू. आर्यिका १०५ श्री शुद्धाहंश्री माताजी यांच्या पावन सान्निध्यात मंगलादीदी यांनी दीक्षा ग्रहण केली. दीक्षेनंतर त्यांचे नाव सुधृतीश्री माताजी असे ठेवण्यात आले.

## कंकुबाई कन्या शाळेत जागतिक महिला दिन साजरा

दि. ८ मार्च २०२६ जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून कंकुबाई कन्या शाळेत विविध कार्यक्रमांचे व भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला **कारंजा–मानोरा मतदार संघाच्या आमदार मा. श्रीमती सईताई प्रकाशदादा डहाके व मा. तेजस्विनीताई डहाके पाटील प्रमुख अतिथी** म्हणून उपस्थित होत्या.

बालविकास मंदिरच्या चिमुकल्यांनी 'तुम भारत की नारी' या गीतावर सुंदर नृत्य सादर केले. स्वप्न बघून उंच भरारी स्त्री घेऊ शकते, हा आशय व्यक्त करणाऱ्या गीतावरील नृत्याचे प्राथमिक विभागाच्या विद्यार्थिनींनी अप्रतिम सादरीकरण केले. माध्यमिक विभागाने पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्यावरील प्रेरक पोवाडा सादर केला. स्त्री सक्षमीकरणाच्या दृष्टीने आपली भूमिका स्पष्ट करण्यासाठी, समानता, न्याय व सुरक्षिततेचा संदेश देणारी प्रतिज्ञा विद्यार्थिनींनी घेतली. स्त्री सक्षमीकरणावरील संवाद आणि 'अहं बालिका' ही संस्कृत कविता आठवीच्या विद्यार्थिनींनी सादर केली. यानंतर आ. उल्काताई रूईवाले यांचा माध्यमिक विभागातर्फे मानपत्र व भेटवस्तू देऊन मा. सईताई डहाके यांच्या हस्ते सत्कार केला. विद्यार्थिनींनी काढलेल्या 'वारली चित्रकला प्रदर्शनीचे' उद्घाटन करण्यात आले.

प्रमुख अतिथी आमदार मा. सईताई डहाके यांनी आपल्या भाषणात स्त्री सक्षमीकरणावर भर दिला. स्त्रीची विविध क्षेत्रातील भरारी, तिचे कार्य याचा उल्लेख केला. त्यांनी मुलींना आत्मपरीक्षण करून, आत्मविश्वास बाळगण्याचा आणि आताच्या वातावरणात स्वतःला सुरक्षित ठेवण्याचा सल्ला दिला. मुलींसाठी आदर्शवत असलेली गावातील ही पहिली शाळा आहे, असे शाळेविषयी गौरवोद्गार काढले. तसेच स्व. प्रकाशदादांना कंकुबाई शाळेप्रती जिव्हाळा आणि आपुलकी होती, असे सांगून दादांच्या जुन्या आठवणींना उजाळा दिला. कार्यक्रमाप्रसंगी व्यासपीठावर मेस्टा संघटनेचे विभागीय व गोविंद कॉन्व्हेन्टचे अध्यक्ष मा. किरणभाऊ चौधरी व ब्लु चीप कॉन्व्हेन्टचे सचिव मा. आनंद इन्नाणी, शाळा समितीचे अध्यक्ष आ. संजीवभाऊ रूईवाले, रत्नप्रभा मेहता बालविकासच्या संचालिका उल्काताई रुईवाले हे होते.

भव्य रॅलीचे उद्घाटन मा. तेजस्विनीताई डहाके पाटील यांनी मशाल प्रज्वलित करून केले. बालकविकास मंदिर, प्राथमिक आणि माध्यमिक विभागातील विद्यार्थिनींनी विविध वेशभूषा या रॅलीमध्ये साकारल्या होत्या. तसेच रॅलीमध्ये सहभागी विद्यार्थिनींनी मार्गावरील मुख्य चौकात लेझीम, झांज, लाठीकाठी व कराटे इत्यादींचे प्रात्यक्षिक केले. अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने, स्त्रीशक्तीचा जागर करणाऱ्या घोषणा देत मान्यवर मंडळी, शिक्षिका आणि विद्यार्थिनी रॅलीमध्ये सहभागी झाल्या.

## बाहुबली गुरुकुल स्नातक मंडळाचा वार्षिक स्नेहमेळावा उत्साहात संपन्न

बाहुबली येथे बाहुबली गुरुकुल स्नातक मंडळाच्या वतीने वार्षिक स्नेहमेळावा रविवारी, दि. ८ फेब्रुवारी २०२६ रोजी आचार्य श्री शांतिसागर प्रवचन हॉल येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या कार्यक्रमासाठी माजी गुरुकुल स्नातक, विद्यमान विद्यार्थी, पालक आणि मान्यवर यांच्या मोठ्या उपस्थितीने कार्यक्रमाला विशेष रंगत आली.

कार्यक्रमाचे आयोजन दोन सत्रांत करण्यात आले होते. पहिल्या सत्रात स्नेहमेळाव्याचा शुभारंभ व मार्गदर्शनपर कार्यक्रम झाला. या सत्राच्या अध्यक्षस्थानी बाहुबली विद्यापीठाचे कोषाध्यक्ष, बाबासाहेब पाटील होते. प्रमुख अतिथी म्हणून गुरुकुल स्नातक, माजी प्राचार्य, वेणुताई चव्हाण महाविद्यालय, कराडचे डॉ. पुरंदर भाऊ चौगुले उपस्थित होते. त्यांनी आपल्या मनोगतात गुरुकुल शिक्षणपद्धतीतील शिस्त, संस्कार, सद्गुण, सल्लेखना आणि जीवनमूल्यांचे महत्त्व अधोरेखित केले. जैन धर्मातील क्षमा याचना किती महत्त्वपूर्ण आहे हे सांगितलेत उपस्थित मान्यवरांनी गुरुकुल परंपरेच्या जतनासाठी माजी विद्यार्थ्यांनी एकत्र येणे ही काळाची गरज असल्याचे मत व्यक्त केले.

दुसऱ्या सत्रामध्ये परिचय, बक्षीस वितरण व सत्कार समारंभ पार पडला. या सत्राच्या अध्यक्षपदी बाहुबली विद्यापीठाचे अध्यक्ष श्री. प्रकाशरावजी आवाडे हे होते. प्रमुख अतिथी म्हणून गुरुकुल स्नातक, पंचरंग प्रबोधिनी मासिकचे संपादक डॉ. रावसाहेब पाटील हे उपस्थित होते. आपल्या मनोगतामध्ये

गुरुकुलचा इतिहास, शिक्षकांच्या कर्तृत्वावर प्रकाश टाकत गुरुकुलातील गुरुजनांच्या संस्कार समर्पण व त्यागाचा उल्लेख केला. तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव, विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या माजी विद्यार्थ्यांचा सत्कार आणि शैक्षणिक यश संपादन करणाऱ्यांना बक्षीस वितरण करण्यात आले. कारंजा लाड (वाशिम) येथील पंडित आलोककुमारजी शास्त्री यांना पीएच. डी. मिळाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. यावेळी स्नातकांनी गुरुकुलातील आठवणींना उजाळा देत आपले अनुभव मांडले.

संपूर्ण कार्यक्रमात गुरुकुल परंपरेचा सन्मान, गुरुजनांविषयी कृतज्ञता आणि माजी विद्यार्थ्यांतील स्नेहबंध यांचे सुंदर दर्शन घडले. बा. ब्र. श्रीधर अण्णा, ब्रह्मचर्याश्रम व विद्यापीठाचे महामंत्री डी. सी. पाटील, संचालक, गोमटेश बेडगे, गुरुकुल स्नातक रायचंद हेरवाडे, सिद्धार्थ पाटील, एन. ए. पाटील इत्यादी स्नातक उपस्थित होते. दोन्ही सत्राचे सूत्रसंचालन प्रदीप धोतरे, अक्षय चव्हाण यांनी केले.

## श्री सिद्धचक्र विधान व दीक्षाविधी समारंभ भक्तिभावात संपन्न

अष्टान्हिकामध्ये बाहुबली क्षेत्रावर 'श्री सिद्धचक्र विधान दि. २४ फेब्रुवारी २०२६ ते दि. ०३ मार्च २०२६ अखेर संपन्न झाले.खाअचार्य १०८ श्री सुयशसागरजी महाराज, आर्यिका १०५ श्री शुद्धोऽहंश्री माताजी आणि संघस्थ त्यागीगण यांचे मंगल सान्निध्य लाभले. यामध्येच शुक्रवार व शनिवार असे दोन दिवस दीक्षाविधी समारंभ अत्यंत भक्तिभाव, उत्साह व मंगलमय वातावरणात संपन्न झाला. समारंभाची सुरुवात शुक्रवारी सकाळी अभिषेक व सिद्धचक्र विधान (गणधरवलय विधान) याने झाली. आचार्यश्री व त्यागीवृंद यांच्या उपस्थितीत विविध धार्मिक विधी पार पडले. दुपारी आचार्यश्रींच्या आशीर्वचनानंतर गोदभराईचा कार्यक्रम झाला. सायंकाळी हळदी, मंगलस्नान, मेहंदी व वैराग्य भक्तिसंध्या असा विविध कार्यक्रम संपन्न झाला.

शनिवारी पहाटे ५ वाजता जिनमंदिर परिसरात केशलोंच विधी संपन्न झाला. त्यानंतर प्रवचन हॉलमध्ये अभिषेक-पूजन व स्वाध्याय झाले. त्यागींच्या आहारानंतर नवदीक्षार्थींना रथामध्ये बसून मोठ्या उत्साहात जुलूस काढण्यात आली. दीक्षाविधीचा मुख्य सोहळा श्री कोल्हापूरे सांस्कृतिक हॉल येथे पार पडला. ध्वजारोहण, मंडप उद्घाटन व दीपप्रज्वलनानंतर आचार्यश्री पादप्रक्षालन, गुरुपूजन व दीक्षाविधी-संस्कारविधी विधीवत संपन्न झाली. नवदीक्षार्थींचे क्षुल्लक सुभद्रसागर व क्षुल्लिका सुधृतिश्री माताजी असे नामकरण करण्यात आले.

या सोहळ्याला स्वस्तिश्री जिनसेन भट्टारक महास्वामी, नांदणी व स्वस्तिश्री लक्ष्मीसेन भट्टारक महास्वामी, कोल्हापूर यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या मंगल आशीर्वचनाने उपस्थित भाविकांना अध्यात्मिक प्रेरणा मिळाली. दुपारनंतर भोजनप्रसादाचे आयोजन करण्यात आले. सायंकाळी आरती-भक्तिसंध्या व स्वाध्यायाने कार्यक्रमाची सांगता झाली.

विधानप्रसंगी प्रतिदिवस एक सौधर्म इंद्र-इंद्राणी, कुबेर, यज्ञनायक, शांतिधारा देणारे श्रावक उपस्थित राहत होते. प्रतिष्ठाचार्य ब्र, अजित भैय्या, पं. सन्मती उपाध्ये, पं. रुपेश उपाध्ये हे होते. देशभरातून हजारो भाविकांनी उपस्थित राहून या ऐतिहासिक सोहळ्याचा लाभ घेऊन अनुमोदना केली.

## कारंजा(लाड) येथे 'सर्वार्थसिद्धि-अनुशीलन' विषयावर द्विदिवसीय राष्ट्रीय संगोष्ठी संपन्न

एकलव्य विद्यापीठ, दमोह (म.प्र.) आणि श्री महावीर ब्रह्मचर्याश्रम (जैन गुरुकुल), कारंजा (लाड) यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुदेव श्री समंतभद्र सेंटर फॉर जैनिझमच्या तत्त्वावधानात 'आचार्य पूज्यपाद कृत सर्वार्थसिद्धि : अनुशीलन' या विषयावर ७ व ८ मार्च २०२६ रोजी द्विदिवसीय राष्ट्रीय संगोष्ठी उत्साहात पार पडली. 'सर्वार्थसिद्धि' या आचार्य पूज्यपादांनी रचलेल्या ग्रंथाच्या तात्त्विक, वैज्ञानिक आणि भाषिक वैशिष्ट्यांवर या संगोष्ठीत सखोल चर्चा करण्यात आली. हा ग्रंथ आचार्य उमास्वामी यांच्या तत्त्वार्थसूत्र या मूलग्रंथावर लिहिलेली सर्वप्रथम आणि अत्यंत प्रामाणिक टीका मानली जाते. उद्घाटन सत्रात गुरुकुलचे अध्यक्ष श्री सतीशजी संगई अध्यक्षस्थानी होते. प्रमुख अतिथी म्हणून विदुषी विजयाताई भिसीकर, डॉ. ऋषभचंद्र जैन फौजदार तसेच डॉ. शांतिकुमार पाटील (जयपूर) हे उपस्थित होते. बीजभाषण डॉ. शांतिकुमार पाटील यांनी केले.

पहिल्या दिवशीच्या सत्रात डॉ. आशीष जैन यांनी 'सर्वार्थसिद्धि मधील आचारविचार' व डॉ. आनंदकुमार जैन यांनी 'सर्वार्थसिद्धि मधील प्रमाणविचार' या विषयावर संशोधनपर भाष्य केले. या सत्रात डॉ. आलोक शास्त्री (कारंजा) यांनी लिहिलेल्या 'सर्वार्थसिद्धि का समीक्षात्मक अध्ययन' या संशोधनग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले. सत्राच्या अध्यक्षस्थानी डॉ. ऋषभचंद्र जैन फौजदार होते.

द्वितीय सत्राचे अध्यक्षस्थान डॉ. वीरसागर जैन (दिल्ली) यांनी भूषविले. या सत्रात पं. संयम जैन (जयपूर) यांनी ग्रंथातील अलंकारांचे, तर पं. अनुभव जैन (करेली) यांनी पापाचे स्वरूप व व्रतीची भूमिका या विषयावर विचार मांडले.

रात्रीच्या तृतीय सत्रात डॉ. संगीता मेहता यांनी संलेखनाचे स्वरूप या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. त्यानंतर डॉ. ऋषभचंद्र जैन फौजदार यांनी अणुव्रतांचे अतिचार या विषयावर विवेचन केले.

चौथ्या सत्रात विदुषी प्रज्ञा डोणगांवकर यांनी आचार्य पूज्यपाद यांच्या रचनाशैली, डॉ. स्वर्णलता जैन यांनी अतिचार व भावना व पं. अनुभव जैन यांनी दर्शन विपरीत विचार या विषयावर सादरीकरण केले. या सत्राचे अध्यक्ष ब्र. अभिनंदन शास्त्री होते.

पाचव्या सत्रात पं. चिंतामण भूस यांनी मोक्षमार्गाची आवश्यकता व स्वरूप व डॉ. सरिता जैन (इंदौर) यांनी ग्रंथाचे स्थान स्पष्ट केले. अध्यक्षीय भाषणात डॉ. राकेश जैन यांनी 'सर्वार्थसिद्धि का समीक्षात्मक अध्ययन' या वैशिष्ट्यांवर प्रकाश टाकला.

सेंटरचे अध्यक्ष श्री कीर्तिकुमार भोरे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रमाचा समारोप झाला. त्यांनी संस्थेची माहिती देत सर्व मान्यवरांचे आभार मानले व भविष्यातील कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्याचे आवाहन केले. पुढे ही अशाप्रकारचे कार्यक्रम होतील असे सांगितले व सहयोगाचे आव्हान केले.

देशभरातून आलेल्या विद्वानांच्या उपस्थितीत पार पडलेली ही ज्ञानसंगोष्ठी अत्यंत यशस्वी ठरली. विविध विद्वानांनी सर्वार्थसिद्धि ग्रंथाचे सखोल तात्त्विक आणि समीक्षात्मक विश्लेषण करत अनेक अनभिज्ञ पैलूंवर प्रकाश टाकला. संपूर्ण संगोष्ठीचे समन्वय व संपूर्ण आयोजन डॉ. आलोक शास्त्री यांनी केले.


# सन्मतीच्या स्वामित्व व इतर माहितीविषयी

| | | |
|---|---|---|
| १) प्रकाशन-स्थान | : | सन्मती कार्यालय, बाहुबली. |
| २) प्रकाशन काल | : | मासिक |
| ३) मुद्रकाचे नांव | : | प्रकाश कृष्णा करंबळकर |
| राष्ट्रीयता | : | भारतीय |
| पत्ता | : | शिव इम्प्रेशन, कोल्हापूर, |
| ४) प्रकाशकाचे नाव | : | श्री. गोमटेश बेडगे |
| राष्ट्रीयता | : | भारतीय |
| पत्ता | : | बाहुबली, जि. कोल्हापूर |
| ५) संपादकाचे नाव | : | डॉ. नेमिनाथ बाळीकाई<br>प्रज्ञा डोणगावकर<br>डॉ. लीना चवरे |
| राष्ट्रीयता | : | भारतीय |
| पत्ता | : | बाहुबली, जि. कोल्हापूर<br>पिन- ४१६११० |
| ६) वृत्तपत्रावर स्वामित्व असणाऱ्या व्यक्तींची नावे व पदे; तसेच एकाहून अधिक शेअर्स असणाऱ्या भागीदारी किंवा शेअर्स होल्डरांची नावे व पत्ते | | श्री. बाहुबली ब्रह्मचर्याश्रम, बाहुबली, जि. कोल्हापूर. |

मी, श्री. गोमटेश बेडगे याद्वारे जाहीर करतो की वर जी विगतवार माहिती दिली आहे ती माझ्या अधिकार व जाणिवेप्रमाणे व विश्वासाप्रमाणे बरोबर आहे.

दि. ०१/०४/२०२६ — गोमटेश बेडगे

फोन- ९४२११०१०९० — प्रकाशक


*****

एकलव्य विश्वविद्यालय, दमोह (म.प्र.) एवं
श्री महावीर ब्रह्मचर्याश्रम (जैन गुरुकुल) द्वारा संचालित गुरुदेव समंतभद्र सेंटर फॉर जैनिझम, कारंजा (लाड)
यांच्या संयुक्त तत्वावधानात आयोजित

## द्विदिवसीय राष्ट्रीय विद्वत् संगोष्ठी आ. पूज्यपाद कृत सर्वार्थसिद्धि : एक अनुशीलन

**शनिवार, दि. ७ मार्च २०२६ तथा रविवार, ८ मार्च २०२६**

स्थळ : श्री महावीर ब्रह्मचर्याश्रम (जैन गुरुकुल), कारंजा (लाड), जि. वाशिम ४४४१०५



संगोष्ठीच्या उद्घाटनप्रसंगी मंचासीन मान्यवर



सर्वार्थसिद्धि : एक अनुशीलन – या ग्रंथाचे प्रकाशन



पाण्डुलिपीच्या संरक्षण कार्याचे
अवलोकन करताना उपस्थित विद्वत्वर्ग



सर्वार्थसिद्धि : एक अनुशीलन – या ग्रंथाचे
संशोधक डॉ. आलोक शास्त्री यांचा सन्मान

(विशेष वार्ता पृष्ठ क्र. ४५वर)

कारंजा–लाड येथील कंकुबाई श्राविकाश्रमात जागतिक महिलादिनानिमित्त कारंजा–मानोरा मतदार संघाचे
आमदार मा. श्रीमती सईताई प्रकाशदादा डहाके यांची उपस्थिती व मार्गदर्शन....

(विशेष वार्ता पृष्ठ क्र. ४४वर)





RNI No. MAH/MAR/2006/21290/27-9-07 Reg. No. KLR-022/2024-2026 Posted at Bahubali on- 31-03-2026

# बाहुबली गुरुकुल स्नातक मंडळाचा स्नेहमेळावा उत्साहात संपन्न.



बाहुबली गुरुकुलाचे स्नातक डॉ. आलोक शास्त्री यांच्या पीएच. डी. उपाधीबद्दल सन्मान



बाहुबली गुरुकुल स्नातकांच्या स्नेहमेळाव्याच्या दीपप्रज्वलनप्रसंगी उपस्थित मान्यवर

(विशेष वार्ता पृष्ठ क्र. ४४वर)

## बाहुबली गुरुकुलाचे ९३वे शैक्षणिक वर्ष

## * बाहुबली गुरुकुलातील प्रवेशप्रकिया *

१) जून २०२६ पासून सुरु होणाऱ्या शैक्षणिक वर्षासाठी गुरुकुलामध्ये फक्त ५वी ते ९वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनाच प्रवेश दिला जाईल. २) इ. ६वी व ७वी साठी अत्यंत कमी जागा असल्याने ७०% पेक्षा कमी गुण असणाऱ्या विद्यार्थ्यांना विचार करून प्रवेश दिला जाईल. ३) प्रवेश प्रक्रियेसाठी विद्यार्थी व पालक यांची उपस्थिती अनिवार्य आहे. ४) **प्रवेशप्रक्रिया गुढीपाडवा दि. १९ मार्चपासून प्रारंभ झाला आहे. आज आता लगेच प्रवेश घेऊन आपले स्थान निश्चित करा.**

***संपर्क*- मुख्याध्यापक, एम. जी. शहा विद्यामंदिर व ज्युनि. कॉलेज, बाहुबली. ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर,**

९०४९४७३४३४ / ७२७६४१५५९५

Merchant Name : BAHUBALI BRAHMACHARAY ASH

UPI ID : schoolbahubali@sbi

BHIM UPI

विविध पारिवारिक समारंभानिमित्त बाहुबली गुरुकुलातील विद्यार्थ्यांना सद्दानराशी, पुरस्कार राशी, धर्मिक गतिविधीस प्रोत्साहन देण्यासाठी अथवा बाहुबली संस्थेस देणगी देण्यासाठी किंवा सन्मती मासिकाची वाढीव वर्गणी पाठवून देण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा आणि ट्रांझक्शन आयडी पाठवून द्यावे. जेणेकरून पावती करता येईल. आपल्या देणगीस आयकर सवलत मिळते. आपल्या सर्वांचे सहकार्य मिळावे, हीच सद्भावना...!!

www.sanmatimasik.com

प्रेषक,

सन्मति प्रकाशन

पो. बाहुबली,

जि. कोल्हापूर-४१६ ११०

फोन : ९० ४९ ४७ ३४ ३४

E-mail : sanmatimasik@gmail.com

प्रति,

RNI No. MAH/MAR/2006/21290/27-9-07 Reg. No. KLR-022/2024-2026 Posted at Bahubali on- 31-03-2026

प्रकाशक : श्री. गोमटेश बेडगे, मालक : श्री बाहुबली ब्रह्मचर्याश्रम, बाहुबली

मुद्रण स्थळ : शिव इम्प्रेशन्स्, कोल्हापूर. प्रकाशन स्थळ : बाहुबली